# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# इतिहास लेखन परंपरा

## (Traditions of History Writing)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२**

**इतिहास**

Compulsory : Paper 301

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (इतिहास लेखन परंपरा)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-33-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा

- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली

- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.

- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद

- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''इतिहास लेखन परंपरा'' या विषयाचे स्वयं:अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं:अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

इतिहास लेखन परंपरा या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये प्राचीन व मध्ययुगीन परंपरा, आधुनिक युरोपीय परंपरा, आधुनिक भारतीय परंपरा, भारतातील तळाकडून इतिहासाची परंपरा, इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले, पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्राचार्य डॉ. अंकुश ल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

दूरेशक्षण केंद्र,
ेशवाजी ेवद्याीठ,
कालिहाूरि

**(इतिहास लेखन परंपरा)**
**एम. ए. भाग-२ : इतिहास पेपर ३०१ (आवश्यक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. आर. के. देशमुख**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड | १ |
| **डॉ. अभय पाटील**<br>मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज | २ |
| **प्रा. मुफिद मुजावर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३, ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. अंकुश ल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्राचीन व मध्ययुगीन परंपरा | १ |
| २. | आधुनिक युरोपीय परंपरा | ३१ |
| ३. | आधुनिक भारतीय परंपरा | ६८ |
| ४. | भारतातील तळाकडून इतिहासाची परंपरा | ९८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# प्राचीन व मध्ययुगीन परंपरा

# (Ancient and Medieval Traditions)

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ ग्रीक- रोमन

  १.२.२ अरब,

  १.२.३ भारतीय : इतिहास- पुराणे आणि पर्शियन

१.३ सारांश

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

१.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.६ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- इतिहासलेखनाच्या विविध परंपरा समजून घेता येतील.
- प्राचीन ग्रीक- रोमन इतिहासलेखनाची परंपरा समजून घेता येईल.

- मध्ययुगीन अरब इतिहासलेखन परंपरा जाणून घेता येईल.
- भारतीय इतिहासाची पुराणे व पर्शियन इतिहासलेखन परंपरा माहित करून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक

इतिहासलेखनाच्या उदयाचा संबंध आपण पुराणवस्तूशास्त्राशी जोडतो. प्रारंभी अनुमानाच्या आधाराने संदिग्ध स्वरूपामध्ये इतिहासलेखन करण्यात आले. नदीकाठी असलेल्या संस्कृतीच्या अभ्यासापासून मानवाला इतिहासलेखनाची प्रेरणा मिळाली. प्रारंभी इतिहासलेखनास भूगर्भशास्त्राची फार मोलाची मदत झाली. पुढील काळामध्ये इतिहासालालेखनास सहाय्यभूत असणाऱ्या अनेक शास्त्रांचा शोध लागला. त्यानंतर बुद्धिप्रामाण्यवादाच्या अस्तित्त्वातून इतिहासलेखनाच्या अनेक परंपरा उदयास आल्या.

इतिहासकाराला इतिहासलेखनाची शास्त्रशुद्ध व तांत्रिक पद्धतीची माहिती असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे इतिहासाची मांडणी करणे सहज शक्य होते. इतिहासलेखनाचे मर्म माहिती करून घेण्यासाठी इतिहासलेखनाच्या परंपरांच आढावा घेणे महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या टप्प्यांचा, वैशिष्ट्यांचा व वैचारिक प्रवाहांचा समिक्षात्मक अभ्यास महत्त्वाचा ठरतो. या घटकामध्ये आपण प्राचीन व मध्ययुगीन इतिहासलेखनाच्या परंपरांचा आढावा घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ प्राचीन - ग्रीक, रोमन

#### अ) ग्रीक इतिहासलेखनाची परंपरा

इ.स. पाचव्या शतकामध्ये ग्रीसमध्ये इतिहासलेखनास प्रारंभ झाला. तत्पूर्वी स्मृती व मौखिक पद्धतीने महत्त्वाच्या घटना अस्तित्त्वात ठेवण्याचा प्रयत्न केला जात असे. यासाठी काव्यात्मक रचना सोईच्या असल्याने देवदेवतांच्या कथा, मिथके, लोककथा व लोकगीते या माध्यमातून काव्यात्मक रचनांचा वारसा पुढील पिढयांकडे जात असे. या काळामध्ये सार्वजनिक ठिकाणी, कार्यक्रमाच्या ठिकाणी लोकांपुढे कथाकथन करून त्यांचे मनोरंजन करणारे भटके व्यावसायिक होते. त्यामुळे या गीतांमध्ये कल्पना रंजकता फार असे.

इ.स. पूर्व सहावे शतक हे ग्रीस इतिहासामधील संक्रमणाचा कालखंड होता. या काळामध्ये लेखन व गद्यलेखनाची परंपरा विकसित झाली. यामुळे साहित्य, तत्त्वज्ञान व शास्त्रीय ज्ञानामध्ये मोलाची भर पडली. होमरने इलियडची निर्मिती केल्यानंतर महान व्यक्तींच्या शौर्यकथा शब्दांकीत होण्याची परंपरा सुरू झाली. कथांमधील कल्पकतेची जागा प्रत्यक्षात घडलेल्या घटनांनी घेतली. अशा घटना शब्दांकीत करणाऱ्यास लोगोग्राफर्स असे म्हणतात. अशा प्रकारच्या परंपरांमध्ये स्थानिक विषयांवर भर असे. गावोगावी फिरून कथाकथनाच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करणे हा त्यामागील हेतू असे. हिकॅटिअस याने अशा प्रकारच्या कथांमध्ये सत्यांशाचा आग्रह धरला. यामुळे इ.स. पूर्व पाचव्या शतकामध्ये इतिहासलेखनामध्ये कथांमधून सत्य घटनांचे वर्णन करण्याची परंपरा विकसित झाली. लोगोग्राफर्स व इतिहासकार यांच्यामध्ये दुवा जोडण्याचे काम हिरोडोटस याने केले.

## हिरोडोटस (इ.स. पूर्व ४८४ ते ४३०)

हिरोडोटसचा जन्म ग्रीसमध्ये आयोनिया येथे एका प्रतिष्ठित कुटुंबामध्ये झाला. तो सहा वर्षाचा असताना दिर्घकाळ चालू असलेला ग्रीक- इराण संघर्ष संपुष्टात आला. या युद्धाचा त्याच्या मनावर परिणाम झाला. त्याने प्रत्यक्ष युद्धातील घटना पाहिलेल्या लोकांकडून युद्धासबंधी माहिती मिळविली. या माहितीच्या आधारे त्याने ग्रीस इराण युद्धाचा इतिहास नऊ भागामध्ये लिहिला. शेवटच्या दोन भाग लिहिण्यासाठी त्याने बॅबिलोनिया, इजिप्त व ग्रीक शहरांचा प्रवास केला व माहिती मिळविली. त्यामुळे त्याचे लेखन सखोल व परिणामकारक झाले. युद्धाविषयी लेखन करीत असताना त्याने अनेक संबंधित विषयांची माहिती दिली आहे. या ग्रंथामध्ये चोवीस समाजगटांची, त्यांच्या जीवनपद्धती, परंपरा, चालीरिती व धार्मिक जीवनाची माहिती दिली आहे.

हिरोडोटसच्या इतिहासलेखन परंपरेची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. हिरोडोटसची कथनाची शैली चांगली असून त्यामध्ये लयबद्धता आहे.

२. विषयाची मांडणी साधी व सोप्या भाषेमध्ये आहे.

३. विषयाची मांडणीमध्ये कालक्रम असून विषयाचे निवेदन एकसंघी आहे.

४. विषयाच्या मांडणीमध्ये वस्तूनिष्ठता, समतोल दृष्टीकोण व निष्पक्षपातीपणा दिसून येतो.

५. घटनांची सुसंगत मांडणी व वर्णनाबरोबरच घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

६. विषयाच्या अकलन क्षमतेमुळे मांडणी परिणामकारक झाली आहे.

७. घटनांचे वर्णन करताना तत्कालीन प्रचलीत कथा, गीते यांची अचूक गुंफण केली आहे.

८. सत्य घटनांच्या आधाराने वस्तूनिष्ठ वर्णन करून त्याने इतिहासाला ज्ञानशाखेचे रूप दिले.

हिरोडोटसच्या लेखनाची ही वैशिष्टये असली तरी त्याच्या लेखनामध्ये काही त्रुटी आढळून येतात.

१. हिरोडोटसला फारसी भाषा येत नसल्याने इराणबाबत त्याने ऐकीव माहितीवर भर दिला.

२. ऐकीव माहितीची त्याने पडताळणी केल्याचे दिसत नाही.

३. त्याच्या लिखाणामध्ये चिकित्सक विश्लेषणाचा अभाव दिसून येतो.

४. घटनेच्या कार्यकारणभावामागे आध्यात्मिक प्रेरणा असते असे त्याचे मत असल्याने सत्य बाजूला पडल्याचे जाणवते.

इतिहासलेखनामागे हेतू असला पाहिजे असे त्याचे स्पष्ट मत होते. त्याच्या इतिहासलेखनामागील ग्रीक व इराणी संघर्षाची कारणे पुढील पिढीला माहिती व्हावी हे हेतू असल्याचे तो म्हणतो. इतिहासलेखनाचा हेतू स्पष्ट करताना गतकाळातील घटनांची नोंद पुढील पिढयांसाठी करून ठेवणे हा आहे असे सांगतो. प्रत्यक्ष साक्षीदारांकडून मिळालेली माहिती, सुक्ष्म निरीक्षण, ओघवती भाषा, घटनांची सुसूत्र मांडणी व घटनांचा अन्वयार्थ लावण्याची क्षमता यामुळे हिरोडोटसला शास्त्रीय इतिहासलेखनाचा जनक असे म्हटले जाते. शॉटवेल याने हिरोडोटला इराणी युद्धांचा होमर म्हटले आहे. एच.ई. बर्नर यांनी उत्तम कथाकथनकार म्हटले आहे.

**थ्यूसिडीडीस् (इ.स. पूर्व ४६०-३९६)**

थ्यूसीडीडीस् हा गुणवत्तेच्या दृष्टीने ग्रीक इतिहासकारामध्ये श्रेष्ठ मानला जातो. इतिहासाला आधुनिक रूप देण्यामध्ये याचा बराच मोठा वाटा आहे.

या कालखंडामध्ये अथेन्स व स्पार्टामधील पेलोपोनेशियन युद्ध झाले. थ्यूसीडिडीस्‌ची या युद्धामध्ये थ्रेसकडे जाणाऱ्या नाविक दलाचा अधिकारी म्हणून नेमणूक झाली. परंतु तो अपयशी झाल्याने त्याला अथेन्सबाहेर घालविण्यात आले. अथेन्सबाहेर वीस वर्षे घालविली या काळात त्याने या युद्धाची माहिती आठ पुस्तकामध्ये लिहिली आहे. यामध्ये इ.स. ४११ पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. त्याने या युद्धातील दैनंदिन घटनांची नोंद करून याच्या आधारे हिस्ट्री ऑफ पेलोपोनेशियन वॉर हा ग्रंथ लिहिला.

गतकाळातील घटनांची माहिती पुढील पिढीला व्हावी, पुढील पिढीतील मुत्सद्यांना मार्गदर्शन मिळावे व आपले लेखन चिरकालीन टिकावे थ्युसीडिडीस्‌च्या इतिहासलेखनामागील हे हेतू होते. मानवी

स्वभाव फारसा बदलत नसल्याने मानवाला भविष्यकाळाचा अंदाज घेण्यासाठी भूतकाळातील माहिती उपयोगी असते असे त्याला वाटत होते.

थ्यूसीडिडीस्‌चा विषय मर्यादित आहे परंतु त्याच्या लेखानास अनेक पैलू आहेत. त्याने युद्धाच्या वर्णनाबरोबरच युद्धाचे डावपेच व त्याचे सामाजिक व नैतिक परिणामांची चर्चा केली आहे. युद्धाच्या आर्थिक बाजूंवर त्याने चर्चा करून सागरी सत्तेचे महत्त्व सांगितले आहे.

थ्यूसिडिडीस्‌च्या इतिहासलेखन वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. सत्यनिष्ठा हे थ्यूसीडिडीस्‌च्या लेखनाचे प्रमुख वैशिष्टय आहे.

२. घटनांची अचूक नोंद, ऐकीव माहितीचे चिकित्सक परीक्षण, घटनाक्रमानुसार सुसंगत मांडणी, घटनांचा कार्यकारणभाव व घटनांचा तर्कशुद्ध अन्वयार्थ यामुळे त्याच्या लेखनाला शास्त्रशुद्ध स्वरूप प्राप्त झाले.

३. ऐतिहासिक घटनांचा परस्पर संबंध असतो हे तो मानत असल्याने त्याच्या लिखाणामध्ये इतिहासवादाचे सूतवाच आढळते.

४. दोन घटनांमधील पोकळी भरून भरून काढण्यासाठी त्याने छाननी केलेल्या लोककथांचा वापर केला आहे.

५. ऐतिहासिक व्यक्तींच्या तोंडी भाषणे घातल्यामुळे लिखाणात सजीवपणा आला आहे.

६. सर्वकालीन प्रमेयामुळे लिखाणास वैचारिक बैठक मिळाली आहे.

थ्यूसीडिडीस्‌च्या लिखाणामध्ये पुढील त्रुटी आढळून येतात.

१. काही ठिकाणी केलेले उल्लेख संदिग्ध आहेत.

२. काही ठिकाणी ढोबळ स्वरूपाच्या नोंदी केलेल्या आहेत.

३. त्याची भाषा ओघवती नाही.

## पॉलीबियस (इ.स. पूर्व २०८ ते १२६)

पॉलिबियस हा ग्रीक इतिहासकारामध्ये महत्त्वाचा इतिहासकार मानला जातो. अलेक्झांडरच्या आक्रमणामुळे ग्रीकांना नगर राज्यांच्या पलीकडील जगाची व संस्कृतीची ओळख झाली. त्यामुळे इतिहासलेखनाची व्याप्ती वाढली. ग्रीक इतिहासलेखनामध्ये ग्रीस बाहेरील जगाचा समावेश होऊ लागला. लिखित कागदपत्रे उपलब्ध होऊ लागली.

या कालखंडामध्ये रोमन साम्राज्याचा राजकिय सत्ता म्हणून उदय झाला होता. पॅलीबियसने हिस्ट्रीज हा ग्रंथ लिहिला. चाळीस भागामध्ये लिहिलेल्या ग्रंथाचे सध्या केवळ पाच भाग शिल्लक आहेत. या ग्रंथामध्ये रोमन साम्राज्याच्या विस्ताराची माहिती लिहिली आहे. पॉलीबियस हा काही काळ ग्रीक वकील म्हणून रोममध्ये राहिल्यामुळे त्यास राजकिय व शासकीय कामाचा अनुभव होता. तो इतर इतिहासकारांपेक्षा शिक्षण, प्रवास व व्यावहारिक अनुभवामध्ये श्रेष्ठ होता. त्याने आपल्या विषयाची माहिती भरपूर व विश्वसनीय दिली असली तरी त्याची भाषा रटाळ, नीरस व अनाकर्षक आहे.

पॉलीबियसच्या इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. पॉलीबियसने इतिहासाला शास्त्र मानले आहे.

२. त्याने घटनांची माहिती प्रत्यक्ष साक्षीदारांकडून मिळविली आहे.

३. पॅलीबियसने राजकीय विषयावर भर दिला आहे.

४. इतिहासलेखनामध्ये भौगोलिक संदर्भाची आवश्यकता सांगितली आहे.

५. घटनांच्या कारणांचे स्पष्टीकरणाची गरज स्पष्ट केली आहे.

६. पॉलिबियसने इतिहासाला शैक्षणीक मूल्य आहे हे सांगितले आहे.

पॉलीबियसच्या लेखनामध्ये पुढील त्रुटी आढळून येतात.

१. पॉलीबियसच्या लेखनाची भाषा व मांडणी आकर्षक नाही.

२. इतिहासलेखनासाठी आवश्यक असणारे कलागुण त्याच्यकडे नव्हते.

पॉलीबियसने इतिहासलेखनामध्ये पद्धतीशास्त्र व निष्पक्षपातीला सुरुवात केली. इतिहासलेखनाला ही पॉलीबियसची मोठी देणगी आहे.

ग्रीक इतिहासलेखनाच्या विकासामध्ये झेनोफोन, डायोनिसिस, स्ट्रॅबे व प्लुटार्क यांनी महत्त्वाची भर घातली.

झेनोफोन हा सॉक्रेटिसचा शिष्य होता. त्याच्या लेखनामध्ये बुद्धीप्रामाण्य, सचोटी व चतुरस्त्र व्यक्तीमत्त्व दिसून येतात. त्याने हेलेनिका, मेमोराबिया व अनाबेसिस हे प्रसिद्ध ग्रंथ लिहिले. हेलेनिका या ग्रंथामध्ये थ्यूसीडिडीजच्या ग्रंथामध्ये पेलोपोनेशियनच्या युद्धाचा न लिहिलेल्या भागाचे वर्णन केले आहे. मेमोराबिया ग्रंथामध्ये त्याने आपला गुरू सॉक्रेटिसच्या आठवणी दिल्या आहेत. इराणच्या सैन्यात असल्याने त्याला

इराणी सैन्याच्या हालचालींची माहिती होती. इराणचा राजा सायरस याच्या मोहिमांची माहिती त्याने अनाबेसिस या ग्रंथामध्ये दिली आहे.

स्ट्रॅबे या पॉलीबियसच्या समकालीन इतिहासकाराने अलेक्झांडरच्या मोहिमांचे वर्णन करताना भौगोलिक माहितीच्या आधारे केले आहे. इतिहासाला भौगोलिक ज्ञानाची गरज आहे हे त्याने स्पष्ट केले.

डायोनिसिसने इतिहासलेखनाच्या माध्यमातून उदाहरणाद्वारे तत्त्वज्ञान शिकविता येते हे स्पष्ट केले. प्लुटार्कने पॅरलल लिव्हज या ग्रंथामध्ये अठ्ठेचाळीस महान ऐतिहासिक ग्रीक व रोमन व्यक्तीची चरित्रे लिहिली आहेत. हा ग्रंथ लिहिताना त्याने ऐतिहासिक कागदपत्रांची छाननी केली आहे. ग्रंथालयामधून माहिती मिळविली आहे.

ग्रीक इतिहासलेखनाची पुढील वैशिष्टये दिसून येतात.

१. ग्रीक इतिहासलेखन विश्वसनीय, सत्य, वास्तव घटना यावर आधारलेले आहे. मिथके, दंतकथा यांना इतिहासलेखनामध्ये स्थान देण्यात आले नाही.

२. ग्रीक इतिहासलेखन मानव केंद्रीत असून मानवाचे व मानवी समाजाचे लौकिक व्यवहार हा लेखनाचा केंद्रबिंदू आहे. मानवाच्या कृतीच्या कारणांचा शोध मानवाच्या व्यवहारामध्येच घेतला आहे.

३. मानवी कृत्याचे विश्लेषण बुद्धिनिष्ठ व वस्तुनिष्ठ केलेले आहे. घटनांचा कार्यकारणभाव व घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न इतिहासकारांनी केला आहे.

४. ग्रीक इतिहासकारांनी राजकिय घटनांबरोबरच सामाजिक व आर्थिक जीवनावरही प्रकाश टाकला आहे.

५. इतिहासाला भौगोलिक माहितीची गरज असल्याचे प्रतिपादन ग्रीक इतिहासकारांनी केले आहे. यावरून इतिहासचा इतर ज्ञान शाखांशी संबंध असल्याचे स्पष्ट केले.

६. विषयाला आवश्यक असणारी माहिती प्रवास करून मिळविण्याचा प्रयत्न करणे व मिळालेली माहिती पडताळून पहाण्याचे महत्त्व ग्रीक जाणत होते.

७. इतिहासलेखनामध्ये रंजकता, कथाकथनाचे महत्त्व व इतिहासाच्या शैक्षणीक मूल्यांची जाण ग्रीक इतिहासलेखनामध्ये दिसून येते.

८. इतिहास हे जिज्ञासापूर्वक मिळालेल्या गतकाळातील ज्ञान कायम टिकविणे व पुढील पिढयांच्या हाती देण्याचे साधन आहे याची ग्रीकांना जाणीव होती.

मानवकेंद्री लेखन, प्राथमिक साधनांचा वापर, साधनांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण व ऐतिहासिक परिवर्तनाची जाण ग्रीक इतिहासलेखनामध्ये दिसून येतो. त्यामुळे शेकडो वर्षापूर्वीचे ग्रीक इतिहासलेखन आधुनिक इतिहासलेखनाच्या निकषावर आपले अस्तित्त्व टिकवून आहे.

## ब) रोमन इतिहासलेखन परंपरा

इतिहासलेखन परंपरेमध्ये ग्रीक इतिहासकारांनंतर रोमन इतिहासकारांनी मोलाची भर घातली. रोमन लोकांना इतिहासलेखनाकडे वळायला काही शतके लागली. रोमन लोक प्रारंभीच्या काळी ऐतिहासिक स्वरूपाच्या ढोबळ नोंदी करत असत. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकामध्ये रोमन इतिहास लेखनाला सुरुवात झाली. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकामधील रोमन इतिहासकारांमध्ये कॅटो-ला अग्रस्थान दिले जाते.

### कॅटो (इ.स.पूर्व २३४ ते इ.स. पूर्व १४९)

कॅटोला रोमन इतिहासचा जनक समजला जातो. रोमन सिनेटचा सदस्य असल्याने तो राजकीय घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. रोमन प्रजासत्ताकच्या कालावधीमध्ये त्याने प्युनिक युद्धाच्या कालखंडामध्ये त्याने राजकारणामध्ये सक्रिय सहभाग होता. त्याने ओरिजीन हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सात भागात असून यामध्ये प्युनिक युद्धाचा इतिहास आहे. या ग्रंथामध्ये युद्धाच्या माहितीशिवाय इटलीमधील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलीक व अर्थिक माहिती दिलेली आहे. त्यामुळे हा ग्रंथ रोमन इतिहासलेखनातील महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो.

इतिहासाचे शैक्षणीक महत्त्व असून उद्बोधन करणे हा इतिहासाचा हेतू असून त्यामध्ये राष्ट्रीयत्वाचे, नैतिक मूल्यांचे व चारित्र संवर्धनाचे धडे मिळावेत ही त्याची भूमिका होती. कॅटोच्या लेखनाचे वैशिष्टये म्हणजे युद्धमोहिमांचा इतिहास लेखन करीत असताना त्या एक पराक्रमी हत्तीच्या नावाशिवाय दुसऱ्या कोणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाही. युद्धामध्ये सेनानीपेक्षा सैनिक महत्त्वाचे असतात. ही त्याची भूमिका होती. यावरून तो उच्चपदावर कार्यरत असूनही सामान्याच्या कार्याची त्याला जाण असल्याचे दिसते. परंतु कॅटोचा हा ग्रंथ आज शिल्लक नाही.

### लीव्ही (इ.स.पूर्व ५९ ते १७)

रोमन इतिहासलेखनाला ग्रीकांच्या जोडीला नेऊन बसविण्याचे श्रेय ज्या इतिहासकारांना दिले जाते त्यापैकी एक लीव्ही हा होय. लीव्हीचा काळ रोमन इतिहासातील मन्वंतराचा काळ होता. या काळामध्ये रोमन प्रजासत्ताकाचा शेवट होऊन रोमन साम्रज्याचा पाया घातला गेला. रोमन सम्राट व लीव्ही यांचे संबंध जवळचे असल्याने लीव्हीला दरबारातील घटनांची माहिती होती. त्याने हिस्ट्री ऑफ रोम हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे १४२ भाग असून त्यापैकी आज फक्त ३५ भाग अस्तित्त्वात आहेत. या ग्रंथामध्ये रोमच्या

स्थापनेपासून इ.स. ९ पर्यंतचा इतिहास लिहिलेला आहे. रोमच्या इतिहासामध्ये सेंट ऑगस्टसची कारकिर्द सुवर्णयुग असल्याचे लिव्ही मानतो. इतिहासचा हेतू प्रबोध्नपर असावा असे लीव्हीला वाटते. राष्ट्रभक्ती, नीतीमूल्ये, शिस्त व उत्तम नागरिकाला आवश्यक असलेले गुण इ. इतिहासातून दिले जावेत व इतिहासाच्या अभ्यासातून उत्तम नागरीक घडावा या उपयुक्ततावादी दृष्टीकोणातून लीव्हीने इतिहासाकडे पाहिले.

**लीव्हीच्या इतिहासलेखनाची वैशिष्टे**

१. लीव्हीने राजकीय घडामोडींची माहिती देताना रोम कार्थेज युद्ध, यादवी प्रजासत्ताकाचा अंत, साम्राज्याची पायाभरणी याची माहिती दिली आहे.

२. लीव्हीने ग्रंथाचे लेखन विश्वसनीय माहितीच्या आधारे केले आहे त्यामुळे त्याचे लेखन माहितीपूर्ण आहे.

३. लीव्हीची लेखन शैली वर्णनात्मक रसाळ व साहित्यगुणांनी युक्त आहे.

**लीव्हीच्या इतिहासलेखनामध्ये पुढील त्रुटी दिसून येतात.**

**त्रुटी**

१. लीव्हीच्या इतिहासलेखनामध्ये रोमन सैन्याच्या इटलीमधील मोहिमांचा जेवढी माहिती देतो तेवढी माहिती इटलीबाहेरील मोहिमांची दिली नाही.

२. मिळालेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण केले नाही.

३. मूळ कागदपत्रांच्या आधारे लेखन करण्याचा प्रयत्न केला नाही.

४. घटनांची मांडणी पद्धतशीर केली नसल्याने त्याच्या मांडणीमध्षे परस्पर विरोधी विधाने आढळतात.

५. कालनिर्देशामध्ये संदिग्धता व चुका आढळतात.

६. घटनांच्या करणांची चर्चा केली नाही.

**कार्नेलियस टॅटिटस (Cornelius Tacitus)**

टॅटिटस हा रोमन इतिहासलेखनामधील अग्रगण्य इतिहासकार मानला जातो. उच्च वर्गामध्ये जन्मलेल्या या इतिहासकाराचा वक्तृत्त्व कला व कायद्याचा विशेष अभ्यास होता. अनेक महत्त्वाच्या व उच्च पदावर काम केले असल्याने त्याला दरबारी व शासकीय कामाचा फार मोठ अनुभव होता.

टॅटिटसने अनेक व विविध प्रकारचे ग्रंथ लिहिले व रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये मोलाची भर घातली. यापैकी डायलॉग ऑन ओरॅटरर्स, लाईफ ऑफ ॲग्रीकोला, जर्मनीया, हिस्ट्रीज व ॲनल्स हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हिस्ट्रीज (Histories) या ग्रंथामध्ये त्याने इ.स. ६८ ते ९६ या कलावधीमधील रोमन सम्राटांच्या इतिहासाची माहिती दिली आहे. यापूर्वीच्या सम्राटांची महिती त्याने ॲनल्स या ग्रंथामध्ये दिली आहे. लाईफ ऑफ ॲग्रीकोला या ग्रंथामध्ये त्याने आपल्या सासऱ्याच्या जीवन कार्याची माहिती दिली आहे.

टॅसिटसच्या इतिहासलेखनामध्षे पुढील वैशिष्टे दिसून येतात.

१. टॅसिटसने आपल्या विषयासाठी काळजीपूर्वक अनेक ठिकाणावरून माहिती गोळा केली.

२. त्याने ऐतिहासिक घटनांचे तर्कशुद्ध विश्लेषण केले आहे.

३. घटनांच्या कारणांची चर्चा करून त्यांचा अन्वयार्थ लावला आहे.

४. व्यक्ती व्यक्तीतील संघर्षाच्या रूपाने त्याने घटनांचा अर्थ लावला आहे.

५. रोमन साम्राज्याच्या घडणीतील दोष त्याने स्पष्टपणे दाखविले आहेत.

६. उच्च पदावरील व्यक्तीच्या वर्तणूकीवर त्याने कठोरपणे टिका केली आहे याला सम्राटही अपवाद राहीला नाही.

७. त्याच्या लिखाणाची भाषा प्रभावी असून निवेदनामध्ये कल्पकता, रंजकता व वैचारिकता आहे.

व्यक्तीला सुखी व चांगले जीवन व्यतीत करण्याचे धडे इतिहास देतो, व्यक्तीमधील सुप्त गुणांची वाढ करतो अशी त्याची इतिहासाबद्दल भूमिका होती.

**ज्यूलियस सीझर (इ.स.१००-४४)**

ज्यूलियस सीझर हा थोर मुत्सद्दी, कुशल सेनापती, अनुभवी शासक, उत्तम वक्ता व कवी होता. इतिहासलेखनामध्येही त्याने चांगली कामगिरी केली आहे. त्याने कॉमेंट्रीज ऑन गॅलिक वॉर (Comentries on Galic) हा तीन पुस्तकांचा ग्रंथ लिहिला. यामध्ये त्याने गॅलिक युद्धातील लष्करी मोहिमांचे, लष्करी डावपेचांचे वर्णन केले आहे. परंतु मोहिमांच्या तपशीलामध्ये कालक्रम अचूक नाही.

याशिवाय ॲपियन याचा रोमन हिस्ट्री (Roman History) हा वीस भागातील ग्रंथ महत्त्वाचा असून यामध्षे रोमन प्रजासत्ताकाच्या स्थापनेपासून दुसऱ्या शतकापर्यंतच्या राजकिय घडामोडींचा इतिहास लिहिला आहे. यामध्ये राजकिय घटनांबरोबरच रोमची शासन पद्धती, शासनसंस्था, कायदा यांची माहिती दिलेली आहे.

इ.स. दुसऱ्या शतकामध्ये फ्लेव्हिओ ओरियन याने अलेक्झांडरच्या मोहिमांचे चिकित्सक पद्धतीने इतिहास लिहिण्यासाठी विश्‍वसनीय माहितीचा आधार घेतला. यामध्ये लष्करी मोहिमांच्या भौगोलिक पार्श्‍वभूमींची चर्चा केलेली आहे.

रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये चरित्रलेखनाचा प्रकार आढळतो.

रोमन इतिहासलेखन परंपरेची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. रोमन इतिहासलेखन परंपरेचा केंद्रबिंदू राजकिय व लष्करी घडामोडी आहेत.

२. रोमन इतिहासकारांनी लिखित साधनांचा वापर केला.

३. इतिहासाला शैक्षणीक मूल्य असल्याची रोमन इतिहासकारांचे मत आहे. इतिहासाबाबत त्यांची व्यावहारिक व लौकिक भूमिका दिसून येते.

४. रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये रंजकता व भाषासौष्ठव दिसून येते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. होमरने ............. या ग्रंथाची निर्मिती केली.

अ) इलियड ब) पॅरलल लाईव्ह क) अनाबेसीस ड) हिस्ट्रीज

२. लोगोग्राफरर्स व इतिहासकार यांच्यातील दुवा जोडण्याचे काम ............ याने केले.

अ) थ्यूसीडीडीज ब) पॉलिबियस क) हिरोडोटस ड) स्ट्रॅबे

३. .................. ने इतिहासाला शास्त्र मानले.

अ) पॉलिबियस ब) कॅटो क) थ्यूसीडीडीज ड) लिव्ही

४. .................. हा रोमन इतिहासाचा जनक मानला जातो.

अ) लिव्ही ब) कॅटो क) टॅसिटस ड) सीझर

५. ............ ग्रंथाचे १४२ भाग लिहीले गेले.

अ) हिस्ट्री ऑफ रोम ब) ओरीजीन क) अनाबेसीस ड) हेलीनिका

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. इराणी युद्धाचा होमर कोणाला म्हटले जाते?

२. शास्त्रीय इतिहासलेखनशास्त्राचा जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

३. हिस्ट्रीज हा ग्रंथ कोणी लिहिला?

४. ॲनल्स हा ग्रंथ कोणी लिहिला?

५. कॉमेंट्रज ऑन सिव्हील वॉर हा ग्रंथ कोणी लिहिला?

## १.२.२ अरेबिक इतिहास परंपरा

इ.स. सातव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अरब इतिहासलेखन परंपरेस सुरूवात झाली. तोपर्यंत अरब लोक आपल्या स्मृती मौखिक स्वरूपात जतन करीत असत. सातव्या शतकामध्ये अरबांच्यामध्ये ऐतिहासिक दृष्टी निर्माण झाली. इतिहासलेखनाचे महत्त्व समजल्याने इतिहास लेखनाची प्रवृत्ती निर्माण झाली. यासाठी इस्लामचा उदय, प्रादेशिक विस्तार व साम्राज्य निर्मिती आणि पर्शियन इतिहासलेखनाचा प्रभाव याबाबी कारणीभूत झाल्या. सातव्या शतकापर्यंत भटका असणारा अरब समाज इस्लाम धर्मामुळे एकत्रित बांधला गेला. इस्लाम धर्माच्या समता व बंधुता या शिकवणूकीमुळे आपसातील संघर्ष संपून अरब समाजामध्ये एकता निर्माण झाली. इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी अरबांनी तलवारीच्या अवलंब करून साम्राज्य निर्माण केले. त्यांनी युरोप व अशिया खंडादरम्यान व्यापारावर वर्चस्व मिळविले. यातून वेगवेगळया संस्कृतींचे व प्रदेशातील ज्ञानाची अरबांना माहिती झाली. यातून केलेल्या पराक्रमाची व अनुभवाची नोंद करण्याची गरज वाटू लागली. धर्मप्रसार व साम्राज्य निर्मिती हे अरब इतिहासलेखनाचे प्रेरणा स्त्रोत होते.

### पर्शियन इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव

सातव्या शतकामध्ये अरबांनी इराणवर विजय मिळविल्यानंतर त्यांना प्रगत इराणी संस्कृतीची व इतिहासाची माहिती मिळाली. आठव्या शतकात त्यांनी बुक्स् ऑफ किंग्ज (Books of Kings) या इतिहास ग्रंथाचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केले. यातून अरब इतिहासलेखन परंपरेला प्रेरणा मिळाली. अरब इतिहासलेखन परंपरेमध्ये पर्शियन लेखनशैली, अलंकारीक भाषा, महान व्यक्तीचे कार्य, स्मरणीय घटनांचे वर्णन व साहित्यिक सफाईदारपणा स्पष्ट जाणवतो. अरबांनी पर्शियन भाषेतही लेखन केले. यामुळे पुढील

काळात इतिहासलेखनाच्या विषय व मांडणीमध्ये बदल झाला. आठव्या शतकामध्ये जितांच्या संस्कृतीला इस्लामी संस्कृतीमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केल्याने विज्ञान, कला व वाङमयाचा विकास झाला. अरब इतिहासलेखनपरंपरेमध्ये पुढील इतिहासकारांनी मोलाची भर घातली.

**अबू इब्न**

याने अनेक महान व्यक्तींवर व महत्त्वाच्या घटनांवर ३३ ग्रंथ लिहीले. यातील हिस्ट्री ऑफ द कॉन्क्वेस्ट ऑफ इराक (History of the Conquest of Iraq) हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

**अल वकीदी**

आठव्या शतकातील अल वकीदी याने आपल्या जीवनामध्ये अनेक लांबच्या प्रदेशाचा प्रवास केला. प्रवास करताना त्याचे फिरते ग्रंथालय वाहून नेण्यासाठी १२० उंट लागत. त्याने किताब उल मघाजी (Kitab –ul-Maghaji) हा ग्रंथ लिहीला. यामध्ये इस्लाम धर्माच्या प्रसाराची व त्यासाठी केलेल्या लष्करी मोहिमांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**अल मदाइनी**

नवव्या शतकातील या इतिहासकाराने इस्लाम धर्माच्या प्रचाराचा इतिहास लिहीला. याने मोठया प्रमाणावर लेखन केले आहे. त्याचा बुक ऑफ खलीफज (Book of the Khalifs) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**अल बहादूरी**

नवव्या शतकातील या अलबहादूरीने सिरिया, सायप्रस, मेसोपोटेमिया, इजिप्त, स्पेन व सायप्रस या प्रदेशातील इस्लामच्या प्रसाराची व इस्लामी आक्र सविस्तर माहिती लिहिलेली आहे. त्याने लिहीलेला हिस्ट्री ऑफ कॉन्क्वेस्टस (History of Conquests) हा ग्रंथ विश्वसनीय मानला जातो.

**मिस्कावाही**

अकराव्या शतकातील या लेखकाने लिहीलेल्या The Experience of Nations या ग्रंथामध्ये इराणच्या करपद्धतीची व अर्थिक व सामाजिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे.

**अल मसूदी**

दहाव्या शतकात होऊन गेलेल्या या लेखकाने ३६ ग्रंथ लिहिले. यापैकी Murudj हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिण्यासाठी १६५ साधनांचा अभ्यास केलेला आहे.

**इब्न खल्लीखान**

तेराव्या शतकातील या इतिहासलेखकाने Obituaries of Eminent Men ग्रंथ लिहिला आहे. यामध्ये ९०० इस्लामी महान व्यक्तींची चरित्रे लिहिली आहेत.

**अल बिरूनी**

अकराव्या शतकातील हा इतिहासकार गझनीच्या महंमदाबरोबर भारतामध्ये आला. भारतामध्ये तो तेरा वर्षे राहीला. त्याने संस्कृत भाषा शिकली. काही अभिजात संस्कृत भाषेतील ग्रंथांचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केले. याबरोबरच ग्रीक ग्रंथांचे अरबी भाषेमध्ये भाषांतर केलेल्या ग्रंथांचे संस्कृत भाषेमध्ये भाषांतर केले. त्याचा Kitaba-Ul-Hind हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. हा ग्रंथा त्याच्या भारतातील अनुभवावर आधारीत असून यामध्ये भारतीय तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, समाजपद्धती याची माहिती दिली आहे. हिंदूंच्या सांस्कृतिक जीवनातील काही बाबींची स्तुती करताना हिंदूंमध्ये आत्मसंतुष्टता, आत्मकेंद्रीत संकुचितवृत्ती व ऐतिहासिक दृष्टीचा अभाव असल्याचा स्पष्ट करतो.

**इब्न बतुता**

चौदाव्या शतकामध्ये उत्तर आफ्रिकेमध्ये हा इतिहासकार होऊन गेला. त्याने इजिप्त, सिरीया, भारत, श्रीलंका, जावा सुमात्रा व चीन या देशांचा प्रवास केला. या काळामध्ये एकत्रित केलेल्या माहितीच्या आधारे त्याने प्रवास वर्णने लिहीली. भारतामध्ये आल्यानंतर महंमद तुघलकाने त्याल काझी म्हणून नेमणूक केली. परंतु गैरसमजामुळे त्यास तुरूंगवास भोगावा लागला. गैरसमज दूर झाल्यानंतर त्याची तुरूंगवासातून सूटका झाली. त्यास आपला दूत म्हणून चीनला पाठविण्यात आले. त्याचा Rihala हा ग्रंथ विश्चसनीय आहे.

प्रत्येक मुसलमानाने मक्का मदिना या धार्मिक स्थानांना भेट दिलीच पाहिजे यावर इस्लाम धर्माने दिलेला भर, अरबांची साम्राज्य निर्मिती व सागरी व्यापारावरील वर्चस्वामुळे अरबांनी अनेक लांबचे प्रवास केले. प्रवासामध्ये मिळालेल्या माहिती व अनुभव त्यांनी लिहून ठेवले. त्यामुळे मध्ययुगामध्ये प्रवासवर्णन हा इतिहासलेखनाचा महत्त्वाचा घटक बनला.

**इब्न खलदून**

अरब इतिहासलेखनातील हा अग्रगण्य इतिहासलेखक होय. इतिहासाच्या अभ्यासाविषयी त्याचा नवीन शास्त्रीय दृष्टीकोण व त्याचे नवे विचार ही त्याची महत्त्वाची कार्ये होत.

इब्न खलदूनने Kitab-al-Ibar हा जागतिक इतिहासावर ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ तीन भागात असून पहिल्या भागात मानवी संस्कृती, तिचे वैशिष्टे व त्याचा मानवी जीवनावरील परिणामांची तर्कशुद्ध चर्चा

केलेली आहे. दुसऱ्या भागामध्ये मध्य आशियापासून इटलीपर्यंतच्या मुस्लीम अरब राष्ट्रांचा इतिहास लिहिला आहे. तिसऱ्या भागामध्ये आफ्रिकेच्या वायव्य भागाचे ऐतिहासिक वर्णन आहे.

या ग्रंथाला असलेली ३०० पानांच्या प्रस्तावनेतील इतिहासाच्या विवेचनाने इतिहासाच्या तत्त्वज्ञानाने क्रांती केली. या प्रस्तावनेमध्ये इतिहासाचे व ऐतिहासिक घटनांचे स्वरूप, घटनांचा इतर संबंध, त्यातील विचार प्रवाह, त्यातील सत्यता, बदल व बदलामागील कारणांची त्याने चर्चा केली आहे. मानवी जीवनाचा व समाज व्यवस्थेचा त्याने आदिकाळापासून आढावा घेतलेला आहे. त्याने इतिहासाला संस्कृती शास्त्र मानले. इतिहासाचा समाजशास्त्रीयदृष्टीने अन्वयार्थ लावला. मानव आपला विकास स्वत:च करत असतो. समाजाच्या विकासाला पर्यावरण, हवामान, जमीनीचा कस, वस्तूंचे उत्पादन या बाबी उपयोगी असतात. सर्व ज्ञानाचे अंतिम उद्दीष्ट समाजाचे कल्याण आहे असे त्याचे मत होते. समाजाच्या सांस्कृतिक विकासाला सामाजिक व राजकिय व्यवस्थापनाची गरज असून समाज व राजव्यवस्था परिवर्तनशील आहे हे त्याने स्पष्ट केले. एकात्मता, न्याय, सामंजस्य, विवेक या सामाजिक संकल्पना व नैतिक तात्विक मूल्ये यामुळे संस्कृतीचा विकास होतो. अर्थव्यवहार हा समाज व्यवस्थेचा आधार असून समाजाच्या विकासावर उत्पादनचे स्वरूप व पद्धती यांचा प्रभाव पडतो. लोकसंख्यावाढीमुळे श्रमामध्ये वाढ होते. गरजेच्या वस्तूंचे उत्पादन पुरेसे झाल्यानंतर चैनीच्या वस्तू उत्पादानावर श्रम खर्ची पडतात असे त्याचे मत होते. संस्कृती ही परिवर्तनीय असून ती मानवी जीवनाप्रमाणे चक्राकार गतीने वाटचाल करते असे त्याचे मत होते. मानवी कृती मानवाला जबाबदार असून संपूर्ण व सर्वांगीण मानवी जीवन हा इतिहासाचा विषय आहे असे त्याचे मत होते. त्याने इतिहासाच्या अभ्यासामध्ये सत्यशोधन, चिकित्सक तर्कनिष्ठ दृष्टीकोनाला महत्त्व दिले. इतिहासलेखकाने चिकित्सेशिवाय इतर बाबींवर विश्वास ठेवू नये, सर्व माहितीची तपासणी साशंकतेने करावी, कोणत्याही विषयावर लिहिताना संबंधीत अनेक साधनांचा अभ्यास करून विषयाच्या विविध अंगाने मूळ माहिती मिळवून त्याची छाननी करावी व सत्य शोधावे असे त्याने सांगितले. पूर्वग्रह, आग्रही मते, स्तुतीपर विधाने व ऐकीव माहितीमुळे इतिहासलेखनामध्ये चुका होतात असे त्याचे मत होते.

**अरब इतिहासलेखन परंपरेची वैशिष्टये :**

अरब इतिहासलेखन हा जागतिक इतिहासलेखनातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. अरब इतिहासलेखनातील वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अरब इतिहासलेखनामध्ये लौकिक जीवनाविषयी सकारात्मक दृष्टी दिसून येते. मानवी कृतीचे व मानवी व्यवहाराची वस्तूनिष्ठता दिसून येते.

२. अरब इतिहासलेखनामध्ये ऐतिहासिक दृष्टी दिसून येते.

३. अरब इतिहास लेखनामध्ये धार्मिक व राजकीय विषय आहेत. इतिहासलेखनामध्ये व्यापकता व विविधता दिसून येते. अरब इतिहासलेखनाने विश्वसनीय प्रवास वर्णनांची नवीन परंपरा सुरू केली.

४. अरब इतिहासलेखनामध्ये प्रथमच एकसूत्री कालगणना पद्धतीचा वापर करण्यात आला. यामुळे इतिहासलेखनामध्ये एकसूत्रता व विश्वसनीयता आली.

५. अरब इतिहासलेखकांनी ऐतिहासिक साधनांच्या विश्वसनीयतेला महत्त्व देऊन त्यासाठी शास्त्रीय पद्धती वापरली.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. ............ शतकामध्ये अरबांमध्ये ऐतिहासिक दृष्टी निर्माण झाली.

अ) सातव्या ब) सहाव्या क) आठव्या ड) नवव्या

२. ............ चे फिरते ग्रंथालय होते.

अ) इब्न खल्दून ब) अल वकीदी क) इब्न बुतता ड) मिस्कावाही

३. ............... ने रिहाला हा ग्रंथ लिहिला.

अ) अल मदाइनी ब) अल मसूदी क) इब्न बुतता ड) अबू इब्न

४. ........... याने ९०० महान इस्लामी धर्मियांची चरित्रे लिहिली आहेत.

अ) इब्न खल्लीखान ब) मिस्कावाही क) अल वकीदी ड) अबू इब्न

५. ............ हा इतिहासकार महंमद गझनी बरोबर भारतात आला.

अ) इब्न खलदून ब) अल बिरूनी क) अल बहादूरी ड) अल मसूदी

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. कोणत्या ग्रंथाला ३०० पानांची प्रस्तावना आहे?

२. अल बिरूनीने कोणता ग्रंथ लिहिला?

३. अरब इतिहासलेखनावर कोणत्या इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव पडला ?

४. हिस्ट्री ऑफ कॉन्केस्ट हा ग्रंथ कोणी लिहिला?

५. इतिहासाला संस्कृती शास्त्र कोणी मानले?

## १.२.३ भारतीय : इतिहास- पुराणे आणि पर्शियन

प्राचीन काळी कोणत्याही भारतीय लेखकाने इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला नाही. बहुतेक सर्व लेखकांनी धर्म, मोक्ष, अध्यात्म यासारख्या विषयावर लेखन केले. त्यामुळे प्राचीन भारतीय इतिहासलेखन करताना प्राचीन वाङमयाचा साधन म्हणून उपयोग केला जातो. वेदकालीन वाङमयामध्ये वेद, उपनिषदे, वेदांगे व सुत्र यांचा समावेश होतो. वेदोत्तरकाळामध्ये पुराणे व महाकाव्यांची निर्मिती झाली.

### पुराणे

वेदोत्तर वाङ्मयामध्ये पुराणांना बरेचसे महत्त्व आहे. यांचे स्वरूप दंतकथा व ऐतिहासीक घटनांचे अतिशयोक्त वर्णन असे आहे. छोटया मोठया कथांद्वारे वैदिक तत्त्वज्ञान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदू धर्माचे रक्षण करण्याचे काम पुराणांनी केले. पुराणातील आचार विचार, बदलत्या धार्मिक परिस्थितीवर योग्य उपाय म्हणून आलेले ऐतिहासीक साधन म्हणून पुराणांचे महत्त्व फार आहे. पुराणांची निर्मिती वेद व्यासांनी केल्याचे समजले जाते. एकूण ३६ पुराणे असून १८ पुराणे महत्त्वाची आहेत. राहिलेली १८ पुराणांना उपपुराणे म्हटले जाते. यापैकी ६ पुराणांमध्ये शिव, विष्णू व ब्रह्मा यांची माहिती आहे.

### महत्त्वाची पुराणे पुढीलप्रमाणे

१) विष्णू पुराण, २) नारद पुराण, ३) श्रीमद्भागवत पुराण, ४) गरूड पुराण, ५) पद्म पुराण, ६) वराह पुराण, ७) ब्रम्हांडपुराण, ८) ब्रह्मवैवर्त पुराण, ९) मार्कंदेय पुराण, १०) भविष्य पुराण, ११) वामन पुराण, १२) ब्रह्मपुराण, १३) कूर्म पुराण, १४) लिंग पुराण, १५) वायुपुराण, १६) स्कंद पुराण, १७) मत्सपुराण, १८) अग्नी पुराण

पुराणातून तत्कालीन सामाजिक राजकीय परिस्थितीची माहिती मिळते. यामधील ऐतिहासिक घटनांचे वर्णन अतिरंजित आहे. यामध्ये दंतकथाही अनेक आहेत. भाषेचे पल्हाळही भरपूर आहे. कालक्रमही नाही. पुराणांच्या नावावरून ही अनेक देव देवतांना समर्पित असल्याचे स्पष्ट होते. विष्णू पुराण, वायुपुराण, मत्सपुराण यामधून पुरू, इक्क्ष्वांकू व नाग इ. या राजवंशाची माहिती मिळते. पुराणातील आचार विचार, बदलणारी धार्मिक स्थितीचा प्राचीन भारताचा धार्मिक व सांस्कृतिक इतिहास लिहीण्यास उपयोग होतो.

पुराणांना ऐतिहासिकदृष्ट्या फारसे महत्त्व नाही. यातील बहूतेक कथा विश्वसनीय नाहीत राजकियदृष्ट्या विष्णुपुराण, मत्सपुराण व ब्रम्हांडपुराण महत्त्वाचे आहे.

**पर्शियन**

भारतामध्ये बाराव्या शतकामध्ये इतिहासलेखनास सुरूवात झाली. बाराव्या शतकापासून भारतीय इतिहासलेखनाच्या स्वरूपामध्ये व तंत्राच्यादृष्टीने मूलभूत बदल झाले. बारावे ते आठरावे शतक हा भारतीय इतिहासलेखनातील मध्ययुगीन कालखंड मानला जातो. भारतातील झालेला बदल नवीन इतिहासलेखन परंपरा सुरू होण्यास कारणीभूत झाला. भारतामध्ये सुलतानशाहीचा उदयाबरोबर येथे अरब, तुर्की व इराणी लेखनकला सुरू झाली. मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनाला सुलतानशाहीच्या उदयाबरोबरच इस्लामी संस्कृतीने चालना दिली. त्यामुळे मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनामध्ये अरब व पर्शियन इतिहासलेखन परंपरेचा प्रभाव दिसतो. परंतु इतिहासलेखन करीत असताना माहितीचे चिकित्सक विश्लेषण व त्याची विश्वसनीयता तपासली गेली नाही. त्यांनी कालगणनेचे तंत्र व घटनांचा कालक्रम मात्र पाळलेला दिसतो. मध्ययुगीन इतिहासलेखन परंपरेमध्ये क्रांतीकारी बदल घडल्यामुळे हा इतिहासलेखन परंपरेतील नवा टप्पा मानला जातो. इतिहासलेखनाच्या स्वरूपावरून पर्शियन इतिहासलेखनाचे सुलतानशाहीतील इतिहासलेखन व मोगलकालातील इतिहासलेखन असे दोन टप्पे पडतात.

सुलतानशाही इतिहासलेखन परंपरेचे सहा प्रकार पुढीलप्रमाणे-

**१. सर्वसामान्य इतिहास**

**मिनाज-उल-सिराज**

अमीर कुटुंबामध्ये जन्मलेला मिनाज-उल-सिराज बाहेरून भारतात आला. याच्या बुद्धीमत्तेने प्रभावित होऊन सुलतान नसीरूद्दीन याने त्यास दिल्लीचा काझी म्हणून नेमणूक केली. याने बातमीदारांकडून मिळालेली माहिती व आपल्या अनुभवाच्या आधारे तबकत इ नासिरी हा ग्रंथ लिहिला. यामध्ये प्रत्येक राजवंशावर एक प्रकरण व एका राजावर एक उपविभाग लिहिला. या ग्रंथामध्ये दैववाद दिसून येतो, घटनांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. याचे स्वरूप निवेदनात्मक आहे.

**याह्या-इब्न-अहमद-सरहिंदी**

याने तारीख ए मुबारकशाही हा ग्रंथ लिहिला. हा सय्यद घराण्याच्या दरबारामध्ये काही वर्षे राहिलेल्या या इतिहासलेखकाने महंमद घोरीपासून इ.स.१४३४ पर्यंतच्या राजकिय घटनांची माहिती दिली आहे. यामधील फिरोज तुघलकपर्यंतचा इतिहास लिखित ग्रंथावरून लिहिला आहे. त्यानंतरचा इतिहास

आपल्या अनुभव व अधिकृत बातम्यांवरून लिहिलेला आहे. प्रत्येक राज्यकर्त्याची व सरदाराची स्वतंत्र प्रकरणात लिहिलेली आहे.

### २. स्तुतीपर इतिहास

या प्रकारच्या इतिहासामध्ये उतबी यांच्या तारीख इ यामिनी ग्रंथाचा समावेश होतो. यामध्ये महंमद गझनीची स्तूती केलेली आहे.

### शमसुद्दीन सिराज अफीफ

याने लिहिलेला तारीख ए फिरोजशाही हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. इतिहासकाराने केवळ घटनांची नोंद न करता तत्त्वचिंतक,शिक्षक व मार्गदर्शक असावे असे त्याचे मत होते. तो स्वत: फिरोज तुघलकाच्या पदरी अधिकारी पदावर होता. त्याचे वडील महसूल मंत्रालयामध्ये अधिकारी पदावर होते. त्यामुळे त्यास प्रशासकी यंत्रणेची व कार्याची माहिती होती. त्याने फिरोज तुघलकाच्या कार्याची स्तुती केली. त्याबरोबरच फिरोजच्या राजकीय प्रभाव कमी होण्याची कारणेही सांगितली आहेत. परंतु मिळालेल्या माहितीची चिकत्सक पडताळणी करण्याचा प्रयत्न त्याने केल्याचे दिसत नाही.

### ३. उपदेशपर व नैतिक मुल्यांचा पुरस्कार करणारे इतिहासलेखन

यामध्ये झियाउद्दीन बरनी याने लिहिलेला तारीख ए फिरोजशाही ग्रंथाचा समावेश होतो.

### झियाउद्दीन बरनी

एका सधन व प्रतिष्ठीत कुटुंबामध्ये जन्मलेल्या झियाउद्दीन बरनी अनेक वर्षे दरबारी वर्तुळात होता. त्याने नऊ सुलतानाचा कालखंड पाहिला. त्याने तारीख इ फिरोजशाही हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्याने बल्बन ते फिरोजशहा पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. फिरोजशहाच्या पहिल्या सहा वर्षांच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. यासाठी काही पूर्वीचे लेखन, स्वत:चा अनुभव, आठवणी व सुक्ष्म निरीक्षणाचा आधार घेतला आहे. पुरावा म्हणून नातेवाईक व इतर व्यक्तीची वाक्ये दिलेली आहेत. यामध्ये तत्कालीन प्रशासकीय कामे, अर्थिक व्यवहार, व महसूलाचे उत्पन्न या बाबींची माहिती मिळते. याशिवाय तत्वज्ञ, कवी, मौलवी, वैद्य, व संतांची माहिती यामध्ये दिलेली आहे.

इतिहासाचे उद्दिष्ट सत्य सांगणे व नैतिक धडे देणे आहे. इतिहासमध्ये नोंद केलेला अनुभव, घटना व उदाहरणे दिशा दर्शक असतात. त्यामुळे माणसांना ओळखण्याची दृष्टी मिळते, चांगल्या वाईटामधील फरक समजतो, व्यवहारीक माहिती मिळते. चांगले जीवन जगण्यासाठी इतिहासाचे अध्ययन केले पाहिजे

असे त्याचे मत होते. मानवी जीवनातील इतिहासाचे महत्त्व सांगताना त्याने इतिहासाला शास्त्रांची राणी म्हणले आहे.

## ४. काव्यात्मक, कलात्मक व साहित्यिक लिखाण

या प्रकारच्या इतिहासलेखनामध्ये हसन निजामी, इसामी व अमीर खुस्रो यांच्या लेखनाचा समावेश होतो. हसन निजामी हा तेराव्या शतकामध्ये होऊन गेला. त्याने महंमद घोरीच्या लष्करी मोहिमा व विजयांचे वर्णन केले आहे. याने विषयाच्या सखोलतेपेक्षा अलंकारीक भाषेला महत्त्व दिले.

### इसामी

याने फतूहत -उस-सलातीन हा पद्यमय ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये महंमद गझनी व महंमद घोरीच्या मोहिमांची माहिती दिली आहे. याशिवाय सुलतानांच्या दरबारातील कारस्थाने, राज्यकर्ते व सरदार वर्गाची जीवनपद्धतीची माहिती मिळते. परंतु यातील बरीचसी माहिती ऐकीव माहितीवर आधारीत आहे.

### अमीर खुस्रो

दिल्लीच्या दरबारातील हा प्रसिद्ध कवी निजामुद्दीन औलियाच्या जवळचा होता. दिल्लीच्या सहा सुलतानांची कारकिर्दी त्याने पाहिल्या होत्या. त्याने ९० ग्रंथ लिहिले. यापैकी आशिका या ग्रंथामध्ये त्याने खिज्रखान हा अल्लाउद्दीन खिलजीचा मुलगा व राजपूत राजकन्या यांच्या प्रेमकथेचे वर्णन केले आहे. दुसरा ग्रंथ नुहसिफिर या ग्रंथामध्ये भारतातील लोक, त्यांचे जीवन, भाषा, भौगोलिक स्थिती व हवामानाचे वर्णन केले आहे. तुघलकनामा हा त्याचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथामध्ये घियासुद्दीन तुघलकच्या यशस्वी मोहिमा, राज्यारोहण, उत्तर भारतातील भौगोलिक परिस्थिती, हवामान, हिंदूचे धार्मिक जीवन, श्रद्धा, चालीरिती, करमणुकीची साधने, ऋतू यांची माहिती मिळते. यामध्ये अलंकारीक भाषा व काव्यात्मक शैलीचा वापर केलेला आहे. या ग्रंथामध्ये विषयाच्या मांडणीतील सुसूत्रतेचा अभाव व कालगणनेतील संदिग्धता दिसून येते.

### फेरीस्ता

सोळया शतकातील या इतिहासकाराने तारीख इ फेरिस्ता हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये सुलतानशाहीचा बाराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत राजकीय इतिहास लिहिला आहे.

## सुलतानशाहीतील इतिहासलेखन परंपरेची वैशिष्टे

१. या काळातील इतिहासकार प्रतिष्ठित कुटुंबातील व चांगले शिक्षण घेतलेले व विद्वान होते. राज्यकर्ते, दरबारी लोकांच्या जवळचे, राजकिय वर्तुळामध्ये वावरणारे व लौकिक जीवनात रमणारे असल्याने त्यांनी लेखनामध्ये माणसाच्या कार्य कर्तृत्त्वावर भर दिला.

२. लेखनाचे विषय प्रामुख्याने राजकीय आहेत

३. इतिहासलेखकांना मिळालेल्या राजाश्रयामुळे लेखनामध्ये आश्रयदात्याची स्तुती आढळते.

४. इतिहासलेखनामागे धडे देणे, मार्गदर्शन देणे, उपदेशाद्वारे नीतीमूल्ये शिकविणे हेतू दिसतात.

५. इतिहासलेखनामध्ये घटनाक्रम व कालगणनेचे जाणीव दिसते.

६. घटनांची तर्कशुद्ध व सुसंगत मांडणी व घटनांचा अन्योन्य संबंध निर्माण करून कार्य कारणभाव सांगण्याचा अभाव दिसतो.

७. या काळातील बहुतांश इतिहासलेखक घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने माहितीमध्ये विश्वसनीयता बरीच दिसते. परंतु ऐकीव माहितीची चिकित्सक पडताळणी केल्याचे दिसत नाही. या काळातील इतिहासलेखनाचे स्वरूप संशोधनात्मकतेऐवजी निवेदनात्मक आहे.

## मुघलकालीन इतिहासलेखन परंपरा

मुघलकालीन इतिहासलेखन परंपरेमध्ये विविधता व वस्तूनिष्ठता आली. लेखन परंपरेमध्ये परिपक्वता, प्रगल्भता आली. इतिहासलेखनामध्ये जीवनाच्या विविध अंगाची दखल घेण्यात आली. काही इतिहासलेखकांनी स्वतंत्र वृतीने लेखन केले. याकाळामध्ये आत्मचरित्र हा इतिहालेखनाची नवीन परंपरा सुरू झाली. इतिहासलेखन परंपरेला आवश्यक असलेले साधनसामग्री तयार झाली. सोळाव्या शतकामध्ये अनेक विद्वान इराणी उलेमा भारतामध्ये आले. त्यांनी पर्शियन विद्येचा, भाषेचा पुरस्कार केला. राज्यकर्त्यांनी पर्शियन भाषेमध्ये लेखन करण्यास प्रोत्साहन दिले. पर्शियन भाषा उच्चवर्गीय प्रतिष्ठांची भाषा बनली.

मुघलकाळमध्ये इतिहासलेखन परंपरेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

१) आत्मचरित्रे, २) दरबारी लेखकांचे अधिकृत इतिहास, ३) खाजगीरित्या लिहिलेले अनधिकृत इतिहास, ४) सर्वसामान्य इतिहास, ५) सुफी संतांची चरित्रे.

**आत्मचरित्रे**

हा इतिहासलेखन परंपरेतील नवीन प्रवाहा वैशिष्टयपूर्ण आह. राज्यकर्त्यांनी हा प्रवाह सुरू केला. यामध्ये प्रामाणिकपणे केलेले निवेदन आढळते. तुझूक- इ-बाबरी आणि तुझुक- इ-जहांगिरी या ग्रंथांचा यामध्ये समावेश होतो.

**तुझुक- इ-बाबरी**

बाबरने हा ग्रंथ तुरानी पर्शियन भाषेत लिहिला. यातून बाबराचे व्यक्तीमत्त्वाचे दर्शन दिसून येते. त्याने या ग्रंथामध्ये भारतामधील हवामान व लोकांविषयी स्पष्टपणे नापसंती दाखविलीआहे. स्थान व काळाच्या चौकटीमध्ये त्याचे लेखन आहे. त्याची विषयाची मांडणी सुसंगत असून त्याच्या निवेदनामध्ये तुटकपणा जाणवतो. यातील भाषा ओघवती, सोपी व पारदर्शक आहे.

**तुझूक- इ-जहांगिरी**

जहांगिरने लिहीलेल्या या आत्मचरित्रामध्ये पहिल्या बारा वर्षाचा इतिहास आहे. आपल्यातील असणारे दोष त्याने प्रमाणिकपणे कबूल केलेले आहेत. अबुल हसनच्या हत्येची जबाबदारी त्याने स्वीकारली परंतु नुरजहॉ, खुस्रो व शेर अफगाण यांच्याबाबत उल्लेख केलेला नाही. यामध्ये तत्कालीन राजकीय, प्रशासकीय व लष्करी मोहिमांची माहिती दिलेली आहे. वेगळया समाजगटातील सांस्कृतिक जीवनाचे वर्णन केले आहे. यावरून जहांगरिची सूक्ष्म निरक्षिण शक्ती व निवेदन कौशल्य दिसून येते.

**२. दरबारी अधिकृत इतिहासलेखन परंपरा**

अकबर ते शहाजहान यांच्या काळामध्ये सम्राटांच्या सांगण्यावरून बरेच इतिहासलेखन झाले आहे. यामध्ये पुढील इतिहासलेखकांचा व ग्रंथांचा समावेश होतो.

**तारीख-इ-आल्फी**

अकबराने इस्लामच्या विकासाचा एक हजार वर्षाचा इतिहास लिहीण्याचे काम इतिहासकारांच्या एका गटाकडे दिले. त्यांनी तारीख-इ-आल्फी हा ग्रंथ लिहीला. यामध्ये इ.स. १५९१ पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. यामध्ये कालक्रम असून प्रत्येक वर्षानुसार घटनांची नोंद करण्यात आली आहे.

**ख्वाजा निजामुद्दीन अहमद**

याने इ.स. १५९३मध्ये तबकत-इ-अकबरी हा ग्रंथ लिहिला. यामध्ये अकबराच्या अडतीस वर्षाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. अकबराच्या ताब्यात असलेल्या नऊ प्रदेशांची माहिती या

ग्रंथामध्ये मिळते.यामध्ये व्यक्तीपेक्षा घटनांवर भर दिलेला आहे. लिखाणाचे स्वरूप चिकित्स नसून निवेदनात्मक आहे. प्रादेशिक इतिहास म्हणून या ग्रंथाला महत्त्वाचे स्थान आहे.

**बदायूनी**

याचे मूळ नाव मुल्ला अबूदर कादर असून बदायुनी म्हणून प्रसिद्ध आहे. बदाऊनचा राहणारा लेखक विद्वान धर्मशास्त्रज्ञ होता. त्याच्या विद्वत्तेने प्रभावित होऊन अकबराने त्याची इमाम पदी नेमणूक केली. वतन म्हणून एक हजार जमीन दिली. इस्लामचा कट्टर अनुयायी असलेल्या बदायूनीला अकबराचे धार्मिक धोरण मान्य नव्हते. अकबराशी अबुल फजलची असणारी जवळीकमुळे अबुल फजल विषयी प्रतिकूल मत बनले. त्याने मुन्तखब-उल-लुबाब हा ग्रंथ लिहिला. यामध्ये त्याने अकबर व अबुल फजल यांच्यावर कठोरपने टिका केली आहे. हा ग्रंथ तीन भागामध्ये लिहिलेला असून पहिल्या भागामध्ये हूमायून व शेरशहाची माहिती आहे. दुसऱ्या भागामध्ये अकबराच्या चाळीस वर्षाच्या कारकिर्दीची माहिती व त्याच्याविषयीची मते स्पष्टपणे मांडली आहे. तिसऱ्या भागात समकालीन कवी, तत्त्वज्ञ, धर्मगुरू यांची चरित्रे आहेत. विरोधकांवर त्याने अत्यंत खालच्या पातळीच्या भाषेमध्ये टिका केली आहे.

**अबुल फजल**

इ.स.१५७४ मध्ये अकबराच्या दरबारामध्ये विद्वतेमुळे याला प्रवेश मिळाला. आपल्या विद्वतेने तो अकबराच्या विश्वासास पात्र ठरला.तो दरबारातील राजकारणामध्ये व लष्करी मोहिमांमध्ये सक्रिय राहिला. अकबराचा हा सर्वात जवळचा सल्लागार होता. तो उदार व धर्मसहिष्णू होता. त्याचे अकबरनामा व ऐने अकबरी हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. या ग्रंथातून अकबरकालीन सामाजिक परिस्थिती, प्रशासकीय व्यवस्था व राजकिय घडामोडींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. अकबरनाम्यामध्ये बाबर, हुमायून व अकबरच्या शेहेचाळीस वर्षांचा राजकिय इतिहास सांगितला आहे. दुसऱ्या भागामध्ये त्याने इतिहासाबाबत आपली मते मांडली आहेत. इतिहासाला तो शास्त्रांचा मोती म्हणतो. त्याच्या लेखनामध्ये हिंदूच्या धार्मिक निष्ठा, सामाजिक रूढी परंपरांची माहिती दिलेली आहे.

अबुल फजलचा ऐने अकबरी हा ग्रंथ अकाराच्या प्रशासन यंत्रणेची माहिती देतो. अकबरच्या आदेशानुसार लिहिलेल्या ग्रंथासाठी सर्व कागदपत्रे पुरविण्याचा आदेश अकबरने दिला होता. त्यामुळे हा ग्रंथ मूळ कागदपत्रांवर आधारलेला आहे. हा ग्रंथ पाच भागामध्ये लिहिलेला असून साम्राज्याच्या उत्पन्नाची साधने, महसूल पद्धत, खर्चाच्या बाबी, बाजारातील वस्तूंच्या किंमती, लोकसंख्या, अधिकार पदे, अधिकाऱ्यांची कर्तव्ये व सम्राटाचे आदेश याबाबतची माहिती या ग्रंथामध्ये मिळते.

ऐतिहासिक साधनांविषयी शास्त्रीय दृष्टी, माहितीचे चिकित्सक परिक्षण, इतिहासाविषयीची बुद्धीनिष्ठ दृष्टी, सुसंगत मांडणी, कालगणनेची निश्चिती, साधनांची चिकित्सक पडताळणी करून केलेले लेखन हे पर्शियन इतिहासलेखन परंपरेला दिलेले महत्त्वपूर्ण योगदान होय.

**मुतामतखान**

अकबरनंतर सत्तेवर आलेला जहांगीरने मुतामत खानास इतिहासलेखन करण्यास सांगितले. मुतामत खानाने इकबाल नामा-इ-जहांगिरी हा ग्रंथ लिहिला.

ख्वाजा याने मासीरी जहांगीरी या ग्रंथामध्ये जहांगीरच्या कारकिर्दीची माहिती दिली आहे.

**मिर्झा अमीन काझवान**

शहाजहानने मिर्झा अमीन काझवीन यास इतिहासलेखन करण्यास सांगितले. परंतु त्याचे काम पसंतीस न उतरल्याने ते काम हमीद लाहोरीकडे देण्यात आले. हमीद लाहोरी याने पादशहानामा हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये शहाजहानच्या वीस वर्षाच्या कारकिर्दीतील राजकिय घडामोडी, सामाजिक, अर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीची माहिती दिलेली आहे.

याच काळामध्ये इनायतखान याने शहाजहाँनामा हा ग्रंथ लिहिला. यामध्ये बाबरपासून १६५७ पर्यंतची राजकिय माहिती मिळते.

इतिहासलेखनाला विरोध असणाऱ्या औरंगजेबाने नंतर महंमद कासीम याला लेखन कारण्यास सांगितले. परंतु ते लेखन न आवडल्याने लेखन बंद करण्यास सांगितले. हा ग्रंथ आलमगीरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. यामध्ये औरंगजेबाच्या कारकिर्दीची अकरा वर्षाचा इतिहास आहे.

**खाजगीरीत्या लिहिलेले अनाधिकृत इतिहालेखन परंपरा**

महंमद साकी मुस्तेद याने शासकीय कागदपत्रांच्या साह्याने मासीरी आलमगिरी हा ग्रंथ लिहीला. यामध्ये औरंगजेबाच्या एक्कावन्न वर्षाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला आहे. याला राजज्ञा नसल्याने त्यामध्ये वस्तूनिष्ठता आलेली आहे.

**खाफीखान**

औरंगजेबाच्या समकालीनअसणारा महंमद हशीम अली खान हा खाफीखान म्हणून ओळखला जातो. त्याने मुन्तखाब-उल-लुबाब हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ तारीख-इ-खाफीखान असेही म्हटले जाते.

इ.स. १६८८ मध्ये तो मोगल दरबारामध्ये आला. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेमध्ये तो होता. फारूखशियरच्या काळात तो दिवाण होता. तीन भागामध्ये लिहिलेल्या या ग्रंथामध्ये घटनांची नोंद सुक्ष्मपणे केलेली आहे. महंमद घोरीच्या भारतावरील आक्रमणापासून इ.स. १७३३ पर्यंतच्या घटना यामध्ये सांगितलेल्या आहेत. औरंगजेबकालीन इराणी तुराणी संघर्ष, मनसबदारीमध्ये औरंगजेबाने केलेल्या सुधारणा, केंद्रीय मुघल शासन व्यवस्था, मुघल मराठा संघर्ष याबाबतचे वर्णन यामध्ये केले आहे. याने औरंगजेबाची स्तुती केली आहे. शिवाजी महाराजांच्या धार्मिक व स्त्रीविषयक धोरणाची स्तुती केलेली आहे.

इतिहालेखनामध्ये घटनाक्रम असावा व इतिहासकाराने प्रामाणिकपणे व नि:पक्षपातीपणे सत्य निवेदन केले पाहिजे असे त्याचे मत होते.

**महंमद कासीम**

याने अहवाल-उल-खवाकीन हा ग्रंथ लिहिला. हा निजाम-उल-मुल्कचा बक्षी होता. या ग्रंथामध्ये त्याने औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या ३९ वर्षाचा इतिहास लिहिलेला आहे. तो स्वत: याकाळातील घटनांचा साक्षीदार आहे. त्याने घटनांच्या निवेदनाबरोबरच घटनांची कारणेही सांगितली आहेत.

**भिमसेन बऱ्हाणपुरी**

औरंगजेबाच्या दरबारी हा होता. त्याने नुस्का-इ-दिलकुशा हा ग्रंथ लिहिला. नोकरी निमित्त त्या साम्राज्याच्या निरनिराळया भागामध्ये प्रवास केला. औरंगजेबाची हिंदूंच्या दृष्टिकोणातून लिहिलेली आहे. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेमधील अनेक आतील बाबींवर त्याने प्रकाश टाकलेला आहे.

ईश्वरदास नागर याने फातुहत-इ-आलमगिरी या औरंगजेबाच्या कारकिर्दीवर ग्रंथ लिहिला.

**मुघलकालीन इतिहालेखन परंपरेची वैशिष्टे**

१. या काळातील इतिहासकार शासकीय सेवेतील, प्रतिष्ठित कुटुंबातील विद्वान व व्यासंगी होते. त्यांच्या लेखनामध्ये परिपक्वता व प्रगल्भता आढळून येते.

२. या काळतील लेखनामध्ये धार्मिक दृष्टिकोनाचा प्रभाव दिसत नाही. मानवी कृतीवर भर दिलेला दिसून येतो. घटनांच्या वस्तूनिष्ठ नोंदी केलेल्या आहेत.

३. समकालीन घटनांची नोंद, प्रत्यक्ष साक्षीदार व मूळ साधनांची उपलब्धता यामुळे लेखनामध्ये वास्तवता आलेली आहे.

४. दरबारी अधिकृत इतिहालेखनाचे स्वरूप प्रशंसापर व पक्षपाती तर दरबारी अनाधिकृत इतिहासलेखनामध्ये विचार व मते मोकळेपणाने मांडली आहेत.

५. इतिहासलेखनामध्ये काही ठिकाणी सत्याचा अपलाप जाणवतो

६. इतिसलेखनाचे विषय राजकिय असले तरी तत्कालीन अर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींवरही प्रकाश टाकलेला आहे

७. कालगणनेचा अचूक वापर केलेला आहे.

८. घटनांची सुसंगत मांडणी केली असली तरी त्यामधील त्यांची तर्कशुद्ध संगती लावण्याचा व त्यामागील कारणे सांगण्याचा जाणून बुजून कोणी प्रयत्न केल्याचे जाणवत नाही.

## १.३ सारांश

इतिहासलेखन परंपरेचा आढावा घेताना असे दिसून येते की प्रारंभीच्या काळी मौखिक स्वरूपामध्ये असलेला इतिहासाला कल्पकतेचे स्वरूप होते. ग्रीक इतिहासकारांनी इतिहासाला पुराव्याच्या आधारे इतिहालेखन करून इतिहासाला शास्त्रीय स्वरूप देऊन त्यामध्ये वस्तूनिष्ठता आणली. इ.स. पाचव्या शतकामध्ये इतिहासलेखनामध्ये कथातून सत्य घटनांचे वर्णन करण्याची परंपरा सुरू झाली. याकाळात सत्या सांगण्याबरोबरच घटनाक्रमाला महत्त्व दिले. याकाळमध्ये राजकिय घटनांबरोबरच सामाजिक व अर्थिक जीवनालाही महत्त्व दिले गेले.

रोमन इतिहासलेखन परंपरेमध्ये इतिहासाला शैक्षणिक मुल्य असल्याची धारणा सुरू झाली. त्यामुळे या इतिहालेखन परंपरेमध्ये राष्ट्रप्रेमाचे नितीमूल्यांचे व उत्तम नागरीकाला आवश्यक असलेल्या गुणांचे धडे देण्याची परंपरा सुरू झाली. परंतु रोमन इतिहालेखनामध्ये शास्त्रीय पद्धतीची आवश्यकता दिसत नाही. या इतिहालेखनपरंपरेमध्ये वैचारिक बैठकीचा अभाव आढळतो. या परंपरेमध्ये चरित्रलेखनाची परंपरा सुरू झाली.

अरब इतिहासलेखन परंपरेवर पर्शियन इतिहासलेखनपरंपरेचा प्रभाव दिसून येतो. या इतिहासलेखनपरंपरेमध्ये लौकिक जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले गेले. या परंपरेमध्ये एकसूत्री कालगणना पद्धतीचा वापर सुरू झाला. इतिहालेखन परंपरेला सत्याचा आधार देणारे, साधनांची पडताळणी करणारे तंत्र अरबांनी विकसित केले. ही अरबांची इतिहालेखन परंपरेला मिळालेली मोठी देणगी आहे.

भारतीय इतिहासलेखन परंपरा फार उशिरा झाली. प्राचीन काळातील भारताचा इतिहास वेद, उपनिषदे, आरण्यके, व पुराणे यातून शोधावा लागतो. परंतु यातील घटनांची पुराव्या अभावी पडताळणी करता येत नाही. याचे स्वरूप काव्यात्मक असून यामध्ये दंतकथा ही असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे

पुराणांना शास्त्रीय आधार नाही. तरीही यामधून तत्कालीन सामाजिक, राजकीय, अर्थिक व सांस्कृतिक स्थिती समजते.

भारतामधील पर्शियन इतिहासलेखन परंपरेमध्ये सुलतानशाही व मुघलकालीन इतिहासलेखन परंपरा असे दोन भाग पडतात. सुलतानांनी इतिहासकारांना राजाश्रय दिला. परंतु घटनांची तर्कशुद्ध मांडणी, घटनांचा सबंध जोडून त्याची कारण मीमांसेचा अभाव जाणवतो. बहुतेक इतिहासकार घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. त्यामुळे माहिती बऱ्याच अंशी विश्वसनीय आहे. परंतु ऐकीव माहितीची शहानीशा केलेली दिसत नाही. त्यामुळे इतिहासलेखनाचे स्वरूप निवेदनात्मक झाले आहे.

मुघलकालीन इतिहासलेखन परंपरेमध्ये घटनांच्या वस्तूनिष्ठता दिसते. या काळातील सम्राटांच्या प्रेरणेने लिहिलेला इतिहास स्तुतीपर व पक्षपाती आहे. या काळातील इतिहासलेखनातून राजकिय विषयाबरोबर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींवरही प्रकाश पडतो. यामधील कालगणना अचूक आहे या काळामध्ये आत्मचरित्र व प्रवासवर्णन ही इतिहालेखनामध्ये नवीन परंपरा सुरू झाली.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. ३

### अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा

१. पुराणांची एकूण संख्या ........... आहे.

अ) ९ ब) १६ क) ३६ ड) २६

२. पुराणांची रचना ........... यांनी केल्याचे समजले जाते.

अ) वेद व्यास ब) कौटिल्य क) वाल्मिकी ड) अगस्त्य

३. तुघलकनामा हा ग्रंथ ............. याने लिहिला.

अ) अमीर खुस्रो ब) खाफिखान क) फेरिस्ता ड) हसन निजामी

४. खाफीखान हा इतिहासकार ................ च्या दरबारात होता.

अ) शहाजहान ब) अकबर क) औरंगजेब ड) जहांगीर

५. अकबरनामा हा ग्रंथ ............. याने लिहिला.

अ) ईश्वरदास नागर ब) अबुल फजल क) मुतामत खान ड) महंमद कासीम

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पुराणे कोणाला समर्पित केली आहेत ?

२. राजकियदृष्ट्या कोणती पुराणे महत्त्वाची आहेत ?

३. सुलतानशाहीतील इतिहासलेखन परंपरेमध्ये कशाची जाणीव दिसते

४. छ. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची कोणत्या मुघल इतिहासकाराने स्तुती केली आहे.

५. मुघल इतिहासलेखन परंपरेमध्ये कशाचा अचूक वापर केला आहे?

## १.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. कालक्रम - काळानुसार मांडणी करणे

२. वस्तूनिष्ठता - सत्यता

३. कालगणना - काळ मोजणे

४. हिजरी - इस्लामी कालगणना

## १.६ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. अ) इलियड २. क) हिरोडोटस ३. अ) पॉलिबियस

४. ब) कॅटो ५. अ) हिस्ट्री ऑफ रोम

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. हिरोडोटस २. थ्यूसीडीडीज

३. पॉलिबियस ४. कॉर्नोलियस टॅसिटस

५. ज्यूलिअस सीझर

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. अ) सातव्या २. ब) अल वकीदी ३. क) इब्न बुतता

४. अ) इब्न खल्लीखान ५. ब) अल बिरूनी

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. किताब अल इबर २. किताब उल हिंद

३. पर्शियन ४. अल बहादूरी

५. अल खल्दून

## १.६ स्वयं-अध्ययन प्रश्न क्र - ३

**अ. योग्य तो पर्याय निवडून पुन्हा वाक्य लिहा**

१. क) ३६ २. वेद व्यास ३. अ) अमीर खुस्रो

४. क) औरंगजेब ५. ब) अबुल फजल

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. देवदेवतांना २. विष्णूपुराण, मत्सपुराण, ब्रह्मांडपुराण

३. घटनाक्रम व कालगणना ४. खाफीखान

५. कालगणना

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) ग्रीक इतिहासलेखन परंपरेचा आढावा घ्या.

ब) रोमन इतिहासलेखन परंपरेचा आढावा घ्या.

क) अरब इतिहासलेखन परंपरेची चर्चा करा

ड) सुलतानशाही काळातील इतिहासलेखन परंपरेचे महत्त्व विशद करा

इ) मुघल इतिहासलेखन परंपरेचे महत्त्व सांगा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. शांता कोठेकर- इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान.

२. आर.डी. गायकवाड- इतिहासलेखन शास्त्रे.

३. E.H. Car- What is History.


❋❋❋

# घटक २
# आधुनिक युरोपीय परंपरा

**अ)** **प्रत्यक्षवाद / प्रत्यक्षार्थवाद**

**ब)** **मार्कशिस्ट**

**क)** **ॲनल्स**

## अ) प्रत्यक्षवाद / प्रत्यक्षार्थवाद

### उद्दिष्ट्ये :

- प्रत्यक्षार्थवादी विचारसरणीची पार्श्वभूमी समजेल.
- प्रत्यक्षार्थवाद या संकल्पनेला वैज्ञानिक व ऐतिहासिक परिभाषेमध्ये समजून घेता येईल.
- ऑगस्त कॉम्तच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकता येईल.
- ऑगस्त कॉम्त यांच्या प्रत्यक्षार्थवादी विचारांची चिकित्सा करता येईल.
- कॉम्त प्रणीत मानवी जीवनाच्या विकासाच्या अवस्थांचे चित्रण समजून घेता येईल.
- कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादाचा इतिहासलेखनावर पडलेला प्रभाव समजेल.
- लिओपोल्ड रँके याचे इतिहासातील प्रत्यक्षार्थवादी योगदान समजून घेता येईल.

१९ व्या शतकामध्ये इतिहासामध्ये अस्तित्वात आलेला एक वैचारिक तत्वज्ञानात्मक विचार म्हणजे प्रत्यक्षार्थवाद होय. प्रत्यक्षार्थवाद या तत्वाज्ञानाचा वास्तव अर्थ म्हणजे प्रवाह मूलभूत वैज्ञानिक संशोधन पद्धतीप्रमाणेच ऐतिहासिक ज्ञानाची मांडणी करणे. एकंदरीतच प्रत्यक्षार्थवाद म्हणजे ऐतिहासिक ज्ञानाची वैज्ञानिक बांधणी होय. १८ व्या शतकामध्ये अस्तित्वात आलेल्या वैज्ञानिक क्रांतीमुळे इतिहासाच्या अध्ययनाला, संशोधनाला निबुर, रॅन्को या सारख्या अनेक इतिहासकार व संशोधकांनी वैज्ञानिक चिकित्सेची

जोड दिली. याचाच परिणाम म्हणजे ऐतिहासिक माहिती व ज्ञानाचे परिशिलन संशोधन शास्त्रीय किंवा वैज्ञानिक पद्धतीने करण्याच्या वैज्ञानिक पद्धतीला प्रत्यक्षार्थवादी असे म्हटले जाते.

**अर्थ :**

प्रत्यक्षार्थवाद हा शब्दप्रयोग दोन अर्थानी वापरला जातो. एका अर्थाने मनाची एक प्रवृत्ती (Temper of Mind) असा अर्थ आहे तर याचा दुसरा अर्थ म्हणजे तत्त्वज्ञानाची एक विशिष्ट प्रणाली म्हणजेच प्रत्यक्षवाद होय, प्रत्यत्रार्थवाद हा मुलत: एक व्यवहारप्रधान दृष्टीकोन असून हा दृष्टिकोण प्रत्येक घटनेकडे (Incident) वा घटकाकडे नेहमी शंकेने पाहतो. एखाद्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करून तो प्रश्न शास्त्रीय दृष्टिकोनातून सोडवण्याची पद्धत म्हणजे प्रत्यत्रार्थवाद होय. ऐतिहासिक ज्ञानाला वैज्ञानिक आधार देण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद असे म्हटले जाते. इतिहासाच्या ज्ञानाचे वैज्ञानिक ज्ञानात रूपांतरण करण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद म्हटले जाते. प्रत्यक्षार्थवादामध्ये वास्तव घटनामधील वैज्ञानिक तत्त्व शोधले जाते.

काल्पनिक व अमूर्त घटना, गोष्टी, विचारांमध्ये न अडकता प्रत्यक्ष मिळालेल्या वैज्ञानिक अनुभवाच्या जोरावर सत्य पडताळून पाहण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद असे म्हटले जाते. प्रत्यक्षार्थवादामध्ये वास्तव घटना आणि वैज्ञानिक तत्त्व यांनाच महत्त्व असून काल्पनिक घटना, विचार यांना प्रत्यक्षार्थवादामध्ये कुठलेच स्थान नाही. शिवाय प्रत्यक्षार्थवादाने स्वच्छंदतावादाचा विरोध करून स्वच्छंदतावादाच्या काल्पनिक स्वच्छंदतावादी ऐतिहासिक कल्पनांचा विरोध केला. प्रत्यक्षार्थवादी विचारांची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांमध्ये नीबुर आणि रैंके यांचा प्रथम क्रमांक लागतो. पूर्णता तत्थांवर आधारित व्यक्तिगत पक्षपाताचा अभाव असणाऱ्या लेखनाचा समावेश प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनामध्ये करण्यात येतो. लॉर्ड ॲक्टन यांनी 'केम्ब्रिज मॉडर्न  हिस्ट्री' साठी प्रत्यक्षार्थवादी पूर्णत: वस्तूनिष्ठ व निष्पक्ष इतिहास लेखन करण्याची सूचना दिली. जे. बी. बरी यांनी प्रत्यक्षार्थवादाला प्रोत्साहन देताना असे म्हटले की, 'इतिहास फक्त विज्ञानच होता त्यापेक्षा कमीही नाही व जास्तपण नाही' प्रत्यक्षार्थवादी इतिहास म्हणजे भूतकालीन ऐतिहासिक घटनांना कुठल्याही प्रभावापासून मुक्त ठेवून वस्तूनिष्ठ मांडणी करण्याचा तत्त्वज्ञानात्मक प्रवाह होय.

प्रत्यक्षार्थवादी इतिहासाची मांडणी, इतिहासाच्या प्रत्यक्षार्थवादी तत्त्वचिंतनाची मांडणी पहिल्यांदा फ्रान्समधील विचारवंत ऑगस्त कॉम्त (१७९८-१८९७) यांनी केली. ऐतिहासिक साधनांची निष्पक्ष मांडणी ही प्रत्यक्षार्थवादी इतिहासलेखनाची पहिली पायरी आहे असे म्हटले आहे.

**ऑगस्त कॉम्त :**

प्रत्यक्षार्थवादाबरोबरच आधुनिक समाजशास्क्षाचे जनक, पितासह असणाऱ्या कॉम्तचा जन्म इ.स. १७९८ मध्ये फ्रान्समधील मोटेपेलियर येथे झाला. ऑगस्त कॉम्तचा पिंड हा मुळातच विद्रोही स्वरूपाचा होता. कॉम्त यांनी काही काळ गणिताचे शिक्षक म्हणून काम केले व नंतर सेंट सिमो यांचे सचिव म्हणून काम केले. हे करत असतानांच कुठल्याही बंधनात अडकण्याचा कुठल्याही चमत्कारी विचारात न अडकण्याचा, कुठल्याही धार्मिक संकल्पनेत न अडकणाऱ्या कॉम्तच्या विचाराने बंडाला सुरूवात केली. कॉम्तच्या विचारांची उभारणी उच्च मानवतावादी मूल्यावर आधारित होती. गृहस्थ/पारिवारी, सांसारिक जीवनामध्ये अस्थिर आणि आर्थिक व शारीरिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या कॉम्तची सामाजिक संरचनेच्या सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील निरीक्षणे अतिशय सूक्ष्म होती. आर्थिक दृष्ट्या जरी हालाखिची परिस्थिती असली तरी कॉम्त कमालीचा आशावादी होता. स्वत:ला मानवतेचा धर्मगुरू घोषित करणारा  ऑगस्त कॉम्त यांच्या समाजशास्त्राला दिलेल्या रचनात्मक व वैज्ञानिक योगदानामुळे त्यांना आधुनिक समाजशास्त्राचा जनक म्हटले जाते.

कॉम्तचे आईवडील कॅथालिक पंथीय होते. कॉम्तचे प्राथमिक शिक्षण त्याच्या गावीच झाले. इ.स. १८१४ मध्ये तो इकील पॉलिटेक्निकमध्ये दाखल झाला. कॉम्तवर बेंजामिन फ्रँकलिन यांचा प्रभाव होता. त्याचबरोबर डिमॉइस्टर या परंपरावाद्यांपासून कॉम्त ने उत्क्रांतीचे तत्त्व तो शिकला. 'समाज हा नेहमी उत्क्रांत होत असून ही उत्क्रांती एका विशिष्ट शिस्तीमधून होत असते हे तत्त्व त्याने शोधले. १९३० साली कॉम्तने Course of positive philosophy हा ग्रंथ लिहला. या ग्रंथाचे सहा खंड त्याने लिहले. या ग्रंथामध्ये समाजशास्त्रीय विचारांचा उहापोह केलेला आहे. Positive Policy हा ग्रंथसुद्धा विशेष मान्यता पावला. याबरोबरच कॉम्तच्या अन्य ग्रंथामधूनही कॉम्तने मानवी विचारशक्तीचा विकास आणि त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण यांची चर्चा केली आहे. ऑगस्त कॉम्त पूर्वी फ्रान्समध्ये परिवर्तनवादी विचारवंत हेन्री डे सेंट सिमो यांनी पूर्वाश्रमीच्या अवैज्ञानिक तथ्य असणाऱ्या सर्वच ऐतिहासिक मिथकांना निकालात काढण्याची परंपरा निर्माण करून 'प्रत्यक्षार्थवाद' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ज्यामध्ये न्यूटनच्या वैज्ञानिक संशोधन पद्धतीचे समर्थन करून सामाजिक शास्त्रांना वैज्ञानिक तत्त्वांच्या आधारे समजून घेवून ज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये हे विचार विकसित करण्यात आले.

ऑगस्त कॉम्तच्या वैचारिक प्रणालीला प्रत्यक्षार्थवादी म्हटले जाते कारण या प्रत्यक्षार्थवाद या नावामध्येच निश्चित, सुस्पष्ट, पूर्ण गुणवत्ता असून हीच तत्त्वे हेच गुण वैशिष्ट्ये व लक्षण भौतिक, नैसर्गिक विज्ञानाच्या नियमांना लागू होतात. प्रत्यक्षार्थवाद्यांच्या मते, ज्या पद्धतीने वैज्ञानिक निसर्ग विज्ञानाचे शास्त्रीय

अध्ययन करतात. त्या प्रमाणेच समाजातील मानवाचे अध्ययन केले पाहिजे आणि हे शक्य आहे. त्याबरोबरच ऐतिहासिक आणि सामाजिक स्थित्यंतरांच्या मागच्या निश्चित वास्तवाला शोधणे शक्य आहे. ज्ञानाच्या प्रगत अवस्थांना लक्षात घेवून बौद्धिक विचारांना वेगळे वळण लावले पाहिजे असे कॉम्त यांना वाटत असे. कॉम्त यांना शास्त्रीय व वैज्ञानिक स्वरूपाचे ज्ञान अपेक्षित आहे. त्यांच्या मते, 'समाजाची पुनर्रचना होत असतांना केवळ शास्त्रीय व सामाजिक दृष्टिकोन जीवनातील प्रत्यक्ष घटनांचे ज्ञान असून भागणार नाही. तर शास्त्रीय दृष्टीकोन व वास्तव घटना यामध्ये समन्वय साधने आवश्यक आहे. कॉम्तच्या मते समाजाची सुधारणा व पुनर्रचना करण्यासाठी समाजाचे नियम आधी माहित असले पाहिजेत. समाजाचे असे नियम समजण्यासाठी वासत्व ज्ञान हे निरीक्षण आणि अनुभव यांच्या सहाय्याने मिळू शकते आणि असे ज्ञान हेच प्रत्यक्षार्थवादी असते.

**विकासाच्या तीन अवस्था :**

वयाच्या २४ व्या वर्षी कॉम्त यांनी विकासाच्या तीन अवस्थांचे प्रतिपादन केले. या नियमानुसार सर्व मानवी समाजाच्या सर्व काळात मानवी बुद्धिच्या विकासाचा आढावा घेत असतो. ज्यावेळी आढावा घेतला जातो तेंव्हाच एका श्रेष्ठ आणि आधारभूत अशा नियमांचा शोध लागतो आणि हा नियम तीन अवस्थांमधून जातो त्या अवस्था खालीलप्रमाणे.

१. ईश्वरशास्त्रीय

२. सत्ताशास्त्रीय

३. प्रत्यक्षार्थी किंवा वास्तववादी

**१. ईश्वरशास्त्रीय (Theological) :**

ही मानवी जीवनाची प्रथम अवस्था असून यालाच धर्मशास्त्रीय अवस्था असेही म्हटले जाते. या अवस्थेमध्ये प्रत्येक गोष्टीचा विचार हा अलौकिक अशा दैवी शक्तीच्या माध्यमातून केला जात असे. या अवस्थेमध्ये मानवाने प्रत्यख घटनेच्या मागे ईश्वर आहे हे ग्रहीत धरले होते. मानवाची ही अवस्था त्याच्या चिंतनाची पहिली अवस्था होय. या अवस्थेमध्ये चेतना व चराचरातील वस्तूमध्ये आत्मतत्व भरलेले असण्याबरोबरच सर्वत्र आत्म्याचाच प्रभाव असतो. त्यानंतर अनेकेश्वरवाद व एकेश्वरवाद या तीन अवस्थांमधून ईश्वरशास्त्रीय अवस्थेचा कालखंड जातो.

## २.	सत्ताशास्त्रीय (Metaphysical) :

ही मानवी उत्क्रांतीमधील दुसरी अवस्था असून या अवस्थेमध्ये ईश्वराचे अस्तित्व व संकेत नाकारण्यात येवून या कालखंडामध्ये किंवा अवस्थेमध्ये घटनांच्या पाठीमागे एक सदवस्तूशास्त्रीय अमुर्त अशी शक्ती असते. ही अवस्था ईश्वराचे अस्तित्व न मानता एका अमुर्त शक्तीचे अस्तित्व मानते. याच अवस्थेमध्ये राष्ट्रवाद व सार्वभौमत्व निर्माण झालेले असून पहिल्या व तिसऱ्या अवस्थेमधील साखळी साधणारी ही एक अवस्था आहे.

## ३.	प्रत्यक्षार्थी किंवा वास्तववादी (Positivistic) :

ही अवस्था वास्तववादी असून या अवस्थेमध्ये गुढ रहस्यमयतेचा पूर्णत: नायनाट होवून या अवस्थेमध्ये घटनांमधील एकविध सबंधाचा शोध घेवून त्या घटना कोणत्या पद्धतीने कोणत्या रीतीने घडतात असे प्रश्न या अवस्थेमध्ये विचारण्यात येवू लागले. 'निरपेक्ष कारणांच्या ठिकाणी निसर्गनियम बनविले' घटनांमधील संबंध निरीक्षणाच्या पद्धतीने शोधून काढण्याबरोबरच तर्काला व विचारांना पटणारे सत्यच स्वीकारण्याची पद्धत सुरू झाली. कार्यकारणसंबंधाना शोधण्याच्या या प्रवृत्तीमधून वैज्ञानिक वास्तववादी प्रत्यक्षार्थी पद्धत सुरू झाली. यालाच वास्तववादी प्रत्यक्षार्थवादी किंवा विज्ञानावस्था म्हटले जाते.

कॉम्तच्या मते प्रत्यक्षार्थी या शब्दाचा अर्थ सत्य (Real), उपयुक्त (Useful), निश्चित (Certain), संशयातीत (Indubitable), अचूक (Exact) असा आहे. असे हे प्रत्यक्षार्थवादी ज्ञान वैकल्पिक ज्ञानाचा स्वीकार करत नसून जे वास्तवात दिसते त्याचाच र्थ लावून सामान्यीकरण करून सार्वदेशिक नियम शोधून काढण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेच प्रत्यक्षार्थवाद हा वस्तूचे, घटनेचे यथार्थ वर्णन करतो. वस्तू किंवा घटना घडण्याची योग्य रीत व पद्धती स्पष्ट करतो. कॉम्तच्या मते, कोणतेही तत्त्वज्ञान वरील तीन अवस्थांमधूनच विकास पावते.

कॉम्तच्या सिद्धांताची चर्चा करीत असताना प्रा. बी. शेख अली याने कॉम्तच्या तत्त्वज्ञानाचे पाच भाग पाडले आहेत.

१.	प्रत्यक्षार्थवादी पद्धतीचा केलेला स्वीकार किंवा इतिहासाला बहाल केलेली शास्त्रीय पद्धती.

२.	बौद्धिक प्रगतीच्या तीन अवस्था व नियम.

३.	शास्त्रांचे वर्गीकरण.

४.	समाजसास्त्राच्या पूर्वीच्या सर्व शास्त्रांच्या तत्त्वज्ञानाची केलेली संकल्पना.

५.	प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाच्या पद्धतीचा केलेला समन्वय.

मानवी समाज प्रत्यक्षार्थवादापर्यंतच्या अवस्थेत जाण्यापूर्वी त्याला अराजक व क्रांती या दोन अवस्थेमधून जावे लागते. कॉम्तने भौतिकशास्त्रे व शमाजशास्त्रे एकमेकांशी संबंधित आहेत हे दाखवून देण्याबरोबरच प्रत्यक्षार्थवादासाठी कॉम्तने शास्त्रांचा अनुक्रमही खालील प्रमाणे मांडला आहे. उदा. गणित, जोतिषशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि समाजशास्त्र यातील प्रत्येक शास्त्र हे त्याच्या आधिच्या शास्त्रावर अवलंबून आहे. उदा. समाजसास्त्र हे जीवशास्त्रावर अवलंबून आहे तर जीवशास्त्र हे रसायनशास्त्रावर अवलंबून आहे. अशा विश्लेषणातून सामाजिक इतिहास लिहीत असतांना संभाव्य नियमांची चर्चा करून प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाला आकार दिला.

जगातील कोणतीही घटना अनाकलनीय अशा घटनांमुळे घडत नसते. हाच या प्रत्यक्षार्थवादाचा मूळ गाभा आहे. प्रत्यक्ष बुद्धिगम्य विचाराला, तर्काला पटेल असा सामाजिक वाटचालीचा आलेख प्रत्यक्षार्थवादी तत्त्ववेत्यांनी मांडला. या प्रत्यक्षार्थवादी विचारांची मांडणी समाजशास्त्रीय भूमिकेतून केली गेली. घटना का घडतात, या प्रश्नाचा शोध घेवून मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावण्याऐवजी घटना कशा व कोणत्या रितीने घडतात हे समजून घेण्याचा प्रयत्न प्रत्यक्षार्थवादी अन्वयार्थात केला गेला आहे. निरीक्षण केले गेले व निरीक्षणातून काही सर्वसामान्य नियम तयार केले गेले. तर्काला, बुद्धिला पटणारे सत्य उलगडले गेले. कार्यकारणसंबंध प्रस्थापित केले गेले व मानवी जीवनाचा अभ्यास हा निश्चित, अचूक, सत्य व संशयातील पद्धतीने शास्त्रीय निकषांवर केला जावू लागला व त्या आधारे प्रत्यक्षार्थवादी अन्वयार्थ लावला जावू लागला. जे वास्तव्यात दिसते त्याच्याच आधारे या भौतिक जगातील घटना, प्रसंग याची सुसंगती लावली गेली.

प्रत्यक्षार्थवादावर लिहिलेल्या एकंदरीत सहा पुस्तकांमधून सहा पुस्तकांमधून ऑगस्त कॉम्त ने एकच मत पुन्हा पुन्हा पटवून सांगितले की, बुद्धिमत्तेच्या कसोटीवर घासून समाजाला पटतील असेच विचार मांडावे. मानवी विचार शक्ती, मानवी विचारांचे वैज्ञानिक विश्लेषण, समाजातील परीवर्तन यामधून नव्या विचारांची रचना होते असे कॉम्त म्हणतो.

## लिओपोल्ड रँके : १७९५-१८८६

रँके हा जर्मन इतिहासकार असून बर्लिन विद्यापीठामध्ये इतिहासाचा प्राध्यापक म्हणून कार्य केले. हा ऑगस्त कॉम्तच्या समकालीन असून याने इतिहास संशोधनामध्ये प्रत्यक्षज्ञानवादाची मुहूर्तमेढ पद्धतशीरपणे रोवली. इतिहासलेखनामध्ये शास्त्रीय पद्धतीचा वापर करण्याचा आग्रह केल्यामुळेच रँकेला 'आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा जनक' असे म्हटले जाते. इतिहासाला दैववादी चौकटीतून बाहेर

काढण्याचे काम रँके ने केले. शिवाय रँकेने नीतिबोधात्मक इतिहासाचा निषेध केला. No Document No History हा विचार दिला. त्याच्या Universal History नावाच्या आपल्या सहा खंडामध्ये विभागलेल्या ग्रंथातून ही प्रचिती येते. याशिवाय त्याने रोमन, जर्मनी व रशिया या देशांचा इतिहास प्रत्यक्षवादी विचारपद्धतीने लिहीला.

रँकेच्या या वस्तूनिष्ट इतिहास लेखनामुळेच खूप मोठ्या प्रमाणात इतिहासाबद्दल इतिहासकारांच्या मनामध्ये जाणिवा निर्माण झाल्या. कारण इतिहासाला शास्त्र मानणारा तो पहिला इतिहासकार होता.

**रँकेचे इतिहासलेखनविषयीचे विचार :**

१. सत्य हाच इतिहासाचा आत्मा आहे व इतिहास हेच शास्त्र आहे.

२. पुराव्याशिवाय वस्तूनिष्ठ इतिहासलेखन होवू शकत नाही.

३. साधनांची वस्तूनिष्ठ प्रत्यक्ष चिकित्सा करावी.

४. इतिहास ही स्वायत्त ज्ञानशाखा असून तिच्या अध्ययनाची निश्चित उद्दिष्टे व विशिष्ट निर्धारित तंत्र आहे.

५. इतिहासलेखनामध्ये कल्पना व गुढवादाला मुळीच स्थान देवू नये.

प्रत्यक्ष ज्ञानवादी विचारांच्या प्रभावातून रँकेने आधुनिक कालखंडाच्या इतिहासलेखनामध्ये नवक्रांती घडवून आणली.

**प्रतयक्षार्थवादी तत्त्वज्ञान व इतिहास लेखन :**

प्रत्यक्षार्थवाद म्हणजे प्रत्यक्षज्ञान होय. प्रत्यक्षार्थवाद म्हणजे निश्चित, नि:संदिग्ध, वादातील स्वरूपाचे चिरंतन ज्ञान होय. विज्ञानशाखेतील संशोधनाप्रमाणे इतिहासकारांनी गतकालीन मानवी जीवनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा व सत्यशोधून काढावे असा या विचारप्रणालीचा आग्रह आहे. प्रत्यक्षार्थवादी विचारसरणी ही अनुभवसिद्ध विचारसरणी असून या विचारसरणीनुसार गतकालीन मानवी जीवनातील वास्तवाचे शास्त्रीय पद्धतीचा वापर करून सत्यदर्शन घडवणे अभिप्रेत आहे. ही प्रत्यक्षार्थवादी विचारसणी इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे श्रेय जर्मन इतिहासकार लिओपाल्ड रँके व फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्त कॉम्त यांना जाते. आपल्या प्रत्यक्षवादी सिद्धांताच्या आधारावर इतिहासाचा सामाजिक शास्त्राद्वारे अन्वयार्थ

लावण्याचा मार्ग भावी पिढीला खुला करून दिला. विज्ञानामुळे दूरदृष्टी प्राप्त होते आणि दूरदृष्टी कृतीला जन्म देते. Positive philosophy of history असा शब्दप्रयोग कॉम्त ने पहिल्यांदा केला. त्याच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाने इतिहास लेखनाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली. ऐतिहासिक सत्यावर भर दिल्यामुळे इतिहासाला विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला. शास्त्रीय ज्ञान व अनुभवसिद्ध प्रयोगाद्वारे मूलभूत सत्याचा शोध लागला की त्याचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करता येतो. ही ऑगस्त कॉम्तच्या प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक आहे. कॉम्तच्या मते, इतिहासाच्या अभ्यासकाने केवळगतकालीन सत्य घटनांचा शोध लावणे एवढेच इतिकर्तव्य न मानता त्या घटनांमागील आंतरिक सूत्र शोधून काढावे, त्यातून सर्वसामान्य नियम शोधावेत. यातून मानवी व्यवहारांचे नियमन करणाऱ्या मूलभूत सूत्रांचा शोध लागला तर त्या आधारे भविष्यात मानवी जीवनाला दिशा देता येईल.

ऑगस्त कॉम्तने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये गुढवादी इतिहासलेखन पद्धती नाकारून इतिहासलेखनासाठी मूळ स्त्रोत साधनांच्या अभ्यासावर व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्यावर आणि ते सत्य वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडण्यावर भर दिला. ज्याप्रमाणे शास्त्रज्ञ निसर्गाच अभ्यास करतात. त्याचप्रमाणे समाजाचा शास्त्रीय ज्ञानावर आधारित अभ्यास करावा. इतिहासाचा अभ्यास करावा असे कॉम्त यांना वाटते. ज्याप्रमाणे निसर्गातील घटनांमध्ये एकप्रकारची शिस्त असते घटनाक्रम ठरलेला असतो. तशाच प्रकारची घटना व शिस्त मानवी समाजात असते. कॉम्तच्या मते, ऐतिहासिक घटनांकडे उत्क्रांतीवादातून पाहिले पाहिजे. इतिहासातील सत्य शोधण्यासाठी शास्त्रीय पद्धत हाच इतिहासाचा आधार विचारांचा आधार असावा असे कॉम्त सांगतात.

१. ऐतिहासिक घटनांची तुलना करणे व समाजाची उत्क्रांती कशी झाली याचा तुलनात्मक विचार करणे हा प्रत्यक्षार्थवादाचा आधार आहे.

२. नैसर्गिक शास्त्राने ज्या प्रमाणे आपले नियम सिद्ध केले आहेत त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्राने नियम सिद्ध केले म्हणजे त्याला सामाजिक शास्त्राचे स्वरूप प्राप्त होईल.

३. इतिहासाचा अभ्यास सत्यशोधण्यापुरता सिमीत नसावा तर मानवी व्यवहाराच्या शास्त्रीय अध्ययनातून हाती आलेल्या सत्याच्या आधारे त्याबाबत काही सिद्धांत शोधून काढता येतील. त्यांच्या जोरावर इतिहासातील घटनांचा सामान्य अभ्यास केल्यास त्या विषयाला शास्त्रशुद्ध पाया लाभेल.

४. इतिहास हे मानव्यशास्त्र असल्यामुळे शास्त्राचे नियम पूर्णपणे इतिहासाला लागू करता येत नसले तरी निरीक्षण, चिकित्सा, विश्लेषण, सत्य असत्याचा निर्णय या पद्धतीचा वापर करून इतिहासात देखील सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात.

५. प्रत्यक्षज्ञानवादात अथवा विज्ञानवादात कल्पना, श्रद्धा यांना स्थान नसून निरीक्षण, प्रयोगात्मकता, परीक्षण, वर्गीकरण विश्लेषण असे सूत्रबद्ध व्यवस्थापन असते.

६. निसर्गवादाच्या अभ्यासाप्रमाणे प्रत्यक्षार्थवादाच्या अभ्यासामुळे मानवाची गतकाळातील वाढ आपल्याला कळू शकेल व त्याच्या आधारावर आपल्याला भविष्य वर्तविणे शक्य होईल.

एकूणच ऑगस्त कॉम्त व रॅन्केच्या योगदानामुळे इतिहास लेखनामध्ये वास्तववादी दृष्टिकोण विकसित झाला.

**प्रत्यक्षार्थवादाचा इतिहासलेखनावरील प्रभाव :**

कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादाचा इतिहास लेखनावरील प्रबाव हा १९ व्या शतकातील नैसर्गिक विज्ञानाचा प्रत्यक्ष परिणाम होता कारण १९ व्या शतकामध्ये विज्ञानाच्या संशोधनाला गतिशिलता प्राप्त झालेली होती. मुलत: गणिततज्ज्ञ असलेल्या कॉम्त याने विज्ञानाच्या तत्त्वाच्या आधारे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रामधील प्रयोग पद्धती संशोधनपद्धतीचा अवलंब सामाजिक शास्त्राच्या संशोधनामध्ये केला. या संशोधनामध्ये त्याने सर्वप्रथम तथ्यांचे संकलन करण्यापासून ते मांडत असलेल्या विधानाचा आराखडा करण्यापासून ते प्रत्येक छोट्या छोट्या घटकांकडे वैज्ञानिक दृष्टिकोणातून पाहून संशोधनातील सामान्यीकरणाच्या पायरीपर्यंत संशोधनाला अगदी वस्तुनिष्टतेने आपल्या वैज्ञानिकी चिकिस्तेतूनच निश्चित आकार दिला.

इतिहासावरील कॉम्तचे विवेचन हे अतिशय मौलिक असण्याबरोबरच सामाजिक विज्ञानाच्या सर्वच शाखांवर खूप व्यापक प्रभाव पाडणारे, सखोल प्रबाव पाडणारे होते. नवीन विचार व चिंतनाचे बिजारोपण करण्याच्यामध्ये सर्वात सशक्त चिंतनकर्ते आणि बौद्धिक प्रेरणास्त्रोत म्हणून फ्रान्सच्या इतिहासामध्ये डेकार्ट नंतर महान विचारवंत होते. प्रत्यक्षार्थवादामुळे किंवा प्रत्यक्षार्थवादाच्या प्रभावामुळे इतिहासाच्या विकासामध्ये आणि ऐतिहासिक ज्ञानामध्ये अभूतपूर्व वृद्धी झालेली दिसून येते. त्याचबरोबर एका नवीन प्रकारची विचारसरणी, प्रत्यक्षार्थवादामुळे अस्तित्वात आली. प्रत्यक्षार्थवादी मग ते रॅन्कोवादी असोत किंवा कॉम्तवादी असोत. त्यांनी तत्थसंकलनाच्या चमत्कारीक प्रभावाची सुरूवात करून विश्लेषणाचा एक नरीन मार्ग अनुसरला. इतिहासकारांना त्या सर्व सामग्रीतून तथ्य संकलन करण्याची प्रेरणा दिली मग ती तथ्ये पुरातत्वांमध्ये असोत, शिलालेखांमध्ये असोत, किंवा साहित्यत असोत त्यामुळे अतिशय विस्तृत आणि सखोल परिप्रेक्षातून शोध घेवून ऐतिहासिक सामग्रीचे संकलन करण्याचा नवीन संरचनेमुळे इतिहासाच्या ज्ञानामध्ये अभूतपूर्व वृद्धि झाल्याचे दिसून येते.

प्रत्यक्षार्थवादी तत्त्वचिंतकांच्या मते इतिहासाच्या प्रत्येक तथ्यांमध्ये एक पूर्ण संपूर्ण अस्तित्व असून हे या सूक्ष्म तथ्यांचा व्यापक विस्तार होवू शकतो. त्यामुळे ही तथ्ये मूलभूत असण्याबरोबच स्वतंत्र, व्यापक व सर्वकष असतात. त्यामुळे इतिहासकाराद्वारा त्यावर मत मांडण्याच्या ऐवजी ते जसे आहेत तसे त्यांची चिकित्सा केली पाहिजे.

ऑगस्त कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादी विचारधारेच्या अनुसार 'मानवी समाज वैज्ञानिक संशोधनासाठी उपयुक्त' आहे आणि खऱ्या अर्थाने त्यामुळेच आधुनिक समाजशास्त्राचा उदय झाला आणि तद्नंतर या प्रत्यक्षार्थवादी विचारांनुसार ऐतिहासिक घटनांची मांडणी करून असे निष्कर्ष काढले की त्रिकालाबाधीत असतील. म्हणजेच प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान इतिहासाची ऐतिहासिक घटनेची उकल करण्याबरोबरच अशा काही सामान्य विधानांची मांडणी करतात की त्या आपल्याला इतिहासचक्रामध्ये पुन्हा पुन्हा आढळतात. उदा. नैसर्गिक/प्राकृतिक विज्ञानामधील विधान, रासायनिक, भौतिक किंवा गणितीय समिकरणे जी कुठल्याही काळात तशीच लागू पडतात. त्याच पद्धतीने प्रत्यक्षार्थवादी विधाने जरी पूर्णत: लागू होत नसली तरी ती पूर्णतेच्या जवळपास जातात. उदा. १५८ देशांच्या संविधानाचा अभ्यास करून ऑगस्त ने असे मत मांडले की किंवा मांडण्यास समर्थ झाले की, ''क्रांतीसाठी सर्वसामान्य कारण म्हणजे सुविधासंपन्न आणि सुविधाविहीन वर्गाच्या मध्ये असणारा संघर्ष आहे.'' अशी वस्तूनिष्ठ वास्तवदर्शी मते जी प्राकृतिक विज्ञानाच्या जवळ जाणारी ही प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानामध्ये व तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक संशोधनीय संरचनेमध्ये अभिप्रेत आहेत.

प्रत्यक्षार्थवादी पद्धतीने इतिहासाचे, ऐतिहासिक घटनांचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, अतिशय छोट्यात छोट्या घटनेची सुद्धा सूक्ष्म पातळीवर चिकित्सा केली जाते. मुलत: प्रत्यक्षार्थवाद हा व्यवहाराप्रधान दृष्टिकोण असून तो विश्वाच्या व्यापक स्वरूपाच्या घडामोडींच्या तत्त्वाच्या मागे लागत नाही तर तो विश्वातील एखाद्या विशिष्ट प्रश्नावर लक्ष केंद्रित करून तो प्रश्न शास्त्रीय दृष्टिकोनातून कसा सोडवता येईल याचा विचार करतो. एकंदरितच प्रत्यक्षार्थवादींना असे वाटते की सर्व ज्ञानातील समान तत्त्वे शोधून त्याच्या आधारे समाजाची नवी रचना करावी म्हणजे जगाला चांगले मार्गदर्शन मिळेल. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानामध्ये वास्तव घटना व वैज्ञानिक तत्त्व यांना फार मोठे महत्त्व दिले असून प्रत्यक्षार्थवादामध्ये अनाकलनीय, समजण्यापलीकडे असणाऱ्या गोष्टींना थारा नाही प्रत्यक्षार्थवादी दृष्टिकोण पूर्णत: वैज्ञानिक स्वरूपाचा असून काल्पनिक गोष्टी व अमुर्त कल्पनांना यामध्ये स्थान नाही.

**सारांश :**

शास्त्रीय ज्ञान व अनुभवसिद्ध प्रयोगाद्वारे मूलभूत सत्याचा शोध लागला की त्याचा उपयोग मानवी समाजाच्या विकासासाठी करता येतो ही प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक आहे. प्रत्यक्षार्थवादामध्ये फक्त गतकालीन घटनांचे सत्य शोधणे एवढेच नाही तर त्या घटनांमधील आंतरिक सूत्र शोधून काढून त्यातून सर्वसामान्य नियून शोधावेत याद्वारे भविष्यामध्ये मानरी जीवनाला दिशा देता येईल.

गुढवादी इतिहास लेखनपद्धती, दैववादी इतिहास लेखनपद्धती नाकारून शास्त्रीयच पद्धतीनेच सत्यशोधनाचा नवा राजमार्ग, प्रत्यक्षार्थवादाने अगिकारला. ज्या पद्धतीने निसर्गनियमाला एक प्रकारची शिस्त असते तिच शिस्त मानवी समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न या प्रत्यक्षार्थवादाने केला. प्रत्यक्षार्थ वादामध्ये कल्पना व श्रद्धा यांना स्थान नसून निरीक्षण, प्रयोगात्मकता, परीक्षण, विश्लेषण याला स्थान असते. हेच प्रत्यक्षार्थवाद्यांनी दाखवून दिले. इतिहासाला दैववादी चौकटीतून बाहेर काढून शास्त्रीय ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त करून देण्याचे कार्य प्रत्यक्षार्थवाद्यांनी केले. इतिहासाला शास्त्र बनवण्याचे कार्य प्रत्यक्षार्थवाद्यांनी केले. साधनांचा शास्त्रीय शोध व चिकित्सा यावर प्रत्यक्षवादाचा भर असून प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनामुळे इतिहासाच्या क्षेत्रात नवक्रांती घडून आली. प्रत्यक्षार्थवादाने पूर्वीच्या अवैज्ञानिक तथ्य असणाऱ्या सर्वच ऐतिहासिक मिथकांना निकालात काढले.

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाचा उगम कोणत्या शतकामध्ये झाला.

उत्तर : १९ व्या

२. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाने कोणत्या तत्त्वज्ञानाचा विरोध केला.

उत्तर : स्वच्छंदतावाद

३. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांमध्ये कोणाचा प्रथम क्रमांक लागतो.

उत्तर : नीबुर आणि रँके

४. पूर्णत: तथ्यांवर आधारित व्यक्तिगत पक्षपाताचा अभाव असणारे तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाणारे तत्त्वज्ञान कोणते ?

उत्तर : प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान

५. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाचा उद्‌गम कोणत्या राष्ट्रात झाला ?

उत्तर : फ्रान्स

६. ऑगस्त कॉम्त यांनी मानवी समाज जीवनाच्या विकासाच्या किती अवस्थांचे वर्णन केले.

उत्तर : तीन

७. राष्ट्रवाद व सार्वभौमत्व या संकल्पनाचा विकास मानवी जीवनाच्या कितव्या अवस्थेमध्ये असतो.

उत्तर : दुसऱ्या

८. प्रत्यक्षार्थवादी विचारसरणी इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे कार्य कोणत्या जर्मन इतिहासकाराने केले ?

उत्तर : लिओपाल्ड रँके

९. प्रत्यक्षार्थवादामध्ये कोणत्या शक्तीला थारा नाही ?

उत्तर : दैवीशक्ती

१०. Positive philosophy of history असा शब्दप्रयोग सर्वप्रथम कोणी केला ?

उत्तर : ऑग्सत कॉम्त

**रिकाम्या जागा भरा.**

१. फ्रान्समध्ये ....... या लेखकाने प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाची मांडणी केली ?

अ) टॉयन्बी    ब) कार्लाइड    क) ऑगस्त कॉम्त    ड) जे. बी. बरी

२. फ्रान्समधील ........ येथे कॉम्तचा जन्म झाला ?

अ) पॅरीस    ब) बॉन    क) मोंटपेलियर    ड) सिडनी

३. Course of Positive Philosophy हा ग्रंथ कॉम्तने ....... या वर्षी लिहला.

अ) १८३०    ब) १८३२    क) १८३४    ड) १८३६

४. ......... या ग्रंथाच्या प्रभावामुळे १८४८ मध्ये फ्रान्स येथे Positive Society ची स्थापना करण्यात आली.

अ) The Positivist ब) Positive Policy

क) The Revolution ड) Rights of men

५. आधुनिक समाजशास्त्राचे जनक म्हणून कोणाला ........ ओळखले जाते.

अ) रूसो ब) हिल्टन क) ऑग्सत कॉम्त ड) जार्ज फ्रर्नांडिस

६. आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा जनक असे ......... यांना म्हटले जाते.

अ) ऑगस्त कॉम्त ब) लिओपोल्ड रँके क) टायन्बी ड) कार्लाइल

७. Universal History या ग्रंथाचे लेखक ....... होते.

अ) मार्क ब्लाक ब) फ्रॅनाद ब्रॉडेल क) लिओपोल्ड रँके ड) फेबरेव

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. ऑगस्त कॉमच्या प्रारंभिक जीवनावर प्रकाश टाका ?

२. प्रत्यक्षार्थवादी विचारांच्या उगमाची पार्श्वभूमी विशद करा ?

३. कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादी विचारांची चर्चा करा.

४. मानवी जीवनाच्या विकासाच्या तिन्ही अवस्थांचे विश्लेषण करा.

५. प्रत्यक्षार्थवादी विचारांचा इतिहासलेखनावर पडलेल्या प्रभावाची चर्चा करा ?

६. लिओपोल्ड रँकेच्या प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनासंबंधीची भूमिका विशद करा ?

७. प्रत्यक्षज्ञानवादी सिद्धांत स्पष्ट करून त्याचा इतिहासललेखनावर काय परिणाम झाला त्याची मांडणी करा ?

८. लिओपोल्ड रँकेच्या इतिहासलेखनातील योगदानाची चर्चा करा.

## पारिभाषिक शब्द :

प्रत्यक्षार्थवादी : ऐतिहासिक ज्ञानाला वैज्ञानिक आधार देण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद असे म्हणतात. प्रत्यक्षार्थवाद म्हणजे निश्चित निस:संदिग्ध वादातील स्वरूपाचे चिरंतन ज्ञान होय.

ऑगस्त कॉम्त : हे मूलत: समाजशास्त्रज्ञ होते त्यांनी समाजशास्त्रीय संकल्पनाच्या आधारे टीकात्मक पद्धतीने इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्याचा अन्वयार्थ प्रत्यक्षज्ञानावर आधारित असल्याने त्यांच्या सिद्धांताला प्रत्यक्ष ज्ञानवाद म्हणतात.

# ब) मार्क्सशिष्ट

## उद्दिष्ट्ये :

- कार्ल मार्क्सच्या जीवन चरीत्राचा थोडक्यात आढावा घेता येईल.
- कार्ल मार्क्सच्या ग्रंथ संपदेचा मागोवा घेता येईल.
- मार्क्सच्या आर्थिक, धार्मिक विचारांची पार्श्वभूमी समजून घेता येईल.
- कार्ल मार्क्स याचा वर्गसंघर्षाचा विचार समजून घेता येईल.
- मार्क्सप्रणीत मानवी वाटचालीच्या ऐतिहासिक अवस्था समजून घेता येतील.
- मार्क्सप्रणीत विरोधविकास व द्वंदविकासी भौतिकवादाची मांडणी करता येईल.
- मार्क्सवादी विचाराचा भारतीय इतिहासावरील पडलेल्या प्रभावाचे अवलोकन करता येईल.
- मार्क्सवादी विचारांचा / इतिहासाचा आशय भारतीय परिक्षेत्रामध्ये समाविष्ट करणाऱ्या भारतीय संशोधक, विचारवंताच्या कृतींची (ग्रंथाची) सखोल माहिती मिळवता येईल.

## प्रास्ताविक :

कार्ल मार्क्स हा मुलत: इतिहासवेत्ता होता. साम्यवाद-मार्क्सवादाचा प्रणेता, आधुनिक राजकीय विचारवंत असण्याबरोबरच इतिहासाच्या अध्ययनाचा नवप्रवाह मार्क्सवादी प्रवाह निर्माण केला. आधुनिक

इतिहासलेखनात स्वतंत्र अस्तित्व दर्शविणारा इतिहासकार म्हणून मार्क्स ओळखला जातो. सामाजिक परीवर्तनाचे मूळ विचारांमध्ये असतात. एक आहे रे ? व दुसरा नाही रे ? उत्पादनाची साधने आपल्या हाती असलेले आहे रे हा वर्ग नेहमीच 'नाही रे' वर्गाचे शोषण करीत असतो या संघर्षाचे स्वरूप नेहमी धर्म, जात, वर्ण, संस्कृती अशा अनेक स्वरूपात दिसत असले तरी त्याचे खरे स्वरूप आर्थिक लाभावरच केंद्रित असते. संपूर्ण मानवी वाटचाल ही संघर्षाची कहानी आहे या मार्क्सच्या विचाराने इतिहासाची चिकित्सा करण्याची मार्क्सवादाबरोबरच नवमार्क्सवादाची परंपरा निर्माण झाली. 'गतकालीन मानवी वाटचालीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून 'उत्पादन पद्धती' हा सर्व मानवी व्यवहाराचा मुलाधार आहे असा नवा क्रांतीकारी निष्कर्ष मार्क्सने काढला. परिणामत: इतिहासाच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली. मानवी जीवनातील आर्थिक अंगाचे महत्त्व अधोरेखित करून आर्थिक व सामाजिक इतिहास लेखनाची नवी दालने भावी पिढ्यांसाठी खुली झाली.

## जार्ज विल्यम फ्रेडरिक हेगेल १७७०-१८३१

कार्ल मार्क्स व फ्रेडरिक हेगेल यांनी प्रतिपादीत केलेले मूळ स्वरूपातील तत्त्वज्ञान 'अभिमत मार्क्सवाद' म्हणून ओळखले जाते. जार्ज विल्यम हेगेल हा बर्लिन विद्यापीठामध्ये प्राध्यापक होता. हेगेलने स्वतंत्ररित्या Critique of positive Religion व Encylopedia of philosophical Science in outline हे दोन ग्रंथ लिहले. हेगेल मुलत: तत्त्वचिंतक होता. त्याने भौतिक जगातील अंतिम सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

हेगेलचे तत्त्वज्ञान बुद्धिनिष्ट पातळीवरचे असून या जगात जे जे घडते ते सर्व बुद्धिगम्य म्हणजेच बुद्धिला कळू शकणारे आहे आणि बुद्धिगम असलेली प्रत्येक गोष्ट प्रत्यक्ष व वास्तव स्वरूपाची असते. म्हणूनच हे जग वास्तव आहे. भोगण्यासारखे आहे. असा भोगवादी विचार हेगेलेने मांडला आणि इतिहासासंबंधी सुद्धा हेगेलचे विचार वाचनिय आहेत.

१९ व्या शतकात कार्ल मार्क्स ने मानवी जीवनाच्या अनेक शतकांच्या प्रवाहांचा अभ्यास करून जे मूलभूत तत्त्वज्ञान मांडले त्या तत्त्वज्ञानालाच मार्क्सवादी तत्त्वज्ञान असे म्हटले जाते. मार्क्सने मानवी जीवनाचे विश्लेषण करण्याचा एक नवा दृष्टिकोण जगाला दिला त्यालाच मार्क्सवाद म्हणतात.

कार्ल मार्क्सचा जन्म एका मध्यमवर्गीय ज्यू कुटुंबात ५ मे, १८१८ रोजी जर्मनी येथील ट्रेवेस येते झाला. अतिशय बुद्धिमान असणाऱ्या कार्ल मार्क्सला बालपणापासूनच इतिहास, तत्त्वज्ञान, कायदा या

विषयाची आवड होती. कार्ल मार्क्सच्या वडीलांनी प्रोटेस्टंट पंथ स्वीकारल्यामुळे मार्क्सच्या विचारांमध्ये धर्माबद्दल तिरस्कार दिसून येतो. मार्क्सचे शिक्षण बॉन व बर्लिन विद्यापीठांत झाले. तत्त्वज्ञान, इतिहास, साहित्य व कायदा यात प्राविण्य मिळवण्याबरोबरच एपिक्युरसच्या तत्त्वज्ञानावर पीएच.डी. पदवी मिळवली. मार्क्सचा मुळातच क्रांतीकारी विचारांचा पिंड असल्यामुळे फ्रेंच समाजवादी मंडळींशी व जर्मनीतील गुप्त संघटनांशी संबंध आला. शिवाय फॉयरच्या तत्त्वज्ञानावर केलेली टीका, कुटुंबव्यवस्थेवर केलेल्या टीका, स्वप्नाळू समाजवादावर केलेली टीका याचाच परिणाम म्हणजे मार्क्सला जर्मनीतून फ्रान्स, स्वित्झरलँड, बेल्जीयम, इंग्लंड अशा राष्ट्रामध्ये स्थलांतर करावे लागले. काही काळ मार्क्सने व्हेनिस टाईम या वृत्तपत्राचा संपादक म्हणून कार्य केले. १८४४ मध्ये त्याला एक जीवलग मित्र भेटला. तो म्हणजे फ्रेडरिक एंजल्स होय. एंजल्सने त्याला बरीच आर्थिक मदत केली. ती पॅरिसमध्ये असताना समाजवादी विचारांकडे आकर्षित झाला व साम्यवादी अर्थशास्त्राविषयीचे मार्क्सचे चिंतन सुरू झाले. कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंजल्स यांनी प्रतिपादित केलेले मूळ स्वरूपातील तत्त्वज्ञान अभिजात मार्क्सवाद म्हणून ओळखले जाते. या बरोबरच मार्क्सवर लुई ब्लँक, सेंट सायमन, चार्ल्स मेगरिअम, ॲडम स्मिथ, स्टुअर्स मिल यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. शिवाय फ्रेंच राज्यक्रांती, हेगेले यांचा प्रवावही मार्क्सवर पडला होता.

**ग्रंथसंपदा :**

सन १८६७ मध्ये 'दास कॅपीटल' या ग्रंथाचा पहिला भाग मार्क्सने लिहिला जो फ्रेडरिक एंजल्सच्या मदतीने लिहीला. हा ग्रंथ साम्यवादी विचारांचा आद्यग्रंथ मानला जातो. काही वर्षानंतर या उभय लेखकांनी 'साम्यवादाचा जाहीरणामा' हा ग्रंथ लिहीला. या दोन्ही ग्रंथामध्ये मार्क्सच्या तत्त्वचिंतनाचे व राजकीय विचारांचे सारे विचारधन सामावले आहे. साम्यवादी तत्त्वचिंतनाचे आधार ग्रंथ म्हणून या ग्रंथाचा उल्लेख होतो. त्यानंतर 'पावर्टी ऑफ फिलासॉपी' हा ग्रंथही मार्क्सने लिहीला. यामध्ये फ्रान्समधील घटनांचे विश्लेषण केलेले आहे. त्याशिवाय अर्थशास्त्राविषयी मूलभूत चिंतन करणारे लिखाण म्हणून त्याने लिहलेल्या Value price and profit या ग्रंथाचा निर्देश करावा लागेल. त्याचप्रमाणे Contribution to the Critique of Political Economy हा ग्रंथ ही मार्क्सच्या राजकीय अर्थशास्त्राचे विवेचन करणारा ग्रंथ आहे. शिवाय Revolution and Counter Revolution या ग्रंथातही मार्क्सने क्रांती आणि प्रतिक्रांतीच्या विचाराचे विस्ताराने विवेचन केले आहे.

याशिवाय मार्क्सने वेळोवेळी अनेक टिपणे लिहीली व त्यातून समकालीन परिस्थितीवर भाष्य केले. त्याचबरोबर समकालीन संस्थेवर उदा. धर्मसंस्था, कुटुंबसंस्था इत्यादीवर टीका टिपणी केली. भारताच्या

स्वातंत्र्य लढ्यासंबंधी त्याची विधाने ही महत्त्वपूर्ण आहेत. या एकंदरीतच सर्व ग्रंथामधून मार्क्सने अतिशय मुलगामी विचार मांडले. उदा. 'अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत', 'ऐतिहासिक भौतिकवाद' याशिवाय शासनयंत्रनेतील दांभिकपणा यावर परखड मते व्यक्त करून प्रतिक्रांतीचा नारा दिला. कामगार व भांडवलदार यांच्यातील संघर्षाला वाट मोकळी करून दिली. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या राष्ट्रामधील राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थेला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. शिवाय (१) विरोधविकास, (२) इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ, (३) सामाजिक आर्थिक बदलाचे गतिशास्त्र, (४) भांडवलशाही समाजव्यवस्थेचे विश्लेषण, (५) श्रम मूल्य सिद्धांत, (६) वर्गसंघर्षाचा सिद्धांत, (७) कामगार क्रांती कामगार सत्ता, (८) साम्यवादी अवस्था यावरून कार्ल मार्क्सच्या वैचारिक अधिष्ठानाची कल्पना येते. एकंदरीतच जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या राष्ट्राला व युरोपच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवनाला ढवळून काढणारा विचार मार्क्सने १९ व्या शतकाला दिला. त्या विचारातून प्रतिक्रांतीचे वारे वाहू लागले जे फक्त युरोपपुरतेच मर्यादित नव्हते तर संपूर्ण जगभर या विचाराने मानवाच्या जीवनाला प्रभावित केले. आजही या विचारांमध्ये थोडाफार फेरफार करत काळाच्यानुसार हा मार्क्सचा विचार जीवंत ठेवण्यासाठी झटणाऱ्या पिढ्याही आपल्याला पहावयास मिळतात.

ज्या कालखंडात मार्क्सने आपले विचार मांडले तो कालखंड जागतिक राजकारणामध्ये अतिशय धकाधकीच्या, धावपळीचा कालखंड होता. आटोमन रोमन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर युरोपात सुरू झालेल्या प्रबोधनाने तर्कनिष्ठ अशा बुद्धीप्रामाण्यवाद्यांची एक परंपराच निर्माण केली. ज्यातून आधुनिक विचार मांडले गेले. इतिहासाच्या गतकालीन वाटचालीचाच नव्हे तर एकूणच भौतिक जगाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न मार्क्सने केला. मार्क्सच्या या तत्त्वज्ञानाला 'द्वंदविकासी भौतिकवाद' म्हणतात. मार्क्सच्या मते, धर्म म्हणजे अंधश्रद्धेतून मानवी वर्तणुकीवर वर्चस्वगाजवणारी एक कल्पना होय. मार्क्सते विधान धर्म ही अफूची गोळी आहे. धर्मावर टिका करण्यामागे मार्क्सची राजकीय परिस्थितीवर टीका करणे ही भूमिका होती. Criticism to Religion is the precondition of all political Criticism. मार्क्सच्या मते, धर्म समाजातील आवरण आहे पाया नव्हे. खरा पाया आर्थिक हितसंबंध हाच आहे. धर्म ही कल्पनाच मुळी आर्थिक चौकटीतून निर्माण झाली.

**इतिहासाच्या संदर्भात मार्क्सने मांडलेले विचार :**

कार्ल मार्क्सने इतिहासाची मांडणी ज्या दृष्टीकोनातून केली. त्या मांडणीच्या प्रवाहाला मार्क्सवादी इतिहास लेखन म्हटले जाते आणि या दृष्टिकोणातून जर प्रत्येक राष्ट्राने आपापल्या इतिहासाचे परिशिलन केले

तर इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण घटकांची माहिती नव्याने उजेडात येईल. मार्क्सच्या मतानुसार, मानवी इतिहासाचा ओघ हा एखाद्या संथपणे वाहणाऱ्या नदीसारखा नाही तर त्यामध्ये भरती-ओहोटी, चढ उतार चालू आहेत. काही काळ एक प्रक्रिया चालते नंतर तिची प्रतिक्रिया होते व त्या दोहोतून एक समन्वय साधला जातो आणि हीच गोष्ट मानवी इतिहासामध्ये दृष्टिक्षेपास येते या व अशा अनेक परस्परविरोधी घटनांमधून इतिहासाचा ओघ चालत राहतो. कालक्रमाने एकामागून एक वर्ग सत्तेवर येतात व प्रत्येक वर्गात जे दोष असतात त्यामुळे त्यांची सत्तेवरून हकालपट्टी होते आणि त्यानंतरचा प्रभावी वर्ग सत्तेवर येतो. मग सरंजामशाही नंतर भांडवलशाही, भांडवलशाही नंतर कामगारांचे राज्य अशा प्रकारे ऐतिहासिक सत्तांतराची प्रक्रिया मार्क्सने आर्थिक परिस्थितीच्या परिभाषेत ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावला. उत्पादनांची साधने त्या मालकांच्या मालकीची असतात. त्यांचे इतरांवर राजकीय वर्चस्व असते. सरंजामशाहीमध्ये शेती हे उत्पादनाचे साधन असल्यामुळे जमीनमालकांच्या हाती राजकीय सत्ता होती. औद्योगिक क्रांतीनंतर भांडवल हे उत्पादनाचे साधन झाल्यामुळे भांडवदारांकडे ही सत्ता गेली हे सत्तांतरण नेहमी एकावर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे जात असते. उत्पादनामुळे चार प्रकारचे संबंध निर्माण होतात. अगदी त्याचबरोबर त्यातून हळूहळू 'आहे रे, नाही रे' किंवा शोषक-शोषीत असा वर्गसंघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष नेहमी चालतच असतो. इतिहासातील किंवा ऐतिहासिक गतिशिलता मार्क्सने मांडून त्याच्या ऐतिहासिक विचारसरणीमागील सामाजिक बदलातील गतिशास्त्र लक्षात घेवूनच इतिहासकारांना ऐतिहासिक मांडणी करावी लागते. मानवी प्रगती ही सतत होत राहणार हे मार्क्सने मान्यच केले आणि मार्क्सने आपल्या ऐतिहासिक विचाराची पुर्णत: भिस्त नैसर्गिक प्रगतीच्या अपरीहार्यतेवर ठेवली. मानवाने संग्रहीत केलेल्या बहुमूल्य अशा उत्पादनांचा पूर्ण उपयोग फक्त समाजवादी व्यवस्थेतच होवू शकेल असे मार्क्सचे मत होते.

कार्ल मार्क्सने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये श्रमाला खूप मोठे महत्त्व दिले. त्याच्या मते, उत्पादनात श्रमाचा वाटा खूप मोठा असून श्रमामुळेच वस्तूला किंमत येते, मूल्य येते आणि वस्तूचे मूल्य म्हणजेच समाजातील श्रमाचे अस्तित्व होय. याच सिद्धांताच्या आधारे मार्क्सने अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताची मांडणी केली. कामगारांना जेवढे वेतन दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही. कामगारांना कमी वेतन दिले जाते. भांडवलदार ही रक्कम जी मुळात कामगारांची आहे ती दुसऱ्या व्यवसायात गुंतवितो. उद्योगासाठी वापरतो व सतत कामगाराची पिळवणूक होत असते.

कार्ल मार्क्सने वर्गसंघर्षासंबंधीचे विचारही अगदी आग्रही व आक्रमक पद्धतीनेच मांडले असून त्यांच्या मते, कुठल्याही समाजव्यवस्थेत अंतर्गत संघर्ष असतोच आणि संघर्ष गटागटांमध्ये वर्गावर्गामध्ये असतो आणि हे गट आर्थिक उत्पादनाच्या विषम प्रक्रियेमध्ये निर्माण झालेले असतात. उदा. औद्योगिक युगामध्ये कामगार हा जरी स्वतंत्र दिसत असला तरी तो स्वतंत्र नसतो. तो कारखानदार, भांडवलदाराकडून

सातत्याने भरडला जात असतो. त्यामुळे जगाचा इतिहास हा दुसरे तिसरे काही नसून वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे मार्क्सचे मत आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाला वर्गच जबाबदार असून समाजामध्ये वर्गच क्रांती करू शकतात. त्यामुळे समाजामध्ये समाजवादी व्यवस्था क्रांतीच्या मार्गानेच येईल यावर मार्क्सचा ठाम विश्वास होता. वर्गकलहाचा आलेख म्हणजे इतिहास असून आर्थिक प्रश्नच समाजाचा पाया आहेत. गतकालीन मानवी वाटचालीच्या ऐतिहासिक अवस्था मार्क्सने सांगितल्या त्या खालीलप्रमाणे -

१. पहिली अवस्था : प्राचीन साम्यवाद

२. दुसरी अवस्था : गुलामगिरीचा कालखंड

३. तिसरी अवस्था : सरंजामशाहीचा कालखंड

४. चौथी अवस्था : भांडवलशाहीचा कालखंड

५. पाचवी अवस्था : समाजवादी समाजरचनेचा कालखंड

या पाच अवस्थांचे मार्क्सने अगदी सविस्तर विश्लेषण करून वेगवेगळ्या कालखंडामध्ये उत्पादन पद्धती, उत्पादनाचे तंत्र त्यावरील मालकी यातूनच निर्माण झालेले दोन वर्ग आणि त्यांच्यातील संघर्षाची मांडणी मार्क्सने करून अंतिमता समाजवादी समाजरचनेच्या कालखंडामध्ये सर्व समाज एकजीनसी होवून वर्ग नष्ट होतील. भांडवलदार वर्गच राहणार नाही. संपत्तीवरील वैयक्तिक हक्कच संपेल या ऐतिहासिक तत्त्वज्ञानातून मार्क्सने गतकालीन समाजाच्या वाटचालीचे चित्र रेखाटून मानवी वाटचाल म्हणजे संघर्षाची कहाणी आहे अशी भूमिका घेतली. वर्गकलह प्रतिदिला या वर्गकलहाच्या स्वरूपाच्या वर्तनाचा शोध घेवून मार्क्सने इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची निर्मिती केली.

**व्याघाताचा नियम (Law of Contradiction) :**

मार्क्सच्या भौतिकवादी सिद्धांताचा मूळ आधार हा व्याघाताचा सिद्धांत नियम होय. या भौतिकवादी जगाच्या वाटचालीत पावलोपावली विरोधाभास जाणवतो. निसर्गत: सगळीकडे पावलोपावली विरोधाभास भरलेला असून हा विरोध व्याघाती असून विरोधी भासणाऱ्या गटांमध्ये संघर्ष उद्‌भवतो व त्यातच विरोध करणारा, सामावून जातो हीच गोष्ट विरोधाभासात्मक भासते. अशा विरोधाभासातूनच भौतिक जगातील वाटचाल घडत असते.

**नाकाराचा नकार (Law of Nagation) :**

परिवर्तनाच्या प्रक्रियेत सतत कोणती तरी अवस्था, गोष्ट नाकारली जाते व नव्याला आकार येतो ही नकाराची प्रक्रियादेखील काही नियमानुसार घडते. नाकारली गेलेली गोष्ट पूर्णपणे नष्ट न होता ती नव्या रूपात परिवर्तीत होते हे परिवर्तन म्हणजे एक अवस्था संपून नवी अवस्था निर्माण होणे व पुन्हा ही नवी अवस्था नाकारली जाणे ही प्रक्रिया सतत घडत राहणे हा भौतिक जगाचा नियम नकाराचा नकार या माध्यमातून मार्क्सने जगासमोर मांडला.

**विरोध विकासवाद, द्वंद विकासी भौतिकवाद :**

मार्क्सने हेगेलचा द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत दुरूस्त करून पायावर उभा केला. मार्क्सने हेगेलच्या सिद्धांतामध्ये अस्तित्वात असणारी अध्यात्मिक संकल्पना नाकारून भौतिक तत्त्वाच्या माध्यमातून द्वंद विकासी भौतिकवाद उभा केला. त्यामुळेच हेगेल पेक्षा मार्क्स वास्तववादी ठरतो कारण आर्थिक घटकांना मूलाधार मानून भौतिक जगातील स्थित्येंतराचे परिवर्तनाचे विवेचन केले. मार्क्सने अर्मुत अशा संकल्पनातून व्यक्त होणारा विचार नाकारून इतिहासाविषयी पूर्णत: भौतिक विश्लेषण मांडले. धर्म, आदर्शवाद, परमसत मूर्त, अमुर्त कल्पनांना कसलाच थारा दिला नाही.

जगातील सारे संघर्ष हे भौतिक वस्तूंच्या साधनाच्या प्राप्तीसाठीच असतात. या भौतिक वस्तूंवरूनच मानवी समाजाचे संबंध निश्चित होत असतात. धार्मिक संबंध हेच समाजाचे समाजरचनेचे मूळ आधार आहेत असे प्रतिपादन करत मार्क्सने इतिहासाचे आर्थिकदृष्ट्या विश्लेषण करून द्वंदविकासी भौतिकवादाच्या माध्यमातून जागतिक इतिहासाची मांडणी केली.

**मार्क्सवादाचा भारतीय इतिहासावर पडलेला प्रभाव :**

मार्क्सवादी विचारांचा खूप मोठा प्रभाव भारतीय इतिहासकारांवर पडलेला दिसून येतो. मार्क्सने भारतीय राष्ट्रीय आंदोलनाचे विवेचनही केलेले आहे. त्यांनी इंग्रजी राज्यकर्त्यांवर उघड आरोप केले होते. कार्ल मार्क्सच्या चिंतनातून भूतकाळामध्ये पाहण्याची एक नवदृष्टी आधुनिक इतिहसकारांना मिळाली आणि इतिहास म्हणजे केवळ राजघराण्याचा उदय आणि अस्त नसून सामान्याची जीवन संघर्षाची गाथा आहे. या विचाराची भूमिका मनाशी बाळगून भारतामध्ये आधुनिक कालखंडामध्ये इतिहासलेखनाला सुरूवात झाली. गतकाळातील सामान्य माणसांची पिळवणूक, दुरावस्था, त्यांच्यावर होणारा अन्याय हा इतिहासाच्या

अभ्यासाचा, संशोधनाचा होवून मार्क्सवादी दृष्टिकोमातून इतिहासाचे विश्लेषण केले जावू लागले. मार्क्सने सामाजिक घटकांची मिमांसा करतांना भौतिक गोष्टीवर भर दिला हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून भारतीय इतिहास लिहण्याचा प्रयत्न खालील इतिहासकारांनी केला. कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारप्रणालीने प्रभावीत झालेले काही भारतीय इतिहसकार मार्क्सच्या सिद्धांताच्या आधारे भारतीय इतिहासाचे अध्ययन करू लागले. मात्र हे सर्व इतिहासकार पोथीनिस्ट मार्क्सवादी नाहीत. भारतामध्ये मार्क्सवादी इतिहासलेखनाला चालना इ.स. १९५० नंतर मिळाली या मार्क्सवादी लेखनप्रवाहाने भारतामध्ये इतिहासाचे संशोधन करण्याबरोबरच मार्क्सवादाच्या आधारे पुनर्मुल्यांकन करण्याचा प्रयत्न केला.

प्रारंभीच्या काळात श्रीपाद अमृत डांगे यांचा From Primitive Communisn to Slavery तसेच रजनी पास दत्त यांचा India Today हे ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत. तद्नंतरच्या मार्क्सवादी इतिहास लेखकांच्या पिढीमध्ये डॉ. नुरूल हसन, डॉ. राम शरण शर्मा, डॉ. रोमिला थापर, डॉ. हरबन्स मुखिया, डॉ. महम्मद हबीब, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपन चंद्र ही नावे विशेष उल्लेखनीय असून या मार्क्सवादी लेखकांच्या, इतिहासकारांच्या मुलगामी संशोधनामुळे भारतीय इतिहासाला गतिशिलता प्राप्त झाली.

प्रा. रामशरण शर्मा यांच्या सर्वच ग्रंथाचा समाचार घेणे शक्य नाही मात्र इंडियन फ्यूडॅलिझम या ग्रंथामध्ये भारतामधील सरंजामशाहीचा उद्गम व विकासावर भाष्य केले. लाईट ऑन अर्ली इंडियन सोसायटी ॲन्ड इकॉनमी या ग्रंथात सामाजिक व आर्थिक इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला. इ.स. १७७६ मध्ये 'ए कोड ऑफ गेन्टू लॉज' या ग्रंथात सामाजिक इतिहासाची मांडणी केली.

**डॉ. दामोधर धर्मानंद कोसांबी :**

यांनी आपला ग्रंथ 'ॲन इन्ट्रॉडॅक्शन टू दि स्टडी ऑफ हिस्ट्री' या ग्रंथामध्ये द्वंदात्मक विकासाच्या सिद्धांताचा वापर करून प्राचीन भारताचे विश्लेषण केले.

**डॉ. रोमिला थापर :**

यांनीसुद्धा मार्क्सवादी प्रभावातून भारतीय इतिहासलेखन केले. भारतामधील जमातवाद, धर्मवाद, प्रांतवाद हे इतिहासलेखनामध्ये अडथळे निर्माण करतात याची जाणीव ठेवून श्रीमती थापर यांनी भारतीय इतिहास लेखनातील समस्यांचा शोध घेणारा ग्रंथ लिहला व आपल्या इतिहास लेखनाला आर्थिक सामाजिक, वैचारिक बैठक दिली. 'सिच्युएटिंग इंडियन हिस्ट्री' या ग्रंथामध्ये मार्क्सचा द्वंदात्मक विकासाचा सिद्धांत भारताच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये कसा बसवता येईल याचा विचार केला.

**डॉ. इरफान हबीब :**

'दि अग्रेरियन सिस्टीम ऑफ मुघल इंडिया' या ग्रंथाच्या माध्यमातून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले व मध्ययुगीन भारताची वाटचाल वर्गसंघर्षातच झाली. हा आर्थिक विचार मार्क्सवादी परिप्रेक्ष्यातून मांडला.

**डॉ. सुमित सरकार :**

यांनी आपल्या 'मॉडर्न इंडिया' या ग्रंथात त्याबरोबरच 'स्वदेशी मुव्हमेंट इन बेंगाल' व इतर ग्रंथामध्ये मार्क्सवादी विचारांचे बिजारोपन केले.

याबरोबरच प्रा. महमद हबीब, डॉ. बिपीनचंद्र, रजनी पामदत्त, डॉ. ए. आर. देसाई, अखिलेश त्रिपाठी, श्रीपाद अमृत डांगे, मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपापल्या प्रत्येक कृतीमधून, विवेचनामधून मार्क्सवादी इतिहासाचा आशय भारतीय परीक्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## सारांश :

१. मार्क्सने इतिहासाची व्याख्या आर्थिक बाबीच्या संदर्भात केली व असा निष्कर्ष काढला की, वर्गकलहाशिवाय इतिहासाला दुसरा विषय नाही. सर्व संघर्षाच्या मुळाशी आर्थिक व्यवहार असतात हाच मार्क्सच्या सिद्धांताचा मुख्य आधार आहे.

२. इतिहासाची उन्नत अवस्था म्हणजे समाजामध्ये कामगार वर्गाचे अस्तित्व प्रबळ केले.

३. समाजामध्ये अस्तित्वात असणारा वर्गसंघर्ष हे इतिहासाचे तत्त्व आहे.

४. मार्क्सने आपला सिद्धांत जो द्वंदविकास म्हणून ओळखला जातो याची उभारणी निर्मितीचे तत्त्व व वितरणाची पद्धती यांच्या आर्थिक संबंधावर उभा केला.

५. मानवी समाजाच्या सर्व व्यवहारामागे आर्थिक हेतूमूलकतेचा सिद्धांत आहे असा विचार मार्क्सने मांडला यालाच ऐतिहासिक भौतिकवाद म्हटले जाते.

६. मानवी विकासाच्या प्रकि६येत गुलामगिरी, सरंजामसाही व भांडवलशाही अशा तीन प्रमुख अवस्था आहेत.

७. मार्क्सच्या आर्थिक ऐतिहासिक विश्लेषणामुळे इतिहासलेखन राजकीय व धार्मिक साच्यातून बाहेर पडून इतिहासाच्या कक्षा रूंदावल्या.

मार्क्सने आर्थिक दृष्टीने इतिहासलेखन करून इतिहासाला एक नवदृष्टी, नवमाध्यम प्राप्त करून दिले त्यांच्या इतिहासविषयक चिंतनातून भौतिक जगातील वाटचालीसंबंधी शाश्वत विचार मांडले गेले.

## एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कार्ल मार्क्सच्या वडीलांनी कोणता पंथ स्वीकारला ?

उत्तर : प्रोटेस्टंट

२. मार्क्स यांनी कोणाच्या तत्त्वज्ञानावर पीएच.डी. मिळविली य

उत्तर : एपिक्युरस

३. साम्यवादी विचारांचा आद्यग्रंथ म्हणून कोणता ग्रंथ ओळखला जातो ?

उत्तर : दास कॅपीटल

४. मार्क्स व फ्रेडरिक एंजल्सच्या तत्त्वचिंतनाचे राजकीय विचारांचे विचारधन कोणत्या ग्रंथात सामावले आहे.

उत्तर : साम्यवादाचा जाहीरनामा

५. मार्क्सचा राजकीय अर्थशास्त्राचे विवेचन करणारा ग्रंथ कोणता ?

उत्तर : Contribution to the Critique of Political Economy

६. भारतामध्ये मार्क्सवादी इतिहासलेखनाला चालना केंव्हा मिळाली ?

उत्तर : १९५० नंतर

७. डॉ. दामोधर धर्मानंद कोसंबी यांनी कोणत्या ग्रंथामध्ये द्वंदात्मक विकासाच्या सिद्धांताचा वापर केला आहे ?

उत्तर : ॲन इन्ट्रॉडॅक्शन टू दि स्टडी ऑफ हिस्ट्री

८. स्वदेशी मुहमेंट इन बेंगाल या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

उत्तर : डॉ. सुमित सरकार

९. डॉ. सुमित सरकार यांनी आपल्या कोणत्या ग्रंथामध्ये मार्क्सवादी विचारांचे बिजारोपण केले ?

उत्तर : मॉर्डन इंडिया

## योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ५ मे १८१८ रोजी कार्ल मार्क्स यांचा जन्म ......... या राष्ट्रात झाला.

अ) इटली ब) जपान क) इंग्लंड ड) जर्मनी

२. .......... या वर्तमानपत्राचे संपादक म्हणून मार्क्सने काम केले.

अ) लंडन टाईम्स ब) व्हेनिस टाइम्सक क) अमेरिकन टाईम्स ड) यापैकी नाही

३. 'दास कॅपीटल' या ग्रंथाचा पहिला भाग मार्क्सने ...... यावर्षी लिहीला.

अ) १८६७ ब) १८६८ क) १८६९ ड) १८८०

४. Revolution to and Counter Revolution या ग्रंथाचे लेखन ...... यांनी केले.

अ) फ्रेडरिक एंजल्स ब) कार्ल मार्क्स क) आर.सी. दत्त ड) सुमित सरकार

५. From primitive communism to slavery हा ग्रंथ .......... यांनी लिहला ?

अ) रजनी दत्त ब) श्रीपाद डांगे क) आर.एस. शर्मा ड) इरफान हबीप

६. India Today या ग्रंथाचे लेखन ........... यांनी केले.

अ) रजनी दत्त ब) बिपीनचंद्र क) आर.एस. शर्मा ड) इरफान हबीब

७. 'इंडियन प्युडॅलिझम' या ग्रंथाचे लेखन ....... यांनी केले ?

अ) प्रा. रामशरण शर्मा ब) प्रा. आर्शिवादीलाल श्रीवास्तव

क) इरफान हबीब ड) डॉ. मुरूल हसन

८. 'ए कोड ऑफ गेन्टू लॉज' हा ग्रंथ ......... यांनी लिहला ?

अ) डॉ. सुमित सरकार ब) प्रा. रामशरण शर्मा

क) डी. डी. कोसंबी ड) यापैकी नाही

९. 'सिच्युएटिंग इंडियन हिस्ट्री' हा ग्रंथ .......... यांनी लिहला ?

अ) डॉ. सुमित सरकार ब) रोमिला थापर

क) डी. डी. कोसंबी ड) यापैकी नाही

१०. दि अग्ररीयन सिस्टीम ऑफ मोगल इंडिया या ग्रंथामधून डॉ. इरफान हबीब यांनी ......... कालीन भारतीय इतिहासाचे पुर्नलेखन केले आहे.

अ) प्राचीन ब) मध्यकालीन क) आधुनिक ड) समकालीन

## प्रश्न :

१. कार्ल मार्क्सच्या पूर्वचरित्राची चर्चा करा ?

२. मार्क्सच्या ग्रंथसंपदेची चर्चा करा ?

३. कार्ल मार्क्सच्या धार्मिक विचारांवर प्रकाश टाका ?

४. मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या मांडणीची चिकित्सा करा ?

५. मानवी वाटचालीच्या ऐतिहासिक अवस्थांची सखोल मांडणी करा.

६. भारतीय इतिहासकारांनी केलेल्या मूलगामी मार्क्सवादी इतिहास चिंतनाची चिकित्सा करा.

७. मार्क्सवादी इतिहासाचा आशय भारतीय परीक्षेत्रामध्ये समाविष्ठ करणाऱ्या संशोधकाच्या / इतिहासकारांच्या कृतीची चर्चा करा ?

## पारिभाषिक शब्द :

द्वंदविकासी भौतिकवाद : कार्ल मार्क्स याने इतिहासाच्या गतकालीन वाटचालीचाच नव्हे तर एकूण भौतिक जगाचा लावलेला अन्वयार्थ म्हणजेच द्वंदविकासी भौतिकवाद होय.

मार्क्सवादी तत्त्वज्ञान : १९ व्या शतकात कार्ल मार्क्सने मानवी जीवनाच्या अनेक शतकाच्या प्रवाहाचा अभ्यास करून जे मुलभूत तत्त्वज्ञान मांडले त्या तत्त्वज्ञानालाच मार्क्सवादी तत्त्वज्ञान असे म्हटले जाते.

| | | |
|---|---|---|
| अभिजात मार्क्सवाद | : | कार्ल मार्क्स व फेडरिक एंजल्स यांनी प्रतिपादित केलेले मुळ तत्त्वज्ञान अभिजात मार्क्सवाद म्हणून ओळखले जाते. |
| अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत | : | उत्पादनात श्रमाचा वाटा खूप मोठा असून श्रमामुळेच वस्तूला किंमत येते. वस्तूचे मूल्य म्हणजेच समाजातील श्रमाचे अस्तित्व होय. याच सिद्धांताच्या आधारे मार्क्सने अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताची मांडणी केली. |
| वर्गसंघर्ष | : | वर्गसंघर्षासंबंधी मार्क्सने आपले विचार अगदी आक्रमक पद्धतीने मांडले. त्यांच्या मते, कुठल्याही समाजव्यवस्थेत अंतर्गत संघर्ष असतोच हा संघर्ष गटागटांमध्ये वर्गावर्गामध्ये असतो आणि हे गट आर्थिक उत्पादनाच्या विषम प्रक्रियेमुळे निर्माण झालेले असतात. उदा. कारखानदार, भांडवलदाराकडून कामगार सातत्याने भरडला जातो. त्यामुळे जगाचा इतिहास दुसरे तिसरे काही नसून वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. |
| व्याघाताचा नियम | : | मार्क्सचा भौतिकवादी सिद्धांताचा मुळ आधार हा व्याघाताचा नियम असून या भौतिकवादी जगाच्या वाटचालीत पावलोपावली विरोधाभास जाणवतो. निसर्गत. सगळीकडे विरोधाभास भरलेला असून हा विरोध व्याघाती असून विरोधी भासणाऱ्या गटामध्ये संघर्ष उद्‌भवतो असा विरोधाभासातूनच जगातील वाटचाल घडत असते. |
| नकाराचा नकार (Law of Negation) | : | परिवर्तनाच्या प्रक्रियेत सतत कोणतीतरी अवस्था, विचार गोष्ट नाकारली जाते व नव्याला आकार येतो ही नकाराची प्रक्रियादेखील काही नियमानुसारच होत असते. नाकारली गेलेली गोष्ट ही पुर्णत: नष्ट न होता नव्या रूपात परिवर्तीत होते व पुन्हा ही अवस्था नाकारली जाते म्हणजेच ही प्रक्रिया सतत घडत राहणे हा भौतिक जगाचा नियम म्हणजेच नकाराचा नकार मार्क्सने मांडला. |

## (क) ॲनल्स

### उद्दिष्ट्ये :

- ॲनल्स विचार प्रवाहाच्या उदयाचा आढावा घेता येईल.
- ॲनल्स विचार प्रवाहाची विचारसरणी समजून घेता येईल.
- ॲनल्स विचार प्रवाहाचा आंतरविद्याशास्त्रीय दृष्टिकोण समजेल.
- ॲनल्स विचार परंपरेचा हेतू व भूमिका लक्षात येईल.
- ॲनल्सची इतिहासविषयक भूमिका लक्षात येईल.
- ॲनल्स परंपरेतील प्रमुख इतिहासकार व त्यांच्या कृतीची माहिती समजून घेता येईल.

### प्रस्तावना :

ॲनल्स इतिहासलेखन परंपरा ही इतिहासलेखन, संशोधनामधील एक नवीन व मूलत: आंतरविद्याशास्त्रीय परंपरा आहे. जी निव्वळ तथ्यात्मक, कथनात्मक, निवेदनशैली किंवा राजकीय व चरित्रात्मक विषयांना बाजूला सारून ठराविक समजूतीपलीकडील मानवी अस्तित्वाच्या वेगवेगळ्या घटकांना सामावून घेते. ॲनाल्स तत्त्वज्ञानाला विकसित करण्याचे कार्य फ्रेंच विचारवंतांनी केले. त्यांनी २० व्या शतकामध्ये ॲनल्स लिखानाला विशिष्ट तत्त्वज्ञानात्मक बैठक दिली.

फ्रान्समधील असा एक गट जो इतिहासाचे विषय व उद्दिष्ट याबाबत काही समान गृहितके माणण्याबरोबरच संलग्न व उपशाखीय ज्ञानक्षेत्रातील कौशल्य व साधने आत्मसात करून संशोधनाच्या नवनवीन वाटा निर्माण करणारा गट किंवा प्रवाह म्हणजेच ॲनाल्स होय. ॲनल्स विचारप्रवाह, संशोधन प्रवाह हा समग्र किंवा सर्वसमावेशक विचार अंगिकृत करतो. इतिहासाच्या ॲनल्स परंपरेने इतिहासाला 'राजकीय व राजनैतिक' बंधनातून मुक्त केले. ॲनल्सची इतिहासाची नवीन मांडणी मानवशास्त्र, हवामानशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल व इतर संलग्न शाखांच्या मदतीने इतिहासाचे श्रेष्ठत्व सिद्ध करते.

भूत व वर्तमान यांतील नाती प्रवाहीत असतात. त्यामुळे इतिहासाला प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक समाजाला आदिम व सुसंस्कृत अशा कण्यांमध्ये बंद करणे हे ॲनल्सला मान्य नाही. त्यामुळे ॲनल्सवाद्यांनी गतकाळाला तपासत असताना गतकाळाचे गतिशास्त्र समजून घेण्यावर भर दिला. गतकाळाच्या दस्तऐवजांना आपले शास्त्रनियम लागू करणाऱ्या जुन्या पठडीतील इतिहासकारांऐवजी

सद्यकालीन अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेचे विश्लेषण करण्याचे साहस करणाऱ्या नरीन विचारवंताचा ॲनल्स नी पुरस्कार केला.

२० व्या शतकामध्ये निर्माण झालेल्या या इतिहास लेखन परंपरेने ॲनल्स परंपरेचा प्रसार रशिया, युरोप, अमेरिका, ब्राझील या राष्ट्रामध्ये अगदी झपाट्याने झाला. कारण या परंपरेचे या शाखेचे इतिहासकार हे मुलत: बुद्धिवादी गटात मोडणारे व शास्त्रीय दृष्टिकोण बाळगणारे असल्याबरोबरच कोणत्याही एका शास्त्रीय व सैद्धांतिक भूमिकेला बांधील नसल्यामुळे ॲनल्स व इतिहासलेखनाला नवा आशय व नवी पद्धतीची देणगी दिली.

**ॲनल्स म्हणजे काय ?**

ॲनल्स या शब्दाचा शब्दश: अर्थ आहे 'वार्षिक नोंदी' १९२९ मध्ये फ्रान्समध्ये 'ॲनल्स' नावाचे नियतकालीक होते. त्यामुळे या विचारसरणीला The Annals School of Thoughts असे म्हटले जाते. १९४६ पासून Annals : Economic, Societies, Civilizations हे नियतकालीक सुरू झाले. त्यामध्ये मुख्यत: आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संशोधनपर लेखनाला प्रोत्साहित करण्यात आले. मानवाच्या/समाजाच्या जैविक स्वरूपाबद्दल आदर बाळगत असतानाच ॲनल्स इतिहासकारांनी ज्यांचे मोजमाप करता येईल अशा घडामोडीचाही पाठपुरावा केला. ॲनल्स पद्धतीने कोणताही ऐतिहासिक कालखंड वा समाज सर्वार्थाने समजून घेण्याबरोबरच इतिहासाच्या आकलनासाठी समग्रतेवर भर देण्याचा प्रयत्न केला आणि आकलनाच्या कक्षा विस्तारीत करण्यासाठी अतिशय काटेकोरपणे गणित, अर्थशास्त्रीय व संख्याशास्त्रीय विश्लेषणाचा प्रारंभ केला.

**ॲनल्सचा हेतू व भूमिका :**

पारंपारिक इतिहासाची चौकट मोडून इतिहासाचे घटनाधिष्ठीत स्वरूप बाजूला सारून इतिहासातून मानवी समाजाचे संपूर्ण चित्रण स्पष्ट करण्यासाठी मार्श ब्लाच व फेबवर यांनी ॲनल्स नियतकालीकाच्या स्थापणेच्या वेळी खालील हेतू स्पष्ट केले.

१. इतिहासातून गतकालीन मानवी समाजजीवनाचे संपूर्ण चित्रण करणे.

२. इतिहासाशी निघडीत असणाऱ्या समाज, अर्थ व भूगोल इत्यादी ज्ञानशाखांचा अभ्यास करणे.

३. इतिहासाला स्वायत्तता मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

४. इतिहासाला मानवी समाजाच्या सर्वांगणि व सर्वंकष अध्ययानचे शास्त्र बनविणे.

५. फ्रान्समध्ये जनसंपर्कासाठी नियतकालिक सुरू करणे.

६. ऐतिहासिक माहिती व ज्ञानाचा शास्त्रशुद्ध प्रचार करणे.

## भूमिका :

ॲनल्स विचारसरणीची भूमिका ही मूलत: ऑगस्त कॉम्त याच्या प्रत्यक्षज्ञानवादी विचारांच्या प्रभावातून अस्तित्वात आली. त्याचबरोबरच ॲनल्स विचारसरणी ही आर्थिक रचनेचा व समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांचा विचार असल्यामुळे ॲनल्सची विचारसरणी ही मार्क्सवादाशी जुळणारी आहे. मात्र थोर समाजशास्त्रज्ञ ऑगस्त कॉम्त व एमिल डरखाईम यांच्या विचारामध्ये ॲनल्सच्या विचारांची बिजे आढळतात. त्यामुळेच ॲनल्सचा हा विचार व भूमिका ही अभिनव असून ती खालील प्रमाणे दिसून येते.

१. इतिहास हा मानवी समाजाचा आरसा असल्यामुळे मानवी समाजाचा संपूर्ण, सर्वांगिण व एकत्रित अभ्यास हे इतिहासाचे उद्दिष्ट असावे.

२. एखादी घटना अथवा व्यक्ती हाच अभ्यासविषय न ठेवता त्या प्रदेशात प्रदिर्घ काळात घडणाऱ्या परीवर्तन, समस्या अर्थ व समाजरचना यांचा इतिहासकाराने अभ्यास केल्यास मानवी समाजाच्या संपूर्ण इतिहासाचा आलेख तयार होईल.

३. मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या इतिहासाने एकाकीपणा टाकून देवून इतर मानव्यशास्त्राशी निकटचा संबंध प्रस्थापित केला पाहिजे.

४. ॲनल्स परंपरेने ऐतिहासिक माहितीच्या संकलनासाठी संदर्भ साधनांचे सटीक परीक्षण करण्याच्या भूमिकेवर खूप भर दिला.

५. ॲनल्स विचारवंतानी फक्त राजकीय घडामोडींचेच वर्णन करण्याऐवजी समग्र मानवी जीवन आणि जीवनातील घटनांचे अवलोकन करण्याची भूमिका मांडली कारण त्या सर्व घटना Incident या परस्परावलंबी असतात ही ॲनाल्स परंपरेची ठाम भूमिका आहे.

संपूर्ण इतिहास परस्परावलंबन, सर्वांगिण व एकत्रित अभ्यास, परीवर्तन, संदर्भ साधनांचे सटीक परिक्षण त्याचबरोबरच इतर मानवशास्त्राशी निकटचा संबंध प्रस्थापित करून सर्वंकष किंवा सर्वांगिण इतिहासाची मांडणी करण्याची भूमिका ॲनल्स परंपरेने २० व्या शतकामध्ये जगाला दिली ज्यामुळे

इतिहासाला स्वायत्तता प्राप्त होते व इतिहासाला मानवी समाजाच्या सर्वांगिण अध्ययनाचे शास्त्र होण्यास मदत होते अशी ठाम भूमिका वरील भूमिकेच्या विचाराअंती लक्षात येते.

## ॲनल्स लेखन परंपरेतील इतिहासकार :

इतिहासाला गतिशिलता प्रदान करण्यामध्ये ॲनल्स परंपरेचा खूप मोठा वाटा आहे. इतिहासातील गतिहिनता या प्रवाहाला मान्य नव्हती. इतिहास व सामाजिक शास्त्रामध्ये अस्तित्वात असलेली रूक्ष व परंपरागत भिती नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या परंपरेतील संशोधकांनी, इतिहासकारांनी केले. इतिहासाचे रूपांतरण मानव्यशास्त्रामध्ये करण्याचे कार्य या लेखन परंपरेतील इतिहासकारांनी केले. ॲनल्सच्या संशोधकांनी शास्त्रातील विचार संकलप्ना पद्धतीशास्त्र, हेतुपरस्पर इतिहासामध्ये आणल्या व खऱ्या अर्थाने इतिहासलेखन समग्र व व्यापक करण्याचे श्रेय या ॲनल्सवाद्यांना देण्यात येते.

या ॲनल्स परंपरेवर १९ व्या शतकातील एमिल डरखाईन यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्याच्या समाजशास्त्रीय संशोधनपद्धतीचा वापर इतिहासामध्ये करण्याबरोबरच व्यक्ती किंवा घटनेऐवजी मानवी कृतीचा समग्र अभ्यास या परंपरेने स्वीकारला. एमिल डरखाईमने १८९७ मध्ये Ancee Sociologique ची स्थापना केली. व्यक्ती कधीही स्वायत्त नसतो सभोवतालच्या विविध घटक व्यक्तीच्या कृती नियंत्रित करत असतात. या परंपरेचे इतिहासकार खालील प्रमाणे -

### १) ल्युसियन फेबवेर / ल्युसिन फ्रेबव :

यांच्या मते, ॲनल्सचा मुख्य हेतू म्हणजे इतिहासाचे मानव्यशास्त्रात रूपांतरण करणे व विज्ञानातील शास्त्रातील पद्धतीशास्त्रांची संकल्पनांची विचारांची बांधणी इतिहासामध्ये करावी.

### २) मार्क ब्लॉक : १८६६ ते १९४४

या विचारवंताने The Royal Touch व King and Serts या दोन ग्रंथांच्या माध्यमातून ॲनल्स परंपरेला जोपासण्याचे कार्य केले. ब्लाच याने घटनेऐवजी सामाजिक रचनेच्या अभ्यासावर लक्ष दिले. तत्कालीन समाजामधील चालिरीती, रूढी, रचना यांचे इतिहासातील महत्त्व मार्कने अधोरेखित करून ॲनल्स परंपरेला उभारी दिली. एका घटनेवर लक्ष केंद्रित न करता समाजजीवनाच्या सर्व वैशिष्ट्यांना अधोरेखीत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्क ब्लॉचने केले. इतिहासाच्या कक्षा रूंदावण्यास मदत झाली.

**फ्रर्नांद ब्रादेल :**

इतिहासाच्या जडणघडणीत व लेखणामध्ये सामाजिक व आर्थिक घटकाच्या अस्तित्वाकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे कार्य फर्नांद ब्रादेल यांनी केले. यांनाच 'वर्ल्ड सिस्टिम फ्रर्नांद' चे उदगाते म्हणूनही ओळखले जाते. फर्नांद हे ॲनल्स विचारप्रणालीचे आद्य प्रवक्ते म्हणूनही ओळखले जातात. इतिहासाच्या विस्तृत परिघाअंतर्गत सर्व ज्ञानाचा समावेश व पुनर्स्थापना व्हावी. परिणामी, मूलगामी विरोधाभास मान्य करूनही आपण अभेद्य ऐक्याचा सन्मान करून हा विचार ब्रॅदेल यांनी रूजविला.

**अल्पपरिचय :**

ॲनल्स प्रवक्ते फर्नांद ब्रॅदेल यांचा जन्म २७ ऑगस्ट १९०२ मध्ये फ्रान्समध्ये झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. १९२३ मध्ये ब्रॅदेल यांनी सोरबॉन विद्यापीठातून इतिहास विषयात पदवी मिळवली. त्यानंतर दोन वर्षे सैन्यात नोकरी केली. १९३२ पर्यंत त्यांनी अल्जेरिया मधील कान्स्टेन्टाईन या शाळेमध्ये इतिहास विषय शिकवला. ल्युसिन प्रेबव यांनी लिहीलेल्या जिऑग्राफीकल इंटरोडक्शन टू हिस्ट्री या पुस्तकाचा खूप प्रभाव ब्रांदिलवर पडला. त्यांनी १९३९ च्या दुसऱ्या महायुद्धात सहभाग घेतला व १९४० ते १९४५ या कालखंडामध्ये त्यांना बंदीवासात ठेवले गेले. तुरूंग ही उत्तम शाळा असून तेथे संयम आणि सहनशीलता शिकायला मिळते हे विधान बॉदेल यांनी सुटकेनंतर केले. या बंदी जीवनाचा कालावधीमध्ये ब्रदिल यांनी 'द मेडिटेरेनियन ॲन्ड द मेडिटेरनियन वर्ल्ड इन द एज ऑफ फिलिप द सेकंड' हे पुस्तक लिहले.

मार्क ब्लाक व ल्युसिन फेबव्र यानी सुरू केलेल्या ॲनल्सचे ते सदस्य होते. १९४९ मध्ये 'कॉलेज द फ्रान्स' मध्ये त्यांची नियुक्ती झाली. १९५६ ते १९६८ या कालावधीमध्ये ॲनल्सचे एकमेव संपादक म्हणून काम केले. १९६२ मध्ये त्यांनी 'मे झॉ दे सायन्सेय दाम' या संस्थेची स्थापना केली. १९७९ मध्ये लिहिलेल्या 'सिव्हीलायझेशन ॲन्ड कॅपिटलिझम फिफटिन्थ टू एटिन्थ सेंच्युरीज' पुस्तकाने फर्नांद ला लोकमान्यता मिळाली. ब्रॅदेल यांनी इतिहासलेखनामध्ये विभक्त झालेल्या भाषा, लोकसंख्याशास्त्र आहार, वेषभूषा, राहमीमान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था नागरी जीवन, भूगोल संख्याशास्त्र यांची एकत्र गुंफन करून समग्र किंवा सर्वंकष इतिहास लेखनाचा मार्ग अवलंबला.

बहूजन समाजाला कवेत घेणाऱ्या इतिहासाची मांडणी करण्याबरोबरच ब्रॅदेल यांनी १९८० साली ऑन हिस्ट्री, १९८६ साली दि आयडेण्टीटी ऑफ प्रान्स ही पुस्तके लिहली. शिवाय १९८४ मध्ये ते अकादमी फ्रॅकायवर निवडले गेले. १९८५ मध्ये त्यांचा मृत्यु झाला.

इतिहासाचे लेखन एकाकीपणे करता येत नाही. त्यासाठी ज्या भागाचा इतिहास लिहावयाचा आहे त्याच्या आसपासच्या घटनांचा संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. असा ॲनल्स परंपरेचा विचार ब्रॉडेल यांनी

दिला. इतिहासाच्या कक्षा विस्तारण्याचे कार्य ब्रॉडेल यांनी केले. मानवाच्या हालचाली भूप्रदेशावर होत असतात. म्हणून भूगोल व हवामान यांचा विचार इतिहासामध्ये झाला पाहिजे हा विचार ब्रॉडेल यांनी दिला. त्यांनी

१. भूगोलाचे महत्त्व अधोरेखित केले.

२. इतिहासामध्ये सर्व घटकांचे आकलन महत्त्वाचे असते.

३. भूगोल व हवामानाचा विचार इतिहासामध्ये झाला पाहिजे.

४. इतिहासकाराने 'काळ' ही संकल्पना नेहमी ध्यानात ठेवावी.

५. इतिहासलेखन साचेबंद नसून त्याला इतर सामाजिक शास्त्राची जोड द्यावी.

याबरोबरच ब्रॉदेलयाने काळ, गती, भौगोलिक हवामान, इतर शास्त्र याच विवेचन करून इतिहासाला विस्तृत करण्याचा प्रयत्न केला.

याशिवाय अन्य इतिहास संशोधकांनी ॲनल्स परंपरेला जगभर पसरविण्याचे कार्य केले. भारतामध्ये ॲनल्स इतिहास संशोधनपद्धतीचा सर्वप्रथम अवलंब करणाऱ्यांमध्ये हर्बन्स मुखिया यांचे नाव अग्रभागी आहे. मध्ययुगीन व प्राचीन भारतीय इतिहासाची पुराभिलेखीय, भौगोलिक व पर्यावरणीय मांडणी केली व तद्नंतर या विचारांची मांडणी भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात होवू लागली व अनेक इतिसकारांनी आपले योगदान देवून भारतामध्ये विशेषत: मध्ययुग हे ॲनाल्स पद्धतीने रेखाटण्याचा प्रयत्न केला. त्यात सुतिम गुहा, रामचंद्र गुहा, इरफान हबीब, शिरीन मुसवी व इतर इतिहासकारांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

इतिहासाच्या अध्ययनासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोण रूजविण्याचे आणि पारंपरिक इतिहासाच्या मर्यादा ओलांडून इतिहासाची नव्याने मांडणी करणारे फर्नांद ब्रॉदेल हे २० व्या शतकातील एक महान इतिहासकार मानले जातात. फर्नांद ब्रादेल हे इतिहासाच्या जडणघडणतील सामाजिक व आर्थिक घटकांचे महत्त्व ओळखणारे महान इतिहासकार होते.

**ॲनल्सची वैशिष्ट्ये :**

२० व्या शतकाच्या मध्यानंतर सुरू झालेल्या या प्रवाहाने इतिहासामध्ये घटना व व्यक्ती यानांच महत्त्व न देता घटना व व्यक्ती घडण्यामागे सभोवतालची परिस्थिती कारणीभूत असते आणि या सभोवतालच्या परिस्थितीचा विचार आपल्या ॲनल्स विचार प्रवाहामध्ये अधोरेखित केला. या विचार व लेखन परंपरेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. केवळ राजकीय इतिहासाच्या मांडणीला विरोध.

२. पारंपरिक व घटनाधिष्ठीत इतिहासाची चौकट मोडून गतकालीन मानवी समाजजीवनाचे संपूर्ण चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न.

३. गतकालीन समाजजीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी सातत्यपूर्णरितीने शास्त्रीय पद्धतीचा आग्रह हे ॲनल्सचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय.

४. शास्त्रीय पद्धतीने ज्ञानाचे संग्रहन करत असताना संशोधनासाठी निवडलेल्या साधनांचे परिशिलन करण्यावर ॲनल्सवाद्यांनी भर दिला.

५. ॲनल्सवाद्यांनी इतिहासलेखनामध्ये इतर शास्त्रांचा सहभाग घेण्याची परंपरा सुरू केली.

६. ॲनल्स परंपरेने इतिहासाला सर्वंकष, सैद्धांतिक व शास्त्रीय चौकटीमध्ये बसवून स्वत:चे एक पद्धतीशास्त्र निर्माण केले.

७. ॲनल्स विचारधोरणे आपल्या तत्त्वज्ञानाला परंपरागत स्थितीशील, जातीय, धार्मिक व वर्गीय विचारधारेतून बाजूला काढून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेमण्याचा प्रयत्न केला.

८. ॲनल्स परंपरेने स्वत:चे पद्धतीशास्त्र विकसित केले. त्याचबरोबरच इतर शास्त्राची मदत घेवून इतिहासलेखनाला गतिशीलता प्राप्त करून दिली. उदा. संख्याशास्त्र, भूगोल, समाजशास्त्र इ.

९. ॲनल्स विचारधारेने इतिहासाच्या साधनांना विपुलता प्राप्त करून दिली.

१०. समाजजीवनाचे योग्य अवलोकन होण्यासाठी समाजजीवनाचे सातत्यपूर्ण अवलोकन करणे आणि एककालीन घटनेऐवजी दिर्घकालीन किंवा समग्र अवलोकन केल्याने समाजजीवनाचे योग्य दर्शन होते अशी ॲनल्सची धारणा आहे.

ॲनल्स इतिहासकार स्वत:ला बौद्धिक क्रांतीकारक नव्हे तर बौद्धिक संशोधनाच्या क्षेत्रातील क्रांतीकारक समजतात.

**सारांश :**

२० व्या शतकामध्ये उदयाला आलेला हा ॲनल्स इतिहासलेखन विचारप्रवाह इतिहासाच्या पारंपरिक लिखाणाला विरोध करून वेगळ्या सर्वंकष व सर्वव्यापी पद्धतीने इतिहासाचे पुर्नलेखन करण्याची नवीन परंपरा निर्माण केली. ॲनल्स परंपरा ही पूर्णत: नवीनच असे काही सांगते असे नाही तर या परंपरेने

समग्रतेचा, संपूर्ण इतिहासाचा विशेषत: संदर्भसाधनाच्या परिक्षणाचा त्याच बरोबरच इतिहासाचा कालसंगतपणे प्रवाहीत करण्याचा मार्ग दिला.

ॲनल्सपूर्व कालखंडामद्ये फ्रान्स व जगामध्ये इतिहासाच्या लेखन प्रवाहाला आलेली स्थितीशिलता इतिहास लेखनाकडे झालेले दुर्लक्ष राजकीय इतिहासाचेच धडे गिरविण्याऱ्या इतिहासकार व संशोधनामध्ये झालेली वृद्धी या सर्व आंतर्विरोधातून ॲनल्स परंपरेने आपले स्वतंत्र पद्धतीशास्त्र विकसित करून एका वेगळ्या अंगाने इतिहासलेखन करण्याची दृष्टी इतिहासकारांना दिली. हे वादातील सत्य असून ॲनल्स परंपरेने इतिहासाचे एकागीपण नाकारून इतिहास व अन्य मानव्यशास्त्रात निर्माण झालेल्या भिंती नष्ट केल्या. इतिहासाची पारंपरिक चौकट नष्ट करून इतिहासाचे रूपांतरण मानव्यशास्त्रामध्ये केले.

परंपरावादी इतिहासकारांनी ॲनल्सवर कालक्रम हा इतिहासाचा आत्मा असून ॲनल्स कालक्रमाला दिलेले दुय्यम स्थान त्याचबरोबरच सभोवतालची परिस्थिती मानवी कृती नियंत्रित करते. या तत्त्वाला ॲनल्सने दिलेले प्राधान्य यावरून ॲनल्स परंपरा ही नियतीवादाकडे झुकल्याचे जाणवते. मात्र ॲनल्स पद्धतीशास्त्राचे अवलोकन करतांना असे दिसते की, इतिहासातील साचेबंद पद्धतीला फाटा देवून या परंपरेने इतिहासामध्ये विचार, पद्धतीशास्त्र, संकल्पना त्याचबरोबर इतिहासलेखन हे समग्र असावे हा नवविचार रूजविल्या आणि या नवशास्त्रीय विचारांची सर्वंकष परंपरा कार्यान्वित केली. इतिहासाच्या एकांगीपणाला ॲनल्स परंपरेने नाकारले.

ॲनल्स परंपरावाद्यांनी साधरणत: आर्थिक इतिहासकारांनी न स्पर्शिलेल्या आणि सामाजिक व सांस्कृतिक इतिहासकारांनी दुर्लक्षिलेल्या अनेक विषयाच्या विश्लेषणातून ते एक स्वतंत्र आर्थिक दृष्टिकोण तयार करतात. ॲनल्स विचारप्रणालीचे इतिहासाच्या एकमार्गी विचारसरणीच्या जागी समग्रतावादी दृष्टीकोनाचे बिजारोपन केले. या विचारप्रणालीच्या अन्वेषणात्मक दृष्टीकोणामुळे खऱ्या अर्थाने ॲनल्सच्या वर्तुळाबाहेरील इतिहासकारांनी मोठ्या प्रमाणावर संशोधन केले. यातूनच खऱ्या अर्थाने ॲनल्स प्रणालीचे महत्त्व अधोरेखित होते.

## एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. ॲनल्स विचार पद्धतीमध्ये 'वर्ल्ड सिस्टिम थेअरी' चे जनक कोण होते ?

उत्तर : फर्नांद ब्रादेल

२. १९ व्या शतकामध्ये ॲनल्स विचार पद्धतीवर कोणत्या समाजशास्त्राचा प्रभाव होता ?

उत्तर : एमिल डरखाईम

३. परंपरागत स्थितीतील राजकीय लिखाणाऐवजी ॲनल्स विचार प्रवाहाने कोणत्या पद्धतीच्या लिखाणाला सुरूवात केली.

उत्तर : आंतरविद्याशाखीय व सर्वंकष इतिहास लेखन

४. ॲनाल्स इतिहास लेखनावर कोणता प्रमुख आरोप करण्यात येतो.

उत्तर : नियतीवादी इतिहास लेखन व कालक्रमाला दिलेले दुय्यम स्थान.

५. ल्युसियन फेबवेर यांच्या मते, ॲनल्सचा मुख्य हेतू कोणता ?

उत्तर : इतिहासाचे मानव्यशास्त्रात रूपांतरण करणे.

६. प्रथमत: शास्त्रातील शास्त्रीय पद्धतीचा अवलंब इतिहासामध्ये करण्याचा प्रयत्न कोणत्या विचारप्रणालीने केला ?

उत्तर : ॲनल्स विचार प्रणाली.

७. एका घटनेवर लक्ष केंद्रित न करता समाजातील सर्वंकष घटनावर लक्ष केंद्रित करण्याचा विचार कोणत्या संशोधकाने दिला ?

उत्तर : मार्क ब्लॉक

८. ल्युसिन फ्रेबव यांनी कोणतचे पुस्तक लिहले ?

उत्तर : ॲन जिऑग्राफीकल इंटरोडक्शन टू हिस्ट्री

९. तुरूंग ही उत्तम शाळा असून तेथे संयम आणि शहनशीलता शिकायला मिळते हे उद्गार कोणाचे आहेत ?

उत्तर : फर्नांद ब्रादेल

१०. १९४९ मध्ये कॉलेज द फान्स मध्ये कोणाची नियुक्ती करण्यात आली ?

उत्तर : फर्नांद ब्रादेल

**रिकाम्या जागा भरा.**

१. ॲनल्स या विचारप्रवाहाचे मुळ स्थान ............... हे आहे.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) रशिया ड) फ्रान्स

२. ॲनल्स या शब्दाचा अर्थ ........... आहे.

अ) गतकालीन नोंदी ब) वार्षिक नोंदी

क) अशास्त्रीय नोंदी ड) अप्रवाहीत नोंदी

३. फ्रान्समध्ये ............... या वर्षी ॲनल्स नावाचे नियतकालीक होते ?

अ) १९२७ ब) १९२९ क) १९२३ ड) १९३३

४. ॲनल्स इतिहासलेखन परंपरेचा विकास ......... या शतकात झाला ?

अ) १७ व्या ब) १८ व्या क) १९ व्या ड) २० व्या

५. संपूर्ण इतिहास म्हणून .......... हा इतिहास प्रवाह ओळखला जातो ?

अ) मार्क्सवादी ब) ॲनल्स क) राष्ट्रवादी ड) साम्राज्यवादी

६. एमिल डरखाईमने १८९७ मध्ये ......... ची स्थापना केली ?

अ) Ancee Sociologique ब) Social Antroplogy

क) Social Contract ड) Social Structure

७. The Royal Touch या ग्रंथाचे लेखक .......... आहेत ?

अ) बॉडेल ब) ब्लाच क) मार्क्स ड) हेगेल

८. फर्नांद ब्रादेल या इतिहासकाराने ॲनल्स परंपरा ........ या देशात रूजवली ?

अ) ब्रिटन ब) जर्मनी क) फ्रान्स ड) अमेरिका

९. काळ ही संकल्पना इतिहासकाराने नेहमी लक्षात ठेवावी असे ....... यांनी सांगितले ?

अ) कॉम्त ब) डरखाईम क) ब्रॉदेल ड) ब्लाच

१०. भारतामध्ये ॲनल्स इतिहास संशोधन पद्धतीचा अवलंब सर्वप्रथम ......... यांनी केला ?

अ) डी.एन.झा. ब) आर.एस.शर्मा क) हरबन्स मुखिया ड) पायली व्ही.एम.

## दीर्घोत्तरी प्रश्न :

१. ॲनल्स विचार प्रवाहाच्या उदय व विकासाची चर्चा करा.

२. ॲनल्स विचारसरणीची इतिहासाविषयी असलेल्या भूमिकेची चर्चा करा.

३. ॲनल्सची आंतरविद्याशाखीय भूमिका स्पष्ट करा.

४. फर्नांद ब्रादेल यांच्या ग्रंथाची माहिती लिहा.

५. ॲनल्सची वैशिष्ट्ये विशद करा.

६. ॲनल्स विचार प्रवाहावरील आरोपांची चर्चा करा.

## पारिभाषिक शब्द :

१. ॲनल्स : या शब्दाचा शब्दश अर्थ आहे वार्षिक नोंदी. फ्रान्समध्ये १९२९ मध्ये ॲनल्स नावचे नियतकालीक होते या नियतकालीकांमधून प्रशारीत होत असलेल्या विचारसरणीला The Annals School of Thoughts असे म्हटले जाते.

२. आंतरविद्याशाखीय परंपरा : एखाद्या विषयाचे सर्वंकष ज्ञान मिळविण्यासाठी इतर संलग्न विषयाची मदत घेण्याच्या या पद्धतीला आंतरविद्याशाखीय पद्धत असे म्हणतात. उदा. इतिहासाचे अध्ययन करत असतांना ॲनल्स संशोधकानी, वन, भूगोल, अर्थशास्त्र, संख्याशास्त्र याबरोबर इतर अनेक विषय व घटकांची मदत घेतली. या पद्धतीलाच आंतरविद्याशाखीय पद्धत असे म्हणतात.

३. एमिल डरखाईन : १९ व्या शतकातील थोर समाजशास्त्रीय विचारवंत डरखाईम यांच्या विचारांचा प्रभाव ॲनल्स विचारवंतावर असल्यामुळे समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर संशोधनामध्ये करण्याचा पायंडा ॲनाल्सवाद्यांनी पाडला.

❋❋❋

# घटक ३

# आधुनिक भारतीय परंपरा

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ वासाहतिक (Colonial) इतिहासलेखन परंपरा

३.२.१.१ पौर्वात्यवादी(Orientalist) परंपरा

३.२.१.२ साम्राज्यवादी (Imperialist) परंपरा

३.२.१.३ केंब्रिज (Cambridge) परंपरा

३.२.२ राष्ट्रवादी (Nationalist) इतिहासलेखन परंपरा

३.२.२.१ प्राचिन भारत

३.२.२.२ मध्ययुगीन भारत

३.२.२.३ आधुनिक भारत

३.२.३ मार्क्सवादी (Marxist) इतिहास लेखन परंपरा

३.२.३.१ डॉ. दामोदर धर्मानंद कोसांबी

३.२.३.२ डॉ. राम शरण शर्मा

३.२.३.३ डॉ. रोमिला थापर

३.२.३.४ डॉ. इरफान हबीब

३.२.३.५ डॉ. बिपीन चंद्र

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- भारतातीलआधुनिक इतिहासलेखन परंपरांचीमाहिती मिळेल.
- भारतासंबंधीच्यावासाहतिक इतिहासलेखन परंपरेची ओळख होईल.
- भारतातीलराष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेचे ज्ञान होईल.
- भारतातीलमार्क्सवादीइतिहासलेखन परंपरेची माहिती मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक

मागील घटकामध्ये आपण युरोपमधील आधुनिक इतिहासलेखन परंपरेची माहिती घेतली. प्रस्तुत घटकात आपण भारतातील आधुनिक इतिहासलेखन परंपरांची माहिती घेणार आहोत. ब्रिटीश सत्तेच्या आगमनापूर्वी भारतात इतिहासलेखनाची परंपरा नव्हती असे मानले जात होते. या उलट, इतिहास-पुराण, फारसी इतिहासलेखन परंपरा, अखबारात तसेच बखर लेखनपरंपरा इत्यादीं सारख्या इतिहाससदृश अथवा भूतकाळासंबंधीचे लेखन करणाऱ्या परंपरा भारतात अस्तित्वात असल्याचे आपण यापूर्वीच्या घटकांमध्ये पाहिले आहे. मात्र, प्रबोधन काळात युरोपात उदयाला आलेल्या इतिहासलेखनाप्रमाणे शास्त्रशुद्धपद्धतीचे आधुनिक इतिहासलेखन हे भारतात वासाहतिक काळातच सुरु झाले हे स्पष्ट आहे.

भारताच्यासंदर्भात इतिहासलेखनाचा आरंभ आणि विकास हा विविध इतिहासकारांच्या विविध वैचारिक दृष्टीकोनांच्या अनुषंगाने झाला.इतिहासकराचा दृष्टीकोन हा त्याच्या इतिहासविषयक आकलनावर प्रभाव टाकत असतो. त्यामुळे ऐतिहासिक घटनांची कारणमीमांसा करताना इतिहासकारचा इतिहासविषयक दृष्टीकोन हा अत्यंत प्रभावी ठरतो. आधुनिक भारतीय इतिहासलेखन देखील याला अपवाद नाही. त्यामुळे विविध इतिहासकारांच्या भारताच्या इतिहासविषयक दृष्टिकोनांमुळे भारतातील आधुनिक इतिहासलेखन परंपरा यास्थूलमानाने तीन प्रवाहात विभागल्या जातात. वासाहतिक इतिहासलेखन परंपरा, राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा आणि मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा अशी भारतीय इतिहासलेखन परंपरेची विभागणी केली जाते. आधुनिक भारतीय इतिहासलेखनातील या तीन मुख्य परंपरांचा आढावा आपण प्रस्तुत घटकात घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ वासाहतिक (Colonial)इतिहासलेखन परंपरा

ब्रिटीश प्रशासक आणि इतिहासकार यांनी भारतासंबंधीच्या आकर्षणामुळे, वसाहातिक सत्तेच्या गरजेपोटी तसेच तिच्या समर्थनाकरिता इतिहासलेखन केले. या दृष्टीकोनातून केलेल्या इतिहासलेखनाला वासाहतिक इतिहासलेखन परंपरा म्हणून ओळखले जाते. वसाहतिक इतिहासलेखनपरंपरेचे पौर्वात्यवादी परंपरा, साम्राज्यवादी परंपरा आणि केंब्रिज परंपरा असे तीन प्रवाह मानले जातात.

### ३.२.१.१ पौर्वात्यवादी (Orientalist) परंपरा

#### ३.२.१.१.१ पौर्वात्यवाद, इंडोलॉजीआणिप्राच्यविद्या :

प्राचिन काळापासून पौर्वात्य जगाविषयी म्हणजेच पूर्वेकडील प्रदेशाबद्दल पाश्चात्य जगतात कमालीचे कुतूहल मिश्रित आकर्षण होते. आशियात प्रवासकरून येणाऱ्या मार्को पोलो सारख्या पाश्चात्य प्रवाशांच्या प्रवासवर्णनामुळे आणि ख्रिश्चन मिशनरींच्यामुळे युरोपात पूर्वेकडील जगताची थोडीफार माहिती पोहचत असे. पुढे या प्रदेशात व्यापारासाठी आलेल्या पाश्चात्य व्यापाऱ्यांना या प्रदेशाची भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी बाबींची माहिती करून घेण्याची आवश्यकता वाटू लागली. यातूनच पौर्वात्यवादाचा आणि पौर्वात्य विद्याभ्यासाचा उगम झाला. लॅटीनभाषेत पूर्वेला जीळशपी असे म्हणतात, या शब्दावरून इंग्रजी भाषेत पूर्वेकडीलजगताला जीळशपीं म्हणत असत. यावरूनच पूर्वेकडील जगताच्या अभ्यासासाठीजीळशपींरश्रळीम्हणजेच पौर्वात्यवाद हा शब्द रूढ झाला.

अठराव्या शतकाच्या मध्यावर भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता स्थापन झाल्यानंतर पौर्वात्यवादी दृष्टीकोनातून भारताच्या अध्ययनास सुरुवात झाली. भारतासंबंधीच्या पौर्वात्यवादी अध्ययनास खपवेश्रेसू किंवा भारतविद्या असे म्हणतात.भारताच्या या पौर्वात्यवादी अभ्यासात प्राचिन भारतीय विद्यांचा अभ्यासावर अतिशय भर देण्यात आला त्यामुळे त्याला प्राच्यविद्या असे देखील म्हटले जाते.

#### ३.२.१.१.२ पौर्वात्यवादी (Orientalist) परंपरेचाआरंभ :

सुरवातीच्या काळात धर्मप्रसारासाठी आलेले ख्रिश्चन मिशनरी आणि व्यापारासाठी आलेले व्यापारी यांना भारताच्या संबंधी ज्ञानाची आवश्यकता भासायची. भारतासंबंधी ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करण्यात जेसुईट मिशनरी आणि श्रीरामपूर येथील मिशनरी आघाडीवर होते. कोणत्या ही प्रदेशातील लोकांविषयी जाणूनघ्यायचे असेल तर त्यांच्या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असते.भारतात वेद, उपनिषदे, तसेच रामायण आणि महाभारत सारख्या महाकाव्यांची रचना झाली होती. हे प्राचीन साहित्य मुख्यत: संस्कृत

भाषेत रचले गेले होते. त्यामुळे या ग्रंथांचा अभ्यास तथा भाषांतर करण्यासाठी पौर्वात्यवादी विद्वानांनी संस्कृतचा अभ्यास केला. धर्मप्रसारासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान आवश्यक होते, त्यामुळेचश्रीरामपूरयेथीलमिशनरींनीभारतातील स्थानिक भाषांचा देखीलअभ्यासकेला.श्रीरामपूर येथील मिशनरी विल्यम कॅरी यांनी रामायण सारख्याप्राचीन संस्कृत साहित्याचे इंग्रजीत भाषांतर केले तसेच बायबलचे बंगाली, मराठी, ओरिया, संस्कृत इत्यादी स्थानिक भाषेत भाषांतर केले. मराठी भाषेच्या व्याकरणाचे पहिले पुस्तक प्रकाशित करण्याच्या मान विल्यम कॅरी यांना जातो.

### ३.२.१.१.३ पौर्वात्यवादीइतिहासलेखन :

धर्मप्रसारासाठी ज्या प्रमाणे विशिष्ठ प्रदेशातील लोकांच्या संस्कृती, धार्मिक समजुती, समाज रचना यांची माहिती आवश्यक होती, त्याचप्रमाणे त्या प्रदेशाच्या प्रशासनासाठी देखील अशामाहितीची आवश्यकता होती. भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेची स्थापना झाल्यानंतर अशा प्रकारच्या ज्ञानाची गरज वाढली. कंपनीची भारतातील सत्ता सुदृढ करण्यासाठीभारताच्या इतिहासाचे ज्ञान आवश्यक होते.ईस्ट इंडिया कंपनीचे भारतातील प्रशासक आणि अधिकार्यांनी भारताच्या इतिहासाचे अध्ययन करण्यास सुरवात केली. यातूनच भारतासंबंधी आधुनिक भारतीयइतिहास लेखनाचा आरंभ अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. भारताच्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीबद्दल जिज्ञासा आणि आकर्षण असलेला पौर्वात्यवादी इतिहासलेखन हा आधुनिक भारतीय इतिहासलेखनाचा आरंभिक प्रवाह होता.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन हे साधारणत: इ.स. १७७० पासून सक्रिय झाल्याचे दिसून येते. या काळात इंग्रज अधिकाऱ्यांनी संस्कृत आणि फारसी भाषांचा अभ्यास सुरु केला. बंगालच्या तत्कालीन गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज याने फारसी भाषेचा अभ्यास केला. ह्या भाषेच्या अध्ययनाला प्रोत्साहन देण्यासाठी हेस्टिंग्जने इ.स. १७८१ मध्ये कलकत्यात मदरसा स्थापन केला. बनारस येथे ईस्ट इंडिया कंपनीचा रेसिडंट म्हणून काम करणाऱ्या जोनाथन डंकन याने प्राचीन भारतीय विद्येच्या पुनरुज्जीवनास प्रोत्साहन दिले आणि इ.स. १७९१ मध्ये संस्कृत पाठशाळा स्थापन केली. चार्ल्स विल्किन्स याने संस्कृतचे अध्ययन करून गीतेचा इंग्रजी अनुवाद केला.

इ.स. १७६९ साली ईस्ट इंडिया कंपनीने रॉबर्ट ऑर्म याची अधिकृत इतिहास लेखक म्हणून नियुक्ती झाली. त्याने 'A History of the Military Transactions of the British Nation in Hindostan' आणि Historical Fragments of Mughal Empire, of the Marathas and of the English concerns in Hindostan' हे ग्रंथ लिहून पूर्ण केले. रॉबर्ट ऑर्म प्रमाणेच विल्यम रॉबर्टसन आणि फ्रान्सिस ग्लाडविन यांनी भारताचा इतिहास लिहून प्रकाशित केला.

### ३.२.१.१.४ सर विल्यम जोन्स आणि एशियाटिक सोसायटी :

पौर्वात्यवादी अथवा प्राच्यवादी इतिहासाचा महत्वपूर्ण टप्पा सर विल्यम जोन्स यांच्या कार्यकिर्दीत गाठला गेला. कलकत्याच्या न्यायालयाचे पहिले न्यायाधीश म्हणून त्यांची इ.स. १७८३ मध्ये नियुक्ती झाली. त्यांनी कालिदासचे शाकुंतल, जयदेव कवीचे गीतगोविंद आणि मनुस्मृती या ग्रंथांचा इंग्रजी अनुवाद केला. विल्यम जोन्स यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे इ.स. १७८४ साली गव्हर्नर जनरलच्या पाठींब्याने त्यांनी कलकत्याला 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' ची केलेली स्थापना होय. प्राचीन भारतीयविद्येच्या, वाङ्मयाच्या आणि इतिहासाच्या संशोधनाला प्रोत्साहन देणे ही या संस्थेची मुख्य उद्दिष्ट्ये होती. संशोधनाला प्रोत्साहन देण्याकरिता आणि त्यांच्या प्रसारा करिता या संस्थेमार्फत चर्चा सत्रांचे आयोजित केले जात तसेच हे संशोधनपर लेख प्रकाशित देखील केले जात. या लेखांच्या प्रकाशनासाठी संस्थेमार्फत द जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल या नावाचे एक नियतकालिक देखील सुरु झाले. ही संस्था प्राच्यविद्येच्या संशोधनाचे मुख्य केंद्र म्हणून ओळखली जाऊ लागली आणि या संस्थेसारख्या संस्था इतर प्रांतात सुरु झाल्या. मुंबई येथे एशियाटिक सोसायटी सारखीच लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे ही संस्था सर जेम्स मॅककिंटोश या मुंबईच्या मुख्य न्यायाधीशांनी इ.स. १८०४ मध्ये स्थापन केली. ही संस्था पुढे एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे या नावाने ओळखली जाऊ लागली.

विल्यम जोन्स यांनी या संस्थेच्या बैठकीत संस्कृत, फारसी आणि प्राचीन युरोपीय भाषा यांचा तौलनिक अध्ययन करून त्यातील सारखेपणा दाखवून या भाषांचे प्राचीन उगमस्थान ही एकच अतिप्राचीन भाषा असावी असा सिद्धांत मांडला. ही मूळ भाषा बोलणारे लोक हे एकाच वंशाचे म्हणजे आर्य वंशाचे असावेत आणि काळाच्या ओघात ते भिन्न प्रदेशात विभागले गेले आणि त्यांचे काही गट भारतात तसेच युरोपात आले असावेत असा सिद्धांत त्यांनी मांडला. विल्यम जोन्स यांनी ग्रीक इतिहास आणि प्राचीन भारतीय वाङमय यांच्या तौलनिक अभ्यासातून चंद्रगुप्त मौर्य याचा काळ इ.स. पूर्व ३२५ असा निश्चित केला. त्यामुळे भारतीय इतिहासातील काल निश्चिती करणे सोपे झाले.

### ३.२.१.१.५ हेन्री कोलब्रूक :

अगदी तरुण असताना कंपनीच्या सेवेत रुजू झालेल्या हेन्री कोलब्रूकने बनारस येथे संस्कृत भाषेचे अध्ययन केले. त्याने विज्ञानेश्वराचे मिताक्षर आणि जी मूत वहनच्या 'दायभाग' या हिंदू कायदे विषयक ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. वेदांचा अभ्यास करून त्या नेत्यांच्यावर दीर्घ लेख लिहिला. या लेखात वेदकालीन समाजाचे गौरवशाली प्रस्तुतीकरण केले. त्याने जैन, बौद्ध धर्मांवर स्वतंत्र लेख लिहिले. हेन्री

कोलब्रूक यांच्या संस्कृत भाषेच्या गाढ्या अभ्यासामुळे त्यांना ‘संस्कृतचा युरोपातील पहिला महान विद्वान म्हणून ओळखले जाते.

### ३.२.१.१.६ होरेस विल्सन :

इ.स. १८०८ मध्ये भारतात आलेला होरेस विल्सन हा व्यवसायाने डॉक्टर होता. त्यानेसंस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करून कालिदासच्या मेघदूतचा इंग्रजी अनुवाद केला. कल्हणच्या रजतरंगिनीवर भाष्य करत काश्मीरच्या इतिहासाचा कालानुक्रम निर्धारित केला. विष्णुपुराण या सुप्रसिद्ध पुराणावर संशोधकीय लेख लिहिले.टांकसाळीवर काम केल्याचा अनुभव असलेल्या विल्सनने भारतीय नाणकशास्त्रावर देखील संशोधकीय लेख लिहिले.

### ३.२.१.१.७ जेम्स प्रिन्सेप :

जेम्स प्रिन्सेप हा ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळीत अधिकारी म्हणून नियुक्त होता. जेम्स प्रिन्सेपला पुरातत्त्वशास्त्रात आणि उत्खननात रस होता. प्रिन्सेप यांनी एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालच्या संशोधकीय नियतकालिकेचे संपादक म्हणून देखील काम पहिले होते. या दरम्यान भारताच्या विविध भागातून नाणी आणि शिलालेख जेम्स प्रिन्सेप कडे वाचन, भाषांतर आणि प्रकाशनासाठी येत असत. यात बहुतांश मजकूर हा ब्राम्ही आणि खरोष्टी लिपीतील असे, ज्यांचा तोपर्यंत उलगडा झाला नव्हता. नॉर्वेचे संशोधक ख्रिश्चन लेसन यांनी इंडो-ग्रीक राजांच्या नाण्यांच्या आधारे काही ब्राम्ही अक्षरे ओळखली होती. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या सर्व अक्षरांचा उलगडा जेम्स प्रिन्सेपने मेजर कनिंगहॅमच्या मदतीने पूर्ण केला. इ.स. १८३६-३८ दरम्यान भारताच्या विविध भागातील शिलालेखांचे वाचन करून जेम्स प्रिन्सेपने विविध संशोधकीय लेखांच्या स्वरूपात प्रकाशित केले. भारतातील विविध शिलालेख आणि नाण्यांवरील लेखांवर देवानामप्रियपियदसी असा एका शासकाचा उल्लेख मिळत असे. जेम्स प्रिन्सेपला हा कोणीतरी श्रीलंका येथील राजा असावा असे वाटत होते. मात्र पुढे फिलीप टर्नऑरने श्रीलंकेहून पाठलेल्या पाली ग्रंथावरून ही पदवी मौर्य सम्राट अशोकची असल्याचा जेम्स प्रिन्सेपला उलगडा झाला. या शोधामुळे देशभर विखुरलेले हे शिलालेख सम्राट अशोकचे असल्याचे सिद्ध झाले.

### ३.२.१.१.८ सरअलेक्झांडरकनिंगहॅम :

ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात इंजिनियरींग विभागात अधिकारी असणाऱ्या अलेक्झांडर कनिंगहॅम यांना ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय संशोधनाची प्रचंड आवड होती. सैन्यातील नोकरीमुळे भारतातील विविध ठिकाणी त्यांच्या बदल्या होत असत. या बदल्यांच्या दरम्यान त्यांनी भारतातील अनेक प्राचीन स्थळांचा दौरा केला. त्यांनी सारनाथ, संकासा आणि सांची येथे पुरातत्त्वीय उत्खनन केले. पुरातत्त्वीय

अवशेषांच्या आधारावर बौध्द धर्माचा इतिहास त्यांनी आपल्या 'The Bhilsa Topes (१८५४) या ग्रंथातून मांडला. त्याचा बरोबर प्राचीन भारतातील ऐतिहासिक स्थळांची भौगोलिक माहिती देणारा ग्रंथ' Ancient Geography of India (१८७१) हा ग्रंथ देखील त्यांनी प्रकाशित केला. तक्षशीला, श्रावस्ती, कौसांबी, वैशाली आणि नालंदा इत्यादी प्राचीन स्थळांची स्थान निश्चिती करण्याचे श्रेय कनिंग हॅम यांना जाते. सर अलेक्झांडर कनिंग हॅम यांच्या पुरातत्त्वीय संशोधनातील ज्ञानामुळे Archaeological Survey of India या संस्थेचे पहिले संचालक म्हणून इ.स. १८७१ साली त्यांची नेमणूक करण्यात आली.

### ३.२.१.१.९ मॅक्समुल्लर :

इंग्रज अभ्यासकांप्रमाणे अनक्वेटील ड्यूपराँ, युजीन बरनॉफ, ऱ्हीस डेव्हिस सारखेइतर युरोपीय राष्ट्रातील अभ्यासक देखील प्राच्यविद्येकडे वळले. या युरोपीय विद्वानांमध्ये जर्मनीच्या मॅक्समुल्लर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. मॅक्समुल्लर हे ऑक्सफोर्ड विद्यापीठात तौलनिक तत्त्वज्ञानाचे अध्यापक होते. संस्कृतचे चांगले ज्ञान असलेल्या मुल्लर यांनी पौर्वात्य जगतातील धर्मांचा तौलनिक अभ्यास केला होता. पूर्वेकडील सुमारे पन्नास धार्मिक ग्रंथांचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला जो 'The Sacred Books of the East' या नावाने प्रसिद्धी पावला. आर्य हे बाहेरून भारतात आले हा सिद्धांत मॅक्समुल्लर यांनी उचलून धरला.

### ३.२.१.१.१० पौर्वात्यवादी परंपरेचे मूल्यमापन :

पौर्वात्य जगाविषयीच्या आकर्षणाने आणि कुतूहलामुळे प्रेरित विद्वानाच्या संशोधनामुळे बऱ्याच प्रमाणात अज्ञात असलेल्या भारतीय इतिहासाचा आणि संस्कृतीच्या अभ्यासास गती मिळाली. त्यातून प्राचिन भारताविषयीचे ज्ञान नव्या पिढीला उपलब्ध झाले. प्राचिन भारतीय साहित्याचे आणि तत्वज्ञानाचे इंग्रजीत भाषांतर झाल्यामुळे युरोपीय जगाला भारताचा नव्याने परिचय झाला. युरोपातील सर्वसामान्य समजुती प्रमाणे भारतातील लोक मागासलेले व रानटी नसून प्राचिन भारतीय संस्कृती अतिशय प्रगत होती याचीयुरोपीय लोकांना जाणीव झाली.

पौर्वात्यवादी परंपरेच्या संशोधनामुळे ब्राम्ही, खरोष्टी सारख्या लिपींचा उलगडा होऊन प्राचिन भारताच्या इतिहास संशोधनाची नवी कवाडे खुली झाली. या संशोधकांनी केलेल्या कालनिश्चिती मुळे घटनांची संगतवार मांडणी करणे शक्य झाले.पुरातत्त्वीय शोधांमुळे प्राचिन इमारती, स्तूप, गुहाशिल्प, चित्रकला यांतील प्राचिन भारतीयांची प्रगती समोर येऊन भारतीय संस्कृतीची संपन्नता जगासमोर आली.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहास आणि संस्कृती यांचा गौरवशाली भूतकाळ समोर आणल्यामुळे भारतीय अभ्यासकांना देखील प्राचिन भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाली. भारतीय अस्मिता जागरूक होण्यात पौर्वात्यवादी इतिहासलेखनातील भारताचे गौरवीकरण

तर थोडे फार कारणीभूत ठरलेच पण त्याच बरोबर भारतीय अस्मिता जागृत झाल्याने अनेक भारतीय प्राच्यविद्या अभ्यासाकडे वळले.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेने जसे काही लाभकार गोष्टी घडल्या तश्याच काही नकारात्मक गोष्टी देखील घडल्या. पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेतून मांडले गेलेले घाटीते, विचार आणि सिद्धांत इतकी रूढ आणि प्रचलित झाली की भारतीयांना देखील त्यांच्याच नजरेतून इतिहासाकडे पाहावे लागले. वैदिक संस्कृती ही आर्यांची संस्कृती होती, आर्य बाहेरून आले होते आणि आर्य श्रेष्ठ होते अशा सिद्धांकनामुळेआर्य श्रेष्ठत्वाचा दुराभिमान तर वाढलाच त्याच बरोबर द्रविड संस्कृतीला मागास समजण्याची प्रवृत्ती देखील वाढली. या मुळे आर्य विरुद्ध द्रविड अशा संघर्षाची देखील मांडणी केली जाऊ लागली. पौर्वात्यवादी परंपरेने प्राचीन भारतीय ज्ञानाच्या केलेल्या गौरवीकरणामुळे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभिमानाला दुराभिमानाचे स्वरूप आले.

### ३.२.१.२ साम्राज्यवादी (Imperialist) परंपरा :

### ३.२.१.२.१ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा आरंभ :

भारताच्या प्राचिन इतिहास आणि संस्कृतीचे गौरवीकरण करणारा पौर्वात्यवादी इतिहासलेखन प्रवाह अठराव्या शतकाच्या अखेरीस क्षीण होऊ लागला.अठराव्या शतकाच्या अखेरीसभारताच्या बहुतांश भागात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली होती. संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून ते दृढमूल करण्याच्या दृष्टीने इंग्रजांच्या साम्राज्यवादी आकांक्षा वाढीस लागल्या. आपली सत्ता दीर्घकाळ राहावी यासाठी भारतीय लोक इंग्रजांची सत्ता बिनविरोध मान्य करतील अशी उपाययोजना करणे इंग्रजांना आवश्यक होते. शस्त्राच्या बळावर अशा प्रकारचे वर्चस्व दीर्घकालिक राहू शकत नाहीत, त्यामुळे भारतीयांवरील इंग्रजांच्या सत्तेला तार्किक आधार देणे गरजेचे होते. हा तात्विक आधार इंग्रजांना भारतीयांच्या तुलनेत श्रेष्ठ ठरवत जेत्यांना भारतीयांवर सत्ता गाजवण्याचा नैतिक अधिकार असल्याचे ठासून सांगणारा असायला हवा होता. जेरोमी बेन्थेमचा उपयुक्ततावाद, इव्हेंजेलिकल्स (Evangelicals) अर्थात शुभवर्तमानवादी ख्रिस्ती धर्मसंप्रदायाचा प्रभाव, चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांतिच्या सिद्धांतावर आधारित सामाजिक डार्विनवाद आणि गौरवर्णाच्या श्रेष्ठत्वाच्या वंशवादी सिद्धांत अशा विभिन्न वैचारिक दृष्टीकोनानी इंग्रजांच्या भारतावरील सत्तेच्या तात्विक आधाराला आकार दिला. साम्राज्यवादाच्या हा तात्विक आधार मुख्यत: पाच गृहीतकांवर आधारलेला होता.

(१) भारतीय समाज हा मागसलेला, अप्रगत, गतिहीन आणि रानटी समाज होता.तसेच येथील संस्था आणि व्यवस्था ह्या कालबाह्य झाल्यामुळे उपयुक्तता आणि बुद्धिप्रामाण्य यांच्या आधारावर भारतात आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

(२) बौद्धिक, शास्त्रीय आणि भौतिक प्रगतीमुळे इंग्लंड हे श्रेष्ठ व प्रगत राष्ट्र बनले आहे. भारतासारख्या मागासलेल्या देशात उपयुक्तावादाच्या निकषावर भारताची व्यवस्था लावणे आवश्यक आहे. भारताचे सत्ताधीश बनलेल्या इंग्रजांनीकायद्याच्या, प्रशासनाच्या आणि पाश्चात्य शिक्षणाच्या आधारे अशी व्यवस्था निर्माण करावयास हवी.

(३) इंग्लंड हे प्रगत आणि सुसंस्कृत राष्ट्र असल्यामुळे भारतासारख्या मागासलेल्या समाजांना सुसंस्कृत करण्याचे आणि त्यांच्या उत्थानाचे कार्य ईश्वराने इंग्रजांवर सोपवली आहे.

(४) भारतीय समाज दुबळा आणि मागास असल्यामुळेप्रगत आणि बलशाली इंग्लंड सोबतच्या संघर्षात इंग्लंडचा विजय होणे हे बळी तो कान पिळी या निसर्ग नियमानुसार योग्यच आहे.

(५) गौरवर्णीय लोक हे प्रगत आणि काळे लोक अप्रगत असतात. त्यामुळे काळ्या लोकांवर राज्य करण्याचा गौरवर्णीयांना फक्त अधिकार नसून त्यांच्यावर ईश्वराने लादलेली नैतिक जबाबदारी आहे.

अशा प्रकारच्या गृहीतकांच्या आधारे भारतीयांना इंग्रजांच्या तुलनेत कनिष्ठ ठरवले, इंग्रजांच्या श्रेष्ठत्वाच्या आधारावर त्यांच्या भारतावरील सत्तेला नैतिक अधिष्ठान देण्याचे कार्य साम्राज्यवादी इतिहास लेखनाने केले.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या सुरवातीच्या काळात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पौर्वात्यवाद आणि साम्राज्यवाद यांचा संमिश्र प्रभाव असलेले काही साम्राज्यवादी इतिहासकार होते. यात माऊंट स्ट्युअर्ट एलफिन्स्टन, ग्रांट डफ आणि जेम्स टॉड सारख्या प्रशासकीय इतिहासकारांचा समावेश होतो. या उलट, जेम्स मिल सारखे इतिहासकार अगदी सुरवातीपासूनच साम्राज्यवादी इतिहासलेखन करत होते आणि १८५७ च्या उठावानंतर इतिहासकारां मधील साम्राज्यवादी भावना अधिक तीव्र होत गेल्याचे दिसून येते.

### ३.२.१.२.२ जेम्स मिल :

लंडन मध्ये ईस्ट इंडिया कंपनीमध्ये पत्रव्यवहार तपासनीस म्हणून काम करणाऱ्या जेम्स मिल याने भारताला प्रत्यक्ष कधीही भेट न देता भारताचा इतिहास लिहिला.कंपनीच्या भारतासंबंधीच्या पत्रव्यवहारावरून जेम्स मिलचा भारता संबधी दृष्टीकोन बनला होता. पूर्वीचे इतिहासकार, ख्रिश्चन मिशनरी यांनी लिहिलेली माहिती इत्यादींच्या आधारे जेम्स मिलने सन १९०६ साली भारताचा इतिहास लिहिण्यास आरंभ केला. त्याने १८२६ पर्यंत एकूण सहा खंडात History of British India शीर्षकाचा ग्रंथ प्रकाशित केला. जेम्स मिलच्या या ग्रंथाला इंग्लंड मध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. भारतावरील ब्रिटीश सत्तेच्या प्रस्थापनेचे तात्विक समर्थन असल्यामुळे आणि भारतासंबंधी विश्वसनीय ग्रंथ असल्यामुळे

कंपनीच्या अधिकाऱ्यांसाठी या ग्रंथाचे वाचन आवश्यक मानले गेले. जेम्स मिल याला साम्राज्यवादी इतिहास लेखनाचा जनक आणि त्याच्या ग्रंथाला ब्रिटीश साम्राज्यवादाचे बायबल मानले जाते.

साम्राज्यवादी विचाराने प्रभावित जेम्स मिलने वर उल्लेखल्या गृहीतकांच्या आधारवर भारतीयांच्या मागासलेपणाची ऐतिहासिक मांडणी करत भारतावरील ब्रिटीश सत्तेचे समर्थन केले. जेम्स मिलने भारताच्या इतिहासाचे कालविभाजन हिंदू काळ, मुस्लिम काळ आणि ब्रिटीश काळ अशी धार्मिक आधारावर केली. यामुळे भारताच्या इतिहासाची धार्मिक आधारे कालविभाजनाची प्रथा पडली आणि यातच भारताच्या जमातवादी इतिहास लेखनाची मुळे सापडतात. जेम्स मिलने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूंची निंदानालस्ती केली. हिंदुना मागास ठरवून मुसलमानांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले.आणि सहाजिकच ब्रिटीशांना हिंदू आणि मुस्लिमांपेक्षा श्रेष्ठ ठरवले. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अनेक पिढ्या मिलच्या साम्राज्यवादी विचारसरणीवर, वंशश्रेष्ठत्वाच्या दंभावर पोसल्या गेल्या.

### ३.२.१.२.३ हेन्री इलियट :

जेम्स मिल याने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूंची निंदानालस्ती केली आणि त्याच्या इतिहासाला विकृत स्वरूप देत मुस्लिमांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले. जेम्स मिलच्या अगदी उलट चित्र हेन्री इलियट आणि त्याचा सहलेखक जॉन डाऊसन यांनी रंगवले. ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीस असलेल्या इलियटने फारसी भाषेचा अभ्यास करून मुस्लिम शासनकाळातील इतिहासाच्या ग्रंथांची हस्तलिखिते एकत्र केली आणि त्यांचे भाषांतर केले. इलियटने ही भाषांतरे History of India as Told by its Own Historians या शीर्षकाखाली आठ खंडात प्रकाशित केले. या कामत लंडन येथील प्राध्यापक जॉन डाऊसन याने त्याला सहाय्य केले. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने भारतातील मुस्लिम शासकांना जुलमी, अत्याचारी ठरवले. मुस्लिम शासकांना अक्षम आणि नालायक ठरवत त्यांना कायद्याच्या राज्याची संकल्पना माहित नसल्याचे प्रतिपादन इलियटने केले. त्यामुळे भारताला पहिल्यांदाच न्यायप्रिय नि:पक्षपाती शासक इंग्रजांच्या रुपात लाभले असून भारतात कायद्याचे राज्य निर्माण करण्याची ऐतिहासिक कार्य ब्रिटीश प्रशासन करत आहे असा निष्कर्ष इलियटने काढला. इलियटच्या अशाप्रकारच्या मांडणीमुळे ब्रिटीश नोकरशाहीत आत्मश्रेष्ठत्वाची भावना वाढीस लागली.

### ३.२.१.२.४ माऊंट स्ट्युअर्ट एलफिन्स्टन :

मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून काम केलेल्या एलफिन्स्टनचा दृष्टीकोन जेम्स मिल पेक्षा थोडा भिन्न होता.प्रत्यक्ष भारतात काम करून मिळालेलाअनुभव आणि पौर्वात्यवादी इतिहासकारांच्या ग्रंथांचा अभ्यास केल्यामुळे जेम्स मिलच्या मांडणीशी एलफिन्स्टनचे मतभेद होते. जेम्स मिलचे लिखाण वस्तुनिष्ठ नसून त्याने

प्राचीन भारतीयांचे योग्य मूल्यमापन केले नसल्याची टीका एलफिन्स्टनने केली. इंग्लंडला परतल्या नंतर १८४१ साली एलफिन्स्टनने History of Hindu and Muhammadan India या शीर्षकाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. भारताच्या राजकीय इतिहासाच्या पेक्षा सांस्कृतिक इतिहासावर भर देऊन भारतातील शासन व्यवस्था, समाजव्यवस्था , चालीरीती, धर्म,साहित्य, तत्त्वज्ञान, कला, व्यापार, परदेशी सागरी व्यापार, उद्योग इत्यादींच्या विषयांवर एलफिन्स्टनने लेखन केले. भारतासंबंधी प्रतिकूल दृष्टीकोन न बाळगता सहानभूतीपूर्वक आणि उदारवादी दृष्टीकोनातून भारताचा इतिहास लिहिला असला तरी भारतावरील ब्रिटीश शासनाची आवश्यकता असल्याचे त्याने प्रतिपादन केले.

एलफिन्स्टनच्या हाताखाली काम केलेल्या ग्रांट डफ आणि जेम्स टॉड यांच्या सारख्या अधिकाऱ्यांच्या इतिहासलेखनावर एलफिन्स्टनच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. साताऱ्यामध्ये रेसिडेंट म्हणून काम करणाऱ्या ग्रांट डफने बखर, कैफियती सारखी मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने गोळा करून त्या आधारे History of the Marathas हा ग्रंथ दोन खंडात लिहून प्रकाशित केला. जेम्स टॉडने Annals and Antiquities of Rajastan या ग्रंथात राजपुतान्याचा इतिहास मुळ साधनाच्या आधारे मांडला. या दोहोंच्या लिखाणात भारतीयांच्याविषयीचा तुच्छतादर्शक दृष्टीकोन दिसत नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम हंटर, हेन्री मेन, जेम्स स्टीफन्स, जे.टी. व्हीलर, आल्फ्रेड लायल यांच्या सारख्या साम्राज्यवादी इतिहासकारांनी १८५७च्या उठावानंतर भारताच्या इतिहासासंबंधी विभिन्न विषयांवर लेखन करत ब्रिटीश शासकांची भूमिका अधिक कट्टर साम्राज्यवादी बनवली.

### ३.२.१.२.५ साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन :

भारतावरील ब्रिटीश सत्ता दीर्घकाळासाठी दृढमूल करण्यासाठी ब्रिटीश साम्राज्यवादाचे तात्विक समर्थन करण्याच्या प्रक्रियेतून साम्राज्यवादी इतिहासलेखन परंपरा विकसित झाली. भारतीयांच्या बाबतीत तुच्छतापूर्ण आणि पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन ठेऊन भारतीय इतिहासाचे हनन करण्यात आले. भारतीयांना स्वशासन करण्यास नालायक ठरवून ब्रिटीशांच्या सत्तेचे समर्थन करण्यात आले.

साम्राज्यवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनाचा वापर करत आधुनिक पद्धतीने इतिहासलेखन केले. त्यामुळे त्यांनी मांडलेली मते मोठ्या प्रमाणात विश्वसनीय मानली गेली. भारतीयांच्या मागासलेपणाची मांडणीचा प्रभाव नवशिक्षित भारतीयांच्या सुरवातीच्या पिढीवर पडून भारतीय संस्कृतीविषयी न्युनगंडाची भावना त्यांचा मनात निर्माण झाली. साम्राज्यवादी इतिहासकरांनी भारतीयांच्या मध्ये ऐक्याचा अभाव आणि सततचा धार्मिक संघर्ष असल्याची मांडणी केली. अशाप्रकारच्या मांडणी मुळे हिंदू-मुस्लिम दुहीची बीजे

पेरली गेली ज्याची परिणीती अंतिमत: भारताच्या फाळणीत झाली. साम्राज्यवादी इतिहासकारांच्या भारतासंबंधीच्या पूर्वग्रहदुषित मांडणीचा भारतीयांद्वारे प्रतिवाद करण्याचा आरंभ विसाव्या शतकातील राष्ट्रवादी प्रेरणेतून निर्माण झाला.

### ३.२.१.३ केंब्रिज (Cambridge) परंपरा

#### ३.२.१.३.१ केंब्रिज परंपरेचा आरंभ :

वासाहतिक शासनाद्वारे भारतीयांचे सर्वांगीण  शोषण झाल्यामुळे भारतीयांच्यात राष्ट्रवादी भावना निर्माण होऊन त्यातून भारतीय राष्ट्रवाद विरुद्ध ब्रिटीशांचा साम्राज्यवाद असा संघर्ष उभा राहिला अशी मांडणीआधुनिक भारताच्या राष्ट्रवादी इतिहास लेखनात केली गेली होती. मात्र, भारतातील ब्रिटीश शासन हे भारतीयांना उपकार ठरले, ब्रिटीशांच्या एक छत्री अंमलामुळे भारतात केंद्रीकृत शासन स्थापित झाले, स्थानिक प्रशासनात ब्रिटिशांनी भारतीयांना संधी दिली. या ब्रिटिशांनी केलेल्या या दोन बाबींच्या मुळे भारतीयांत राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. भारतीयांचा स्वातंत्र्य लढा हा ब्रिटीशांच्या विरोधातला संघर्ष नसून भारतीय अभिजनांनी स्वत:च्या हित संबंधांचे रक्षण आणि सत्तेत वाटा मिळवण्यासाठी चालवलेली चळवळ होती. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्याची, भारतीय राष्ट्रवादाची आणि भारतीय राजकारणाची पुर्नव्याख्या करणाऱ्या इतिहास लेखन प्रवाहाला केंब्रिज इतिहास लेखन  परंपरा म्हणून ओळखले जाते.अशा प्रकारची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांचे लेख आणि ग्रंथ केंब्रिज विद्यापीठाच्या प्रकाशनाद्वारे आणि मॉडर्न एशियन स्टडीज यास संशोधन पत्रिकेत प्रकाशित होत असत, त्यामुळे त्यांना केंब्रिजपरंपरा म्हणून ओळखले जाऊ लागले. नव-साम्राज्यवादाचा प्रभाव असलेली ही परंपरा १९६० च्या दशका पासून १९९० च्या दशकापर्यंत प्रभावी होती.

#### ३.२.१.३.२ अनिल सील :

केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनीटी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केलेले अनिल सील हे केंब्रिज परंपरेचे अत्यंत महत्वाचे इतिहासकार मानले जातात. 'The Emergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in Nineteenth Century' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात आणि Imperialism and Nationalism in India यात सील यांनी भारतीयराष्ट्रवाद ही बहुसंख्य भारतीयांच्या हितसंबंधांसाठी चालवली गेलेली चळवळ होती या मांडणीवर प्रश्न चिन्ह उभे करतात. अनिल सील यांच्या मते, आधुनिक भारताची जडणघडण ही ब्रिटीश साम्राज्यवादाच्या प्रभावामुळे झाली. ब्रिटीशांच्या वसाहतीक सत्तेने निर्माण केलेल्या प्रशासकीय-राजकीय चौकटीत भारतीय राष्ट्रवादी चळवळीची वाढ झाली. भारतीयांचे एकूण राजकारण हे छोट्या छोट्या गटांमधील चढाओढी पुरते मर्यादित होतेआणि त्यामुळे

भारतीय हे विभाजित राहिले. एका मर्यादेपर्यंत ब्रिटिशांनी फोडा व झोडा नीतिचा अवलंब केला असेल. मात्र, ब्रिटीश हे दुफळी माजवणारे राज्य करते होते असे म्हणता येणार नाही.अशा प्रकारची परोपकारी साम्राज्यवाद दर्शवणारी मांडणीअनिल सील यांनी केली आहे.

### ३.२.१.३.३ ख्रिस्तोफर बेली :

केंब्रिज विद्यापीठातील जागतिक आणि भारताच्या इतिहासाचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून ख्रिस्तोफर बेली हे ओळखले जातात. अलाहबाद शहराचा, त्याच्या परिसराचा, तिथल्या पारंपारिक अभिजन वर्गाचा, मूल्यव्यवस्था आणि चालीरीतींचा बेलीयांनी अभ्यास केला. त्यांच्या मते, ब्रिटीश सत्तेमध्ये उदयाला येणारी राजकीय व्यवस्था ही विभिन्न स्थानिक अराजकीय घडामोडींना सामावून घेण्यास सक्षम होती. राजकीय, आर्थिक व धार्मिक हित संबंधातील सरमिसळ हे तत्कालीन उत्तर भारताचे वैशिष्ट्य असल्याची मांडणी बेली यांनी केली. ख्रिस्तोफर बेली यांचा Patrons and Politics in Northern India हा लेख आणि त्यानंतर प्रकाशित झालेला The Local Roots of Indian Politics हा ग्रंथ बेलींची मांडणी समजून घेण्यास उपयुक्त ठरतो.

### ३.२.१.३.४ गॉर्डन जॉन्सन :

केंब्रिज विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या गॉर्डन जॉन्सन यांनी भारतीय राष्ट्रवादी चळवळीतील प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरांतील चढाओढ ही केवळ वैयक्तिक हेवेदाव्यांतून निर्माण झाल्याची मांडणी आपल्या संशोधनातून केली. भारतीय नेतृत्व हे मुलत: स्थानिक मुद्द्यां भोवतीच घुटमळत असत आणि ब्रिटीशांच्या सौजन्यामुळेच ते राष्ट्रीय स्तरावर क्रियाशील झाले, अशी पुस्ती देखील जॉन्सन जोडतात. गॉर्डन जॉन्सन यांचा Provincial Politics and Indian Nationalism हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

जॉन गॅलाघर, रिचर्डगॉर्डन, डेव्हिड वाशब्रूक, ख्रिस्तोफर बेकर, बी. आर. टॉमिल्सन आणि ज्युडिथ ब्राऊन यांनी देखील थोड्या फारफरकाने अनिल सील, सी.ए.बेली, गॉर्डन जॉन्सन यांच्या प्रमाणेच भारतीय राष्ट्रावादासंबंधी मांडणी केली.

### ३.२.१.३.५ केंब्रिज परंपरेचेमूल्यमापन :

ब्रिटीश साम्राज्यवादाची भलावण करणाऱ्या केंब्रिज इतिहास लेखन परंपरेच्या इतिहासकारांवर इतर इतिहासकारांनी बरीच टीका केली आहे. तरी देखील केंब्रिज परंपरेच्या इतिहासकारांचे भारताच्या इतिहास लेखनास सकारात्मक योगदान मिळाल्याचे मान्य करावे लागते. केंब्रिज परंपरेच्या इतिहासकारांनी आधुनिक भारताच्या इतिहासासमोर काही नवीन प्रश्न उभे केले. भारतातील बहुजिनसी राजकारणाचा उगम कसा झाला ? स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकीय संघटनांमध्ये संपर्क कसा विकसित झाला ? पारंपारिक

स्थानिक अभिजानांकडे सत्ता कशी हस्तांतरित झाली ? या प्रश्नांच्या सोबतच केंब्रिज परंपरेने संख्यात्मक व परिस्थितीक विश्लेषण, राजकीय समाजशास्त्र आणि राजकीय चरित्रलेखनासारखी अनेक तंत्रे उपलब्ध करून दिली.

केंब्रिज परंपरेच्या इतिहासलेखनाच्या काही मर्यादा देखील दिसून येतात. केंब्रिज परंपरेच्या संशोधन पद्धतीतील समाजवैज्ञानिक धरणांना व्यापक बैठक नव्हती. भारताच्या विशाल बहुविविधतेला एका चळवळीत जोडून घेण्यातील काँग्रेसच्या यशापयशाची चर्चा ते करत नाहीत. केंब्रिज परंपरेतील अपवाद वगळता बहुतांश लेखकांनी भारतीय साधने संशोधनासाठी वापरलीच नाही. त्यामुळे भारतीयांची बाजू त्यांना नीटपाने समजूनच घेता आली नाही. त्या मुळे ठराविक घटनांना लोकांनी काय व का प्रतिसाद दिला हे त्यांना उमगले नाही. त्यांनी आर्थिक स्वार्थ ही राष्ट्रीय चळवळी मागील मुख्य प्रेरणा असल्याचा संकुचित अर्थ लावला. भारतीय राष्ट्रवादी चळवळीला स्वार्थाने प्रेरित ठरवून टाकल्यामुळे केंब्रिज इतिहासकारांच्या लिखाणात नैतिक अहंगंड जाणवतो.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बायबल चे स्थानीय भाषेत भाषांतर कोणी केले?

२) गीतेचा इंग्रजी अनुवाद कोणी केला?

३) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा जनक कोणास मानले जाते?

४) ग्रांट डफ आणि जेम्स टॉड यांनी कोणाच्या हाताखाली काम केले?

५) ख्रिस्तोफर बेली यांनी कोणत्या शहराचे अभ्यास केला?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) कंपनीच्या सेवेत रुजू झालेल्या.................. ने बनारस येथे संस्कृत भाषेचे अध्ययन केले.

२) ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात इंजिनियरींग विभागात अधिकारी असणाऱ्या ............... यांना ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय संशोधनाची प्रचंड आवड होती.

३) आर्य हे बाहेरून भारतात आले हा सिद्धांत .................. यांनी उचलून धरला.

४) इंग्लंडला परतल्या नंतर १८४१ साली .................. ने History of Hindu and Muhammadan India या शीर्षकाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केला.

५) Provincial Politics and Indian Nationalism हा ग्रंथ .................. यांनी लिहिला.

## ३.२.२ राष्ट्रवादी (Nationalist) इतिहासलेखन परंपरा

१९ व्या शतकात वासाहतिक सत्तेखालील भारतात आधुनिक शिक्षण आणि नोकऱ्यांच्या संधींमुळे मध्यमवर्गाचा उदय झाला. या मध्यमवर्गावरील पाश्चात्य वैचारिक प्रभावातून राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. वासाहतिक इतिहासलेखनात भारताच्या इतिहासाच्या मांडणीला प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रवादी दृष्टीकोनातून भारतीय इतिहासलेखनाची परंपरा निर्माण झाली. प्राचिन भारत, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक भारत यांच्या इतिहासाचे राष्ट्रवादी दृष्टीकोनातून विश्लेषण करून त्याला गौरवशाली भूतकाळाच्या रुपात त्याची मांडणी राष्ट्रवादाने प्रेरित भारतीय इतिहासकारांनी केली. या इतिहासलेखन परंपरेला भारतातीलराष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा म्हटले जाते.

राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा ही अत्यंत व्यापक होती. एकोणिसाव्या शतकात तिचा उगम होऊन विविध टप्प्यात आणि विविध उप्रवाहांच्या स्वरूपात विसाव्या शतकात प्रभावी बनली. या परंपरेचे प्राचीन भारत, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक भारत या तीन काळांसंदर्भातील इतिहासलेखनाचे तीन विभाग करता येतात.

### ३.२.२.१ प्राचिन भारत :

साम्राज्यवादी इतिहासकारांनी प्राचीन भारतीय संस्कृतीची निंदानालस्ती केली होती. प्राचीन भारतात कोणत्याही प्रकारच्या संस्था अस्तित्वात नव्हत्या अशा प्रकारची विधाने त्यांनी केली होती. भारताचा प्राचीन काळ हा अप्रगत आणि रानटी असल्याचे या इतिहासकारांचे मत होते. साम्राज्यवादी इतिहासकारांच्या या विधानांचे खंडन प्राचीन भारतासंबंधी इतिहासलेखन करणाऱ्या राष्ट्रवादी इतिहासकारानी केले.

#### ३.२.२.१.१ काशीप्रसाद जयस्वाल :

व्यवसायाने वकील असलेल्या काशीप्रसाद जयस्वाल हे प्राचीन भारतीय संस्कृतीच्या वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी इतिहास संशोधन आणि इतिहासलेखनाकडे वळले. संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून धर्मशास्त्रीय ग्रंथांचा, कोरीव लेखांचा, प्राचीन नाण्यांचा त्यांनी अभ्यास केला. जयस्वाल यांनी

Hindu Polity आणि History of India (150-350AD) हे दोन मौलिक ग्रंथ लिहिले. साम्राज्यवादी इतिहासकरांनी भारतात प्राचीनकाळी फक्त निरंकुश राज्यसत्ता होती, कोणत्याही प्रकारच्या प्रातिनिधिक संस्था नव्हत्या अशी मांडणी केली होती. या मांडणीला काशी प्रसाद जयस्वाल यांनी सबळ पुराव्यानिशी छेद दिला. त्यांनी वैदिक काळातील सभा व समिती, बौद्ध संघातील लोकशाहीचे तत्त्व, सोळा महाजनपद मधील गणराज्ये इत्यादीं संस्थांचे प्राचीन भारतातील अस्तित्व सिद्ध करून साम्राज्यवादी इतिहासकारांची मांडणी खोडून टाकली. त्यांच्या लिखाणातून त्यांचा प्रखर राष्ट्रवाद आणि प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान दृष्टीस पडतो.

### ३.२.२.१.२ राधा कुमुद मुखर्जी :

भारतीयांनी कोणतीही भौतिक व शास्त्रीय प्रगती केली नसल्याचे साम्राज्यवादी इतिहासकारांचे मत राधा कुमुद मुखर्जी यांनी आपल्या विविध ग्रंथातून खोडून काढले. The History of Indian Shipping Maritime Activity from the earliest Times, Local Self Government in Ancient India, Ancient Indian Education, The Fundamental Unity of India आणि The Gupta Empire' इत्यादी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि विविधांगी ऐतिहासिक ग्रंथ मुखर्जी यांनी लिहिले. प्राचीन काळापासून मुघल काळापर्यंत भारतीयांच्या नाविक आणि व्यापारिक हालचाली, भारतातील शिक्षण व्यवस्था, विभिन्न भाषांमधील साहित्यांची निर्मिती, भौगोलिक-राजकीय-सांस्कृतिक ऐक्याची चिन्हे यांची माहिती देत मुखर्जी यांनी भारतीय इतिहासाची राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेत बसणारी मांडणी केली.

### ३.२.२.१.३ डॉ. रामकृष्ण भांडारकर :

संस्कृत, प्राकृत आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राचा त्यांचा सखोल अभ्यास होता. The Early History of the Deccan आणि A Peep into the Early History of India हे भांडारकर यांचे सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत. शास्त्रीय इतिहासलेखन पद्धतीचे पुरस्कर्ते असलेल्या भांडारकरांनी आपल्या ग्रंथांत दख्खनच्या आणि भारताच्या इतिहासातील राजकीय घडामोडींसोबतच आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचे देखील चिकित्सक विवेचन केले. प्राच्यविद्येतील संशोधनासाठी सुप्रसिद्ध भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट ही संस्था त्यांच्या कार्याचे प्रतिक आहे.

### ३.२.२.१.४ डॉ. अनंत सदाशिव आळतेकर :

बनारस हिंदूविद्यापीठात आणि पटना विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या आळतेकरांनी शिलालेख, ताम्रपट, पुरावशेष, नाणी यांचा गाढा अभ्यास केला होता. प्राचीन भारत हा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता हा समज आळतेकरांनी Education in Ancient India या ग्रंथाच्या माध्यमातून खोडून

काढला. प्राचीन काळच्या स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करून प्राचीन काळी स्त्रियांना समाजात वरचा दर्जा होता, मात्र मध्ययुगात धार्मिक रूढी आणि कर्मकांड  वाढल्यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरत गेला असे त्यांनी प्रतिपादन केले. प्राचीन वाड्मयाचा सर्वांगीण अभ्यास करून  प्राचीन भारतात विविध राजकीय संस्थांसोबतच राजसत्तेचे विविध सिद्धांत देखील प्रचलित होते पुराव्यानिशी सिद्ध केले.

### ३.२.२.२ मध्ययुगीन भारत :

साम्राज्यवादी इतिहासलेखनातून प्रचलित झालेले मध्ययुगीन भारतातील मुस्लिम शासनाबाबतचे गैरसमज खोडून काढण्याचा प्रयत्न तसेच भारतीयांच्या दृष्टीकोनातून मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिणाऱ्या राष्ट्रवादी इतिहासकारांनी केला.

#### ३.२.२.२.१ डॉ. महंमद हबीब :

सुप्रतिष्ठित ऑक्सफोर्ड विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या महंमद हबीब यांनी अलिगढ विद्यापीठात प्राध्यापकाची नोकरी केली. मध्ययुगीन भारतातील मुस्लीम शासनाचे सखोल, वस्तुनिष्ठ आणि निधर्मी मांडणी करण्याचे श्रेय महंमद हबीब यांना जाते. महंमद गझनीच्या इतिहासाचे संशोधन करून त्याच्या स्वाऱ्या यामुलत: लुटमार आणि सत्तेकरिता झाल्या होत्या आणि त्यामागेधर्माचा आधार नव्हता, असे मत हबीब यांनी मांडले. हबीब यांनी दिल्लीच्या सुलतानशाही काळातील समाजाबद्दल संशोधन करून कामगार आणि शेतकरी जाचातून मुक्त झाल्याने त्याकाळी शहरी आणि ग्रामीण समाजात क्रांति घडून आली आणि त्यामुळेच मंगोल आक्रमणे परतवून लावणे दिल्लीच्या सुलतानांना शक्य झाले, असा सिद्धांत देखील हबीब यांनी मांडला. महंमद हबीब यांनी मध्ययुगीन भारताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आणि राष्ट्रवादाचा पुरस्कार केला हे त्यांचे मोलाचे योगदान होय.

#### ३.२.२.२.२ के. एम. अशरफ :

के. एम. अशरफ हे मध्ययुगीन भारताच्या विशेषत: सुलतानशाहीच्या इतिहासाचे अभ्यासक होते. Life and Conditions of the People of Hindustan (1200-1500 AD) हा त्यांचा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. सुलतान शाहीतील भारतीय समाजजीवनाचा निधर्मी वृत्तीने अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून अशरफ ख्याती पावले. मुस्लीम राज्यकर्ते आल्यामुळे भारतीयांच्या दैनंदिन जीवनात कोणताही मुलभूत बदलघडून आला नाही. हिंदू आणि मुसलमानांत संघर्ष झाला नसून सांस्कृतिक समन्वय साधला गेला, अशाप्रकारचे विवेचन अशरफयांनी केले आहे.मुस्लीम शासकांच्या काळात हिंदू-मुस्लीमसंघर्ष झाला. मुस्लीम राज्यकर्ते जुलमी/अत्याचारी होते, त्यांनी इस्लाम धर्म प्रजेवर लादण्याचा प्रयत्न केला, अशा इंग्रज

लेखकांच्या आरोपात तथ्य नाहीत व हे आरोप दिशाभूल करणारे आहेत, अशी राष्ट्रवादी भूमिका अशरफ यांनी घेतली.

### ३.२.२.२.३ सर जदुनाथ सरकार :

मध्ययुगीनभारताच्या इतिहासाचे वस्तुनिष्ठ आणि मूलगामी संशोधनाचे श्रेय सर जदुनाथ सरकार यांना दिले जाते. इंग्रजी भाषेसोबतच संस्कृत, फारसी, पोर्तुगीज, फ्रेंच आणि मराठी भाषेवर सरकार यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची विभिन्न भाषेतील ऐतिहासिक साधनांचे अध्ययन त्यांना करता आले. आपल्या विषयाशी संबंधित प्रदेशाचा प्रत्यक्ष दौरा करून तेथील भौगोलिक स्थितीचा अभ्यास जदुनाथसरकार करत असत. प्रदीर्घ संशोधन आणि मनन केल्यानंतर आपल्या ओघवत्या शैलीत ग्रंथ रूपाने मांडत. जदुनाथ सरकार यांनी History of Aurangzeb हा ग्रंथ पाच खंडात आणि Fall of the Mughal Empire हा चार खंडात लिहिला. हे दोन्ही ग्रंथ मध्ययुगीन भारताच्या इतिहास संशोधनात अत्यंत महत्वाचे मानले जातात. जदुनाथ सरकार यांनी Shivaji and His Times आणि House of Shivaji सारखे मराठा इतिहासासंबंधी ग्रंथ देखील लिहिले. जदुनाथ सरकारांनी आपली मते परखडपणे मांडल्यामुळे काही मंडळी नाराज झाली. मात्र, भारतीय दृष्टीकोनातून मध्ययुगीन भारताचे वस्तुनिष्ठ चित्रण करण्याचा प्रयत्न म्हणून जदुनाथ सरकार यांचे कार्य मोलाचे ठरते.

### ३.२.२.३ आधुनिक भारत :

आधुनिक भारतासंबंधी इतिहासलेखन करणाऱ्या राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटीश शासनाने भारताचे केलेले वसाहतवादी शोषण, भारतातील उद्योगांचा ऱ्हास, ग्रामीण भागात वाढणारी दैन्यावस्था , राष्ट्रीय भावनेचा उदय आणि विकास, भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील विविध प्रवाह इत्यादी विविध विषयांचे चिकित्सक विवेचन केले.

### ३.२.२.३.१ डॉ. रमेशचंद्र दत्त :

प्रशासकीय सेवेत अधिकारी असलेल्या रमेशचंद्र दत्त यांनी काही काळ लंडन विद्यापीठात प्राध्यापकी देखील केली. राष्ट्रवादी विचारांच्या रमेशचंद्र दत्त यांनी भारताच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासाकडे लक्ष देत Economic History of India हा ग्रंथ लिहिला. भारताचे ब्रिटीश शासक विभिन्न मार्गांनी भारताचे आर्थिक शोषण करत आहेत आणि त्यामुळे भारताचे आर्थिक दारिद्र्य वाढत आहे अशी मांडणी त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटची कागदपत्रे, शासकीय कागदपत्रे आणि अहवाल यांच्या आधारे केली. ब्रिटीशांनी भारताला इंग्लंडमधील कारखान्यांसाठीचा कच्चा माल उत्पादन करणारी वसाहत बनवले. त्याचप्रमाणे इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्यापक्क्या मालाची विक्री करण्यासाठीची हक्काची बाजारपेठ म्हणून

भारताकडे पाहिले. ब्रिटीशांच्या वसाहतीक धोरणाचे या दोन मूळ उद्देशांमुळे भारतातील कृषीव्यवस्थेवर आणि पारंपारिक उद्योगावर अत्यंत अनिष्ठ परिणाम झाले. ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतीयांचे होणारे शोषण त्यांनी उजागर केले. रमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक निस्सारणच्या सिद्धांताची पुष्टी केली. दत्त यांनी मांडलेला अनौद्योगीकीकारणचा सिद्धांत आज ही भारताच्या आर्थिक इतिहासात एक सशक्त सिद्धांत म्हणून ओळखला जातो. भारताच्या आर्थिक शोषणाची कारणमीमांसा आणि जाणीव करून देणाऱ्या रमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने भारताच्या राष्ट्रवादाला आर्थिक आधार दिला.

### ३.२.२.३.२ डॉ. ताराचंद (१८८८-१९७३) :

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर संशोधन करणाऱ्या दिग्गज इतिहासकारांत डॉ. ताराचंद यांची गणना केली जाते. डॉ. ताराचंद यांचा History of Indian Freedom Movement हा चार खंडातील ग्रंथ अत्यंत गाजला. या ग्रंथात ब्रिटीश सत्ता स्थापन होण्यापूर्वीची भारताची आर्थिक स्थिती, स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था, पारंपारिक उद्योग व व्यापार यांची माहिती देऊन ब्रिटीशांच्या सत्ता स्थापनेनंतर भारतीयांची दुर्दशा ताराचंद यांनी मांडली. भारतातील राष्ट्रीय प्रबोधन, परंपरांचे आणि अस्मितेचे पुनर्जीवन, राष्ट्रीय नेत्यांचे कार्य, विविध जन-आंदोलने यांच्यावर देखील ताराचंद यांनी प्रकाश टाकला. ब्रिटीशांची कुटनीति आणि फोडा आणि झोडा चे धोरण हे भारताच्या फाळणीस जबाबदार ठरले अशी त्यांनी मांडणी केली. स्वातंत्र्य चळवळीवरील ताराचंद यांची मांडणी ही राष्ट्रवादाने प्रेरित असल्याचे दिसून येते. डॉ. ताराचंद यांनी The influence of Islam on Indian Culture या त्यांच्या गाजलेल्या ग्रंथात भारतीय संस्कृती ही केवळ हिंदू संस्कृती नसून, हिंदू आणि इस्लामी संस्कृतीच्या समन्वयातून उत्क्रांत झालेली एक संपन्न संस्कृती आहे, अशी मांडणी पुराव्यांच्या आणि तर्कशुद्धतेच्या आधारावर केली. मूळ ऐतिहासिक साधनाचा चिकित्सकपणे अभ्यास करून तर्कशुद्ध मांडणी करणारा व्यासंगी राष्ट्रवादी इतिहासकार म्हणून डॉ. ताराचंद ओळखले जातात.

### ३.२.२.३.३ डॉ. रमेशचंद्र मुजुमदार (१८८४-१९८०) :

शास्त्रशुद्ध आणि चिकित्सक इतिहासलेखन पद्धतीचा वापर करून लेखन करणारे इतिहासकार म्हणून डॉ. रमेशचंद्र मुजुमदार सुप्रसिद्ध आहेत. अत्यंत सखोल आणि बहुआयामी संशोधन करून मुजुमदार यांनी प्राचीन भारतीय समाज संस्कृती, भारतीय संस्कृतीचा भारताबाहेरील विस्तार, ब्रिटीश सत्तेची स्थापना आणि विस्तार, भारतीयांची स्वतंत्रता चळवळ अशा विविध विषयांवर लेखन केले. डॉ. मुजुमदार यांनी Corporate Life in Ancient India, Outline of Ancient Indian History and Civilization, Ancient India Colonies in the Far East, The Sepoy Mutiny and the Revolt of 1857

Am{U History of the Freedom Movement इत्यादी शीर्षकांचे विविध ऐतिहासिक काळ आणि विषयांच्या संदर्भात संशोधनपूर्ण ग्रंथ लिहिले. भारतीय विद्या भवन या संस्थेद्वारे प्रकाशित The History and Culture of the Indian People या अकरा खंडीय संशोधन प्रकल्पाचे संपादनाचे काम मुजुमदार यांनी केले. डॉ. ताराचंद यांच्या प्रमाणेच मुजुमदार यांनी ब्रिटीशांच्या फोडा आणि झोडा च्या कुटनीतीची भूमिका असल्याचे मान्य केले मात्र त्याच वेळी हिंदू आणि मुसलमान यांच्यात सांस्कृतिक भेद असून त्यांच्या समन्वय झाला नाही अशी मांडणी केली. मुजुमदार यांनी भारताच्या स्वतंत्रता चळवळीत महात्मा गांधींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे कौतुक केले. मात्र, धर्म आणि राजकारण यांची गालात केल्याबद्दल गांधींना दोष देखील दिला. ऐतिहासिक वस्तुनिष्ठा जपत चिकित्सकपणे केल्या इतिहासलेखनातून देखील रमेशचंद्र मुजुमदार यांची राष्ट्रवादी भूमिका स्पष्ट दिसून येते.

### ३.२.२.४ राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे मूल्यमापन :

ब्रिटीश साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाचे विकृत चित्रण करून भारताच्या अस्मितेवर घाला घातला. साम्राज्यवादी इतिहासलेखनामुळे भारतीयांच्या मनात भारताच्या भूतकाळाबाबत न्युनगंड निर्माण झाला. राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेच्या इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाची पुनर्मांडणी करत भारतीयांना या न्युनगंडातून बाहेर काढण्याची महत्वपूर्ण भूमिका निभावली. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने भारतीयांच्या मनात आपल्या संस्कृतीच्या अभिमानाची आणि आत्मसन्मानाची भावना जागवली.

ब्रिटीशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण, त्यांचे फोडा आणि झोडाङ्कचे राजकारण इत्यादी बाबींची ऐतिहासिक मांडणी करून राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीयांच्या राष्ट्रवादी भावनेला वैचारिक आधार दिला. फक्त राजकीय इतिहासाचा अभ्यास न करता विविध अंगांनी भारतीय संस्कृती आणि समाज यांच्या विभिन्न पैलूंवर राष्ट्रवादी इतिहासकारांनी संशोधन केले. वि. का. राजवाडे यांच्या सारख्या काही इतिहासकारांनी ऐतिहासिक वस्तू, ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करण्यात आणि संपादित करण्यात आपले जीवन खर्च केले. या प्रयत्नांतून भारताच्या इतिहासाच्या अध्ययनासाठी आवश्यक ऐतिहासिक साधनांचा ठेवा तयार झाला.

साम्राज्यवादी इतिहासलेखकांच्या मांडणीचे खंडन करत असताना काही वेळा राष्ट्रवादी इतिहासकारांचे वस्तुनिष्ठतेचे भान सुटल्याचे आढळते. काही वेळा अतिरंजित, अतिशयोक्तीपूर्ण आणि अतार्किक विधाने त्यांनी केली. आत्यंतिक राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे यातील काही इतिहासलेखनाला प्रचारकी स्वरूप आले. मुसलीम शासकांच्या विरुद्ध लढणाऱ्या काही ऐतिहासिक व्यक्तींच्या कार्याचा गौरव करताना नकळत त्यांच्या लिखाणामध्ये जमातवाद डोकावू लागला. असे असले तरी राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासाच्या ज्ञानात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिल्याचे मान्य करावे लागते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) The Early History of Deccanhm ग्रंथ कोणी लिहिला ?

२) प्राचीन भारत हा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता हा समज कोणी खोडून काढला ?

३) महंमदगझनीच्या इतिहासावर कोणी संशोधन केले ?

४) Shivaji and His Times आणि House of Shivaji हे ग्रंथ कोणी लिहिले ?

५) भारतीय विद्या भवन या संस्थेद्वारे प्रकाशित The History and Culture of the Indian People या अकरा खंडीय संशोधन प्रकल्पाचे संपादन कोणी केले ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) मध्यमवर्गावरील पाश्चात्य वैचारिक प्रभावातून ................. ची भावना वाढीस लागली.

२) ................. तीलभारतीय समाजजीवनाचा निधर्मी वृत्तीने अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून अशरफ ख्याती पावले.

३) राष्ट्रवादी विचारांच्या ................. यांनी भारताच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासाकडे लक्ष देत Economic History of India हा ग्रंथ लिहिला

४) रमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने ........... यांच्या आर्थिक निस्सारणच्या सिद्धांताची पुष्टी केली.

५) साम्राज्यवादी इतिहास लेखकांच्या मांडणीचे खंडन करत असताना काही वेळा राष्ट्रवादी इतिहासकारांचे ................. चे भान सुटल्याचे आढळते.

### ३.२.३ मार्क्सवादी (Marxist) इतिहास लेखन परंपरा

२०व्या शतकात मार्क्सवादाने विभिन्न ज्ञानशाखांना प्रभावित केले आणि मार्क्सवादी दृष्टिकोनाचा विकास झाला. मानवी इतिहासातील बदलांच्या मुळाशी आर्थिक कारणे असून भौतिक अंतर्विरोधातून मानवी जीवनाचा विकास होत असतो, अशी मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादी मांडणी होती. भारतात मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करण्यास सुरुवात होऊन मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधाराने भारतीय इतिहासाचे आकलन करण्याची करण्याची परंपरा सुरु झाली. या परंपरेलाच भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा म्हणून ओळखले जाते. मार्क्सवादी इतिहास लेखनाचा आरंभ स्वातंत्र्यपूर्व काळात झाला असला तरी त्यावेळी हा प्रवाह तितकासा प्रभावी नव्हता. श्रीपाद अमृत डांगे यांचे From

Primitive communism to Slavery आणि रजनी पाम दत्त यांचा India Today हे सुरवातीच्या काळातील मार्क्सवादी इतिहास ग्रंथ म्हणून ओळखले जातात. मात्र, १९५० नंतरच्या काळात डी. डी. कोसांबी, डॉ. राम शरण शर्मा, डॉ. रोमिला थापर, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपीन चंद्र यांनी भरतील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेत मोलाची भर घालून आपल्या विद्वत्तेचा ठसा जागतिक पातळीवर उमटवला.

### ३.२.३.१ डॉ. दामोदर धर्मानंद कोसांबी :

गणित, संख्याशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, नाणकशास्त्र इत्यादी विविध शास्त्रांचा आणि संस्कृत आणि पाली भाषेचा अभ्यास असलेले डी. डी. कोसांबी हे विख्यात मार्क्सवादी इतिहासकार म्हणून ओळखले जातात. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या सुप्रसिद्ध संस्थेचे संचालक म्हणून पद भूषवलेल्या कोसांबी यांनी जवळपास शंभरहून अधिक संशोधकीय लेख प्रकाशित केले. त्यांचे Introduction to the study of Indian History आणि The Culture and Civilization of Ancient Indian Culture हे दोन ग्रंथ भारतीय इतिहासलेखनातील अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून ओळखले जातात.

डी. डी. कोसांबी यांनी इतिहासाला घटनांची कालबद्ध मांडणी किंवा थोरांचे चरित्र इतक्या स्वरूपाच्या पलीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केलाडी. डी. कोसांबी यांच्या मते, इतिहास म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांच्या परस्पर संबंधात झालेल्या परिवर्तनांचा अभ्यास होय. कार्ल मार्क्सच्या इतिहासविषयक प्रमेयाला जसेच्या तसे न स्वीकारता भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने त्यात बदल करून कोसांबी यांनी इतिहासाची मांडणी केली. मार्क्सच्या आशियायी उत्पादन पद्धतीनुसार भारतीय समाज मुख्यत: ग्रामव्यवस्था ही स्वयंपूर्ण असल्यामुळे स्थितीशील असल्याची मांडणी होती. डी. डी. कोसांबी यांनी याचे खंडन करत भारतातील ग्रामव्यवस्था स्वयंपूर्ण असली तरी ती गतिहीन, स्थितीशील, अपरिवर्तनीय नव्हती अशी मांडणी केली. कोसांबी यांनी मानववंशशास्त्र आणि पुरातत्वशास्त्र यांची सांगड घालून आपल्या संशोधनाचे सिद्धांकन केले. प्राचीन लिखित साधने आणि पुरातात्विक साधनाचा तौलिक अभ्यास करून, नाण्यांचा अभ्यास करून तत्कालीन समाज, संस्कृती आणि आर्थिक स्थितीवर भाष्य केले. बौद्ध धर्माचा ऱ्हास आणि गीतेचे तत्त्वज्ञान यांची भौतिकवादी मीमांसा कोसांबी यांनी केली. मिथकांचा अभ्यास करून प्राचीन काळाच्या इतिहासासाठी मिथकांचा उलगडा करण्याचे कार्य त्यांनी केले. डी. डी. कोसंबी यांनी अशा विभिन्न पद्धतींचा वापर करून केलेले मूलगामी संशोधन भारतीय इतिहासलेखनात पथदर्शक ठरले.

### ३.२.३.२ डॉ. राम शरण शर्मा :

इंग्लंडमध्ये उच्चशिक्षण प्राप्त करणारे आर. एस. शर्मा हे पुढे इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले. मार्क्सच्या भौतिकवादी सिद्धांताच्या आधारे प्राचीन भारतीय सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचे चिकित्सकपणे संशोधन करणारे इतिहासकार म्हणून शर्मा प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक ग्रंथ आणि संशोधन लेख प्रकाशित केले. आर. एस. शर्मा यांनी आपल्या Shudras in Ancient India ह्या ग्रंथात वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेच्या उगमाची आणि धर्मशास्त्रांनी त्यांना दिलेल्या अभिमान्यातेची भौतिकवादी कारणमीमांसा केली. वर्णव्यवस्थेच्या उगमापासून गुप्तकाळापर्यंत वर्णव्यवस्थेत आणि शूद्रांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थानात झालेल्या बदलांची मांडणी शर्मा यांनी केली. डॉ. राम शरण शर्मा यांनी Indian Feudalism या ग्रंथात भारतातील सामंतशाही व्यवस्थेच्या उदयाचे त्यांनी सिद्धांकन केले.भूदानाचे वाढते प्रमाण हे सरंजामशाही व्यवस्थेच्या वाढीचे ऐतिहासिक प्रमाण मानून गुप्तकाळातील नगरांच्या ऱ्हासाला त्यांनी या व्यवस्थेच्या उदयाचे कारण ठरविले. आपल्या Material Culture and Social Formation in Ancient India या ग्रंथात प्राचीन भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीमध्ये होणाऱ्या बदलांची भौतिकवादी दृष्टीकोनातून मीमांसा केली. राम शरण शर्मा यांच्या Urban Decay in India प्राचीन भारतातील नगरांच्या ऱ्हासाची आणि स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेच्या वाढीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून कारणमीमांसा करण्यात आली.प्राचीन भारताच्या इतिहासाच्या विविध साधनांचे भौतिकवादी दृष्टीकोनातून अर्थ लावून त्यातून भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाची उकल करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आर. एस. शर्मा यांनी केले.

### ३.२.३.३ डॉ. रोमिला थापर :

दिल्ली येथील प्रख्यात जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील इतिहासाच्या प्राध्यापिका म्हणून काम केलेल्या रोमिला थापर जगभर ख्याती प्राप्त इतिहासकार आहेत.त्यांचे कित्येक ग्रंथ आणि संशोधकीय लेख के आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रकाशकांकडून प्रसिद्ध होत असतात. Ashoka and the Decline of the Mauryas` या त्यांच्या लोकप्रिय ग्रंथातथापर यांनी मौर्य सम्राट अशोक याच्या शासनाची आणि धर्मविषयक धोरणाची भौतिकवादी दृष्टीकोनातून चिकित्सा केली. याच ग्रंथात मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासाची भौतिकवादी कारणमीमांसा त्या करतात. रोमिला थापर यांनी History of India, Ancient Indian Social History, From Lineage to State आणि Ideology and Interpretation of Early Indian History इत्यादी ग्रंथातून प्राचीन भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञान इत्यादी विविध पैलूंवर भौतिकवादी दृष्टीकोनातून मांडणी केली. भारतासंबंधीचे इतिहासलेखनाची चिकित्सा करत जनमानसात रुजलेले आर्यांच्या आक्रमणाचे अथवा आर्य वंशाचे सिद्धांत पुराव्यांच्या निकषावर खोडून काढतात. डॉ. रोमिला

थापर यांचे लेखन हे मार्क्सवादी विचारसरणी सोबतच त्यांच्या स्वतंत्र आणि सखोल संशोधनाचे, चिकित्सक विवेचनाचे दर्शन घडवते.

### ३.२.३.४ डॉ. इरफानहबीब :

अलिगढ विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केलेले इरफान हबीब हे मध्ययुगीन भारताचे प्रख्यात इतिहासकार आहेत.मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास हा त्यांचा मुख्य संशोधनाचा विषय आहे. हबीब यांचे अनेक ग्रंथ आणि संशोधकीय लेख प्रकाशित झाले असून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या संशोधनात ते मुलभूत मानले जातात. मुघल काळातील शेतीव्यवस्थेचा अभ्यास करणारा इरफान हबीब यांचा Agrarian System in Mughal India हा ग्रंथ महत्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांच्या कडून जास्तीतजास्त करांची वसुली करण्याच्या मुघल सत्तेच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढले. शेतकऱ्यांच्यात असंतोष निर्माण होऊन मोठ्या प्रमाणांत बंडाळी होऊ लागल्या. मुघलकाळातील कृषी व्यवस्थेतील संकट हे मुघल सत्तेच्या ऱ्हासाचे महत्त्वपूर्ण कारण ठरले. औरंगजेबच्या काळात झालेल्या उठावांच्या मागे धार्मिक अत्याचार हे कारण नसून आर्थिक शोषणामुळे निर्माण झालेला असंतोष हे प्रमुख कारण होते , अशी मांडणी हबीब यांनी केली. Interpreting Indian History या ग्रंथात हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या सामाजिक-आर्थिक इतिहासाचे विवेचन केले. मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था आणि समाजजीवन हे सरंजामी व्यवस्थेहून भिन्न असल्याचा निष्कर्ष त्यांनी मांडला. Caste and Money in Indian History या ग्रंथात जाती व्यवस्थेच्या उदयामागील आर्थिक कारणाचा उहापोह इरफान हबीब यांनी केला. Cambridge Economic History of India (1200-1750) या डॉ. तपन रायचौधरी यांच्या सोबत लिहिलेल्या ग्रंथात इरफान हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विभिन्न घटकांचे विस्तृत विवेचन केले आहे. The Atlas of Mughal Empire आणि Economic Map of India या ग्रंथांतून भौगोलिक माहिती सोबतच आर्थिक माहिती देणाऱ्या मध्ययुगीन भारताचे एकूण बत्तीस नकाशे इरफान हबीब यांनी प्रकाशित केले. मार्क्सवादाने दिलेली प्रमेये जशीच्या तशी न स्वीकारता भौतिकवादी दृष्टीकोनातून आणि द्वंद्वात्मक भौतिक विकासाचा सिद्धांताचा स्वतंत्र बुद्धीने वापर करून मानवी समाजाचा इतिहास समोर आणावा अशी मांडणी इरफान हबीब यांनी Problems of Marxist Historiography या ग्रंथात केली आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे जेष्ठ इतिहासकार म्हणून इरफान हबीब जगभर प्रसिद्ध आहेत.

### ३.२.३.५ डॉ. बिपीन चंद्र :

भारतीय राष्ट्रीय चळवळीचे मार्क्सवादी विश्लेषण करणारे महत्वपूर्ण आणि पथदर्शी इतिहासकार म्हणून डॉ. बिपिन चंद्र ओळखले जातात. केंब्रिजइतिहासलेखन परंपरेने प्रतिपादित केलेली भारतीय स्वातंत्र्यताचळवळीशी संबंधित प्रमेयांचे बिपिन चंद्र यांनी खंडन केले. भारतीय स्वतंत्रता चळवळ ही

जनसमान्यांची चळवळ होती, त्याला वैचारिक नेतृत्व सुशिक्षित मध्यमवर्गातील नेत्यांनी दिले असले तरी मुलभूत प्रश्न आणि संघर्ष हा जनसामान्यांचाच होता, असे प्रतिपादन बिपिन चंद्र यांनी India's Struggle for Independence या सुप्रसिद्ध ग्रंथात केली. The Rise and Growth of Economic Nationalism आणि Nationalism and Colonialism in India या ग्रंथांमध्ये भारतीय राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासाचे आर्थिक पैलू, वसाहतिक शासनाचे आर्थिक धोरण आणि भारतीय भांडवलदारांची स्वतंत्र्यता चळवळीतील भूमिका यांचे विश्लेषण बिपिन चंद्र यांनी केले. आपल्या सुप्रसिद्ध Communalism in India या ग्रंथात जमातवादाच्या उदयामागील कारणांचा चिकित्सक अभ्यास करून जमातवाद हा ब्रिटीश वसाहतवादाचे अपत्य असल्याची मांडणी त्यांनी केली. मार्क्सवादी दृष्टीकोनातून भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे जनआंदोलन म्हणून अधिक व्यापक स्वरूप उजागर करणारे इतिहासकार म्हणून बिपिन चंद्र ओळखले जातात.

### ३.२.३.६ मार्क्सवादीइतिहास लेखन परंपरेचे मूल्यमापन :

भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासलेखनाला नवी दिशा दिली. इतिहासाचा आवाका, मांडणीचे तंत्र, विश्लेषण पद्धती, तार्किक निष्कर्ष अशा अनेक बाबतीत मार्क्सवादी इतिहासलेखन महत्वपूर्ण ठरला. मार्क्सची इतिहासविषयक प्रमेये जशीच्या तशी न स्वीकारता स्वतंत्र बुद्धीने आणि भारतीय परिस्थितीचे सखोल आकलन करून मूळ प्रमेयांत बदल करून अथवा ती पूर्णत: नाकारून भारतीय मार्क्सवादी इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाची मांडणी केली. पूर्वीच्या इतिहासकारांमध्ये राजकीय इतिहासाचा प्रभाव जास्त होता. मात्र, मार्क्सवादी इतिहास करांनी आर्थिक इतिहासावर भर देत सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात देखील मोलाची भर टाकली. प्राचीन काळापासून आधुनिक काळाच्या इतिहासाचे द्वंद्वात्मक भौतिकवादी पद्धतीने नव्याप्रकारे विश्लेषण करण्याचे कार्य मार्क्सवादी इतिहासकारांनी पार पाडले. मार्क्सवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक संशोधनात भाषाशास्त्र, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी ज्ञानशाखांचा वापर करून आपल्या संशोधनास आंतरविद्याशाखीय स्वरूप दिले.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -३

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या परंपरेला भारतातील मार्क्सवादीइतिहासलेखन परंपरा म्हणून ओळखले जाते ?

२) Indian Feudalism या ग्रंथात भारतातील सामंतशाही व्यवस्थेच्या उदयाचे त्यांनी सिद्धांकन कोणी केले ?

३) मौर्य सम्राट अशोक याच्या शासनाची आणि धर्मविषयक धोरणाची भौतिकवादी दृष्टीकोनातून चिकित्सा कोणी केली ?

४) मुघल काळातील शेतीव्यवस्थेचा अभ्यास करणारा Agrarian System in Mughal India हा महत्वपूर्ण ग्रंथ कोणी लिहिला ?

५) Communalism in India या ग्रंथात जमातवादाच्याउदयामागील कारणांचा चिकित्सक अभ्यास कोणी केला ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ............... यांच्या मते, इतिहास म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांच्या परस्पर संबंधात झालेल्या परिवर्तनांचा अभ्यास होय.

२) राम शरण शर्मा यांच्या ......................... प्राचीन भारतातील नगरांच्या ऱ्हासाची आणि स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेच्या वाढीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून कारणमीमांसा करण्यात आली.

३) .................. विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केलेले इरफानहबीब हे मध्ययुगीन भारताचे प्रख्यात इतिहासकार आहेत.

४) केंब्रि इतिहास लेखन परंपरेने प्रतिपादित केलेली .................. संबंधित प्रमेयांचे बिपिन चंद्र यांनी खंडन केले.

५) प्राचीन काळापासून आधुनिक काळाच्या इतिहासाचे ........................ पद्धतीने नव्याप्रकारे विश्लेषण करण्याचे कार्य मार्क्सवादीइतिहासकारांनी पार पाडले.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**भारतविद्या** : प्राचीन भारताचा अभ्यास

**मार्क्सवाद** : कार्ल मार्क्स या जर्मन विचारवंताचेतत्वज्ञान

**अनौद्योगीकीकरण** : उद्योगांचा ऱ्हास होणे

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) विल्यम कॅरी

२) चार्ल्स विल्किन्स

३) जेम्स मिल

४) माऊंट स्ट्युअर्ट एलफिन्स्टन

५) अलाहबाद

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) हेन्री कोलब्रूक

२) अलेक्झांडर कनिंगहॅम

३) मॅक्स मुल्लर

४) एलफिन्स्टन

५) गॉर्डन जॉन्सन

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) डॉ. रामकृष्ण भांडारकर

२) डॉ. अनंत सदाशिव आळतेकर

३) डॉ. महंमदहबीब

४) सर जदुनाथ सरकार

५) डॉ. रमेशचंद्र मुजुमदार

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) राष्ट्रवादा

२) सुलतानशाही

३) रमेशचंद्र दत्त

४) दादाभाई नौरोजी

५) वस्तुनिष्ठते

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधाराने भारतीय इतिहासाचे आकलन करण्याची करण्याची परंपरा

२) डॉ. राम शरण शर्मा

३) डॉ. रोमिलाथापर

४) डॉ. इरफानहबीब

५) डॉ. बिपीन चंद्र

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) डी. डी. कोसांबी

२) Urban Decay in India'

३) अलिगढ

४) भारतीय स्वातंत्र्यता चळवळीशी

५) द्वंद्वात्मकभौतिकवादी

## ३.५ सारांश

भारतात आधुनिकपद्धतीने इतिहासलेखनाचीची सुरवात पाश्चात्य अभ्यासकांनी केली. भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर पौर्वात्यवादी,साम्राज्यवादी इत्यादी इतिहासलेखन परंपरा उदयाला आल्या. पौर्वात्य इतिहासलेखन परंपरा ही भारताबाबतच्या कुतूहलमिश्रित आकर्षणामुळे निर्माण झाली. ब्रिटीश सत्ता स्थिर झाल्यानंतर साम्राज्यवादी परंपरेला सुरवात झाली. साम्राज्यवादी परंपरेने भारतीयांच्या संदर्भात पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनातून लेखन करून भारतीयांना मागास ठरवले. भारतीयांना कनिष्ठ ठरवून ब्रिटीशांना श्रेष्ठ ठरवत भारतावरील ब्रिटीश सत्तेचे नैतिक समर्थन केले. विसाव्या शतकाच्या मध्यावर केंब्रिज संप्रदायाने भारतावरील ब्रिटीश सत्तेचे समर्थन करत भारतीय स्वतंत्रता चळवळीतील अंतर्विरोध पुढे आणण्याचा प्रयत्न केला.

भारतातील राष्ट्रवादाच्या उदया सोबत राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरेचा उदय झाला. साम्राज्यवादी इतिहास लेखनामुळे भारतीयांच्या मनात स्वत:च्या इतिहासासंबंधी निर्माण झालेला न्युनगंड काढून टाकण्याचे काम राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने केले. या प्रक्रियेत त्यांच्या कडून अतिशयोक्ती अथवा अतिरंजित पणा झाला असला तरी साम्राज्यवादी इतिहासकारांचे बऱ्यापैकी मांडणीचे त्यांनी सप्रमाण खंडन केले.

भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासाचे भौतिकवादी दृष्टीकोनातून आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला. राजकीय इतिहासाऐवजी आर्थिक इतिहासावर भर देऊन भारतीय इतिहासाचे सिद्धांकन करण्यावर मार्क्सवादी इतिहासकरांचा भर होता.

आधुनिक भारतातील  इतिहासलेखन परंपरेमध्ये इतिहासकरांच्या वैचारिक भूमिकांच्या अनुषंगाने विविध इतिहासलेखन परंपरांचा उदय झाल्याचे दिसून येते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

१) पौर्वात्यवादी इतिहास लेखनामधील इतिहासकारांचे भारतीय इतिहासातील योगदान स्पष्ट करा.

२) साम्राज्यवादी इतिहास लेखन परंपरेच्या भारताच्या इतिहासा विषयीच्या दृष्टीकोनाची चिकित्सा करा.

३) केंब्रिज इतिहास लेखन परंपरेचे माहिती देऊन मूल्यमापन करा.

४) राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरेचे योगदान स्पष्ट करा.

५) मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेच्या इतिहासाच्या मांडणीची चर्चा करा.

### (ब) टिपा लिहा.(लघुत्तरी प्रश्न)

१) विल्यम जोन्स

२) जेम्स मिल

३) डी.डी. कोसंबी

४) डॉ. इरफानहबीब

५) डॉ. रोमिलाथापर

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. E. Sreedharan, A Textbook of Historiography, 500 B.C. to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

२. B. Sheikh Ali, History : Its Theory and Method, Macmillan, 1978

३. प्रभाकर देव, इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेनटॉनिक प्रकाशन. नाशिक, २००७

४. शांताकोठेकर, इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

५. बी. एन. सरदेसाई,इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००२

६. जास्वंदी वांबूरकर, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१४

७. इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड-१, लोकवाङ्य गृह, २०१०


❋ ❋❋

# घटक ४

# भारतातील 'तळाकडून इतिहासा'ची परंपरा

## अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ तळाकडून इतिहास (History from Below) म्हणजे काय ?

४.२.२ अब्राम्हणी (Non- Brahmin) इतिहासलेखन

४.२.३ सबालटर्न (Subaltern) इतिहासलेखन किंवा शोषित-अंकितांचा इतिहास

४.२.४ स्त्रीवादी (Feminist) इतिहासलेखन

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- तळाकडून इतिहास ही संकल्पना स्पष्ट होईल.
- अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरेची माहिती होईल.

- सबालटर्न ही संकल्पना स्पष्ट होईल.
- सबालटर्न इतिहासलेखन प्रवाहाची माहिती होईल.
- स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरेचे ज्ञान होईल.

## ४.१ प्रास्ताविक

या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तीन घटकांच्या मध्ये आपण प्राचिन व मध्ययुगीन इतिहासलेखन परंपरा, आधुनिक युरोपीय आणि आधुनिक भारतीय इतिहास लेखन परंपरांचा अभ्यास केला. या तिन्ही घटकांमध्येचर्चित इतिहासलेखन परंपराया मुख्यत्वे करून राजेरजवाडे यांचेजीवनपट, संस्कृतींचा उदयास्त, राष्ट्रांच्याउदयाचा किंवा मोठ्याआर्थिक बदलांच्या अभ्यासावर भर देतात.या इतिहासलेखन परंपरांमध्ये सर्वसामान्य लोक व त्यांचे जीवन, सामाजिक उतरंडीच्या तळातील उपेक्षित घटक, मानवी समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रिया, दलित, आदिवासी अशा प्रकारच्या समाजाच्या तळाशी असलेल्या घटकांना उपरोक्त इतिहासलेखन परंपरांमध्ये स्थान दिल्याचे दिसून येत नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इतिहासाकडे तळाकडून पाहण्याचा दृष्टीकोन विकसित झाला. सर्वसामान्य लोक, कामगार, शेतकरी स्त्रिया, आदिवासी, दलित इत्यादींच्या इतिहासाचे लेखन सुरु झाले. भारतात तळाकडून इतिहासाच्या अब्राम्हणी इतिहासलेखन, सबालटर्न स्टडीजचे इतिहासलेखन आणि स्त्रीवादी इतिहास लेखन अशा तीन परंपरा आहेत. प्रस्तुत घटकामध्ये आपण या तीन परंपरांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ तळाकडून इतिहास (History from Below) म्हणजे काय ?

आधुनिक भारताच्या किंवा भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात १८५७ चा उठाव अत्यंत महत्वाचा मानला जातो. १८५७ चा उठाव हावसाहतीक इतिहासलेखन परंपरा आणिभारतीयराष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेमध्ये अत्यंत विस्ताराने अभ्यासला जातो. झाशीची राणी, तात्या टोपे, मुघल बादशाह बहादूर शाह जफर, नाना साहेब पेशवे यांच्या कर्तुत्वाची चर्चा मोठ्या प्रमाणात केलीजाते. मात्र त्याचवेळी १८५७च्याउठावातहजारोंच्यासंख्येने सहभागी झालेल्या सैनिकांपैकीमंगल पांडे, बख्तखान अशा मोजक्याच सैनिकांचाअत्यंत त्रोटक इतिहास दृष्टीस पडतो. १८५७ च्याउठावाच्यादरम्यान पुण्याहून गोडसे भटजी नावाचे एक भिक्षुकी करणारे इसम तत्कालीनउत्तर भारतात तीर्थयात्रेसगेलेआणिउठावाच्या रणधुमाळीत सापडले.

तीर्थयात्रेहून परत आल्यानंतर काही वर्षांनी गोडसे भटजींनी माझा प्रवास या नावाने १८५७ च्या उठावा दरम्यान त्यांना आलेल्या अनुभवांची हकीकत लिहिली. गोडसे भटजी हे झाशी येथे असताना झाशीच्या किल्याभोवती झालेल्या लढाईची आणि झाशीच्या किल्यात घुसल्यानंतर इंग्रज फौजेने तेथे केलेल्या अत्याचारांची इत्यंभूत माहिती माझा प्रवास या ग्रंथात मिळते. १८५७ च्या उठावातराजेराजवाडे, सेनापती यांच्या शौर्याची तसेच युद्धांची वर्णने आपणास राष्ट्रवादी इतिहासलेखनात आढळतात. मात्र, गोडसे भटजींनी वर्णन केलेल्या सामान्यस्त्री-पुरुषांनी१८५७ च्या उठावात सहन केलेल्या अत्याचारांचीआणि यातनांचीदखल राष्ट्रवादीइतिहासलेखन परंपरा घेत नाही.१८५७च्याउठावात भाग घेतलेले हजारोअज्ञातसैनिक, मारलेले गेले लाखो सामान्य स्त्री-पुरुष आणि या काळात हालपेष्टा, यातना, अत्याचारसहन करणारे कोट्यावधी लोक हे १८५७ च्या उठावाच्या इतिहासाचे भाग नव्हेत का? राजेरजवाडे, सेनापतीया समाजातील वरच्या थरातील लोकांना इतिहासात महत्त्वाचे स्थान मिळाले, मात्रसर्वसामान्य लोक आणि सैनिक हे समाजाच्या तळातील घटक असल्यामुळे त्यांच्याकडे इतिहासलेखन करताना दुर्लक्ष्य झाले अथवा केले गेले.त्याच पद्धतीने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात राष्ट्रीय सभा आणि सशस्त्र क्रांतिकारक गट यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महत्वाचे मानले जाते. मात्र, त्याचवेळी शेतकरी, कष्टकरी, दलित आणि आदिवासी यांनी विविध मुद्द्यांवर वसाहतिक शासनाशी केलेल्या संघर्षाला आधुनिक भारताच्या इतिहासात म्हणावे तेवढे स्थान मिळालेले नाही. अशाप्रकारे समाजाच्या तळाशी असणाऱ्या दुर्लक्षित घटकांच्या दृष्टीकोनातून केल्या जाणाऱ्या इतिहासलेखन परंपरेस तळाकडून इतिहासलेखन परंपरा असे म्हटले जाते. म्हणजेच तळाकडून इतिहास हे एकप्रकारचे इतिहासलेखन असून त्यात ऐतिहासिक घटनांच्या बद्दल लिहिताना इतिहास प्रसिद्ध व्यक्तींच्या तसेच अभिजन वर्गाच्या  ऐवजी सामान्य लोकांच्या बद्दल आणि त्यांच्या दृष्टीकोनातून लिहिला जातो. या इतिहासलेखन परंपरेमध्ये अधिकार विहीन लोक, कष्टकरी, शेतकरी, गरीब-दरिद्री लोक, असहमती दर्शवणारे  लोक आणि परिघाबाहेरचे समाज घटक यांच्या इतिहासावर भर दिलेला दिसून येतो.

**ल्युसिन फेबव्र** (१८७८-१९५६) या फ्रेंच नाल्स इतिहासलेखन परंपरेच्या सुप्रसिद्ध इतिहासकाराने पहिल्यांदा तळाकडून दिसणारा इतिहास अशा अर्थाचा शब्दप्रयोग केला.  फ्रेंच इतिहासकार आल्बर्ट मॅथेज यांच्या जनसामान्यांचा इतिहास लिहिण्याच्या उपक्रमावर  भाष्य करत असताना १९३२ साली ल्युसिन फेबव्र यांनी वरून नव्हे तर तळाकडून दिसणारा इतिहास अशी संकल्पना मांडली. पुढील काळात **ई. पी. थॉम्पसन** या ब्रिटीश मार्क्सवादी इतिहासकाराने लिहिलेला 'History from Below' या शीर्षकाचा लेख १९६६ मध्ये 'The Times Literary Supplement' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाला. इ.स. १९७० नंतर तळाकडून इतिहासाचा दृष्टीकोन इतिहासकारांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला. त्या अनुषंगाने युरोप आणि अमेरिकेत सामान्य नागरिक, कष्टकरी, कामगार यांच्या दृष्टीकोनातून इतिहास लिहिला जावू लागला.

अमेरिकन इतिहासकार **हॉवर्ड झिन** यांनी ‘A People's History of the United States’ हा ग्रंथ १९८० मध्ये लिहिला. ज्यामध्ये सर्वसामान्य अमेरिकन नागरिक, अमेरिकेतली आफ्रिकन वंशाचे गुलाम, अमेरिकेचे मुळचे रेड इंडियन्स, अमेरिकेतली कामगार, अमेरिकेतली स्त्रिया इत्यादी समाज घटकांच्या शोषणाचा आणि मोजक्या संख्येने असलेल्या उच्च वर्गाच्या जुलमी-शोषक सत्तेचा इतिहास हॉवर्ड झिन यांनी समोर आणला. आपल्या ग्रंथात इतिहासविषयक भूमिका मांडताना हॉवर्ड झिन असे म्हणतात की, जगातील कोणत्याही देशाचा इतिहास , जो एखाद्या घराण्याचा अथवा वंशाचा इतिहास म्हणून मांडला जातो, तो हितसंबंधांच्या तीव्र संघर्षाला लपवत असतो. हा संघर्ष जेता आणि जित, मालक आणि गुलाम, भांडवलदार आणि कामगार तसेच वंश आणि लिंगभावाच्या दृष्टीकोनातून वर्चस्व गाजवणारे (वर्चस्वी) आणि वर्चस्वाखाली राहणारे (अंकित) मानलेल्या घटकांमध्ये असतो. अशा संघर्षमय जगात, ज्यात बळी जाणारे आणि बळी घेणारे आहेत, त्यात विचारी लोकांचे कर्तव्य आहे कि त्यांनी बळी घेणाऱ्यांच्या बाजूने उभे राहू नये.म्हणजेच हॉवर्ड झिन सुचवतात की इतिहासकाराने इतिहासलेखन करताना शोषितांच्या दृष्टीकोनातून तसेच शोषितांच्या बाजूने इतिहासलेखन करावे.

या घटकाच्या आरंभीच नमूद केल्याप्रमाणे भारताच्या इतिहासलेखनामध्ये राजेराजवाडे, थोर व्यक्तींचे कर्तृत्व, संस्कृतींचा उदयास्त, राज्यांचा उदयास्त इत्यादी विषयांच्या इतिहासावर मोठ्याप्रमाणात भर दिल्याचे दिसून येते. समाजाच्या वरच्या वर्गातील घटकांचाच इतिहास यातून पुढे आल्याचे स्पष्ट आहे. त्याचीच प्रतिक्रिया म्हणून भारतामध्ये तळाकडून इतिहासाच्या परंपरा उदयास आल्या. युरोप व अमेरिकेत सामाजिक स्तर ठरताना वर्ग, वंश/रंग, लिंग या कोटी महत्त्वाच्या ठरत. त्यामुळे युरोप व अमेरिकेत तळाकडून इतिहासाच्या परंपरेत वर्गीय आणि वांशिक दृष्ट्या शोषित ठरलेल्या घटकांचा इतिहास लिहिला गेला. भारतीय समाजव्यवस्थेत जात, वर्ण, वर्ग आणि लिंगभावया कोटींच्या आधारे समाजातील उतरंडीची रचना आहे. त्यामुळे भारतातील ‘तळाकडून इतिहास’ परंपरेत त्यांना विशेष महत्त्व मिळाल्याचे दिसून येते. भारतातील ‘तळाकडून इतिहास’ परंपरेत ‘अब्राम्हणी इतिहासलेखन’ सबालटर्न स्टडीजचे इतिहासलेखन आणि स्त्रीवादी इतिहास लेखन असे तीन महत्त्वाचे प्रवाह आहेत. त्यांची विस्ताराने चर्चा आपण या घटकात करणार आहोत.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. फ्रेंच नाल्स इतिहासलेखन परंपरेच्या कोणत्यासु प्रसिद्ध इतिहासकाराने पहिल्यांदा तळाकडून दिसणारा इतिहास अशा अर्थाचा शब्दप्रयोग केला ?

२. ई. पी. थॉम्पसन या ब्रिटीश मार्क्सवादी इतिहासकाराचा कोणतालेख १९६६ मध्ये 'The Times Literary Supplement' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाला ?

३. 'A People's History of the United States' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

४. हॉवर्ड झिन यांनी कोणाच्या जुलमी-शोषक सत्तेचा इतिहास समोर आणला ?

५. भारतातील 'तळाकडून इतिहास' परंपरेतील परंपरेतील तीन महत्त्वाचे मानले जाणारे प्रवाह कोणते ?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. समाजाच्या तळाशी असणाऱ्या दुर्लक्षित घटकांच्या दृष्टीकोनातून केल्या जाणाऱ्या इतिहासलेखन परंपरेस ................ असे म्हटले जाते.

२. .................. या ब्रिटीश मार्क्सवादी इतिहासकाराने लिहिलेला 'History from Below' या शीर्षकाचा लेख लिहिला.

३. इ.स. ................... नंतर 'तळाकडून इतिहासा'चा दृष्टीकोन इतिहासकारांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला.

४. .....................समाजव्यवस्थेत जात, वर्ण, वर्ग आणि लिंगभाव या कोटींच्या आधारे समाजातील उतरंडीची रचना आहे.

५. युरोप व अमेरिकेत .................. इतिहासच्या परंपरेत वर्गीय आणि वांशिकदृष्ट्या शोषित ठरलेल्या घटकांचा इतिहास लिहिला गेला.

## ४.२.२. अब्राम्हणी (Non- Brahmin) इतिहासलेखन

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आधुनिक पद्धतीने इतिहासलेखन सुरु झाले.आरंभी इतिहास लिहिणारे ब्रिटीश प्रशासक आणि अभ्यासक होते. मात्र,१९व्या शतकाच्यामध्यापासूनराष्ट्रवादाने प्रभावित भारतीयांनी देखील इतिहासलेखनास सुरुवात केली.राष्ट्रवादी इतिहासकारांमध्ये परंपरागतरित्याशिक्षणाचा अधिकार असलेल्या ब्राम्हणआणि कायस्थ जातीतीलइतिहासकारांची संख्या मोठी होती. मात्र,यांच्या व्यतिरिक्त इतरजातींतीलव्यक्तींच्याद्वारे इतिहासलेखनास खूपच उशिरा सुरवात झाली. ब्राम्हण आणि तत्सम उच्चजातीय इतिहासकारांच्या लिखाणाततुलनेने खालच्या जातीतील समजलेल्या लोकांचा इतिहास नव्हता. शुद्र, अस्पृश्य अशा जातीतील लोकांच्या हलाखीच्या परिस्थितीची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न

उच्चजातीय इतिहासकारांनी केला नाही. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणिअस्पृश्यता यांच्या विरोधातील असंतोषामुळे अब्राम्हणवादी विचारसरणीचा उद्या झाला. अब्राम्हणी विचारसरणीने इतिहासाची अब्राम्हणी दृष्टीकोनातून चिकित्सा करून इतिहास लेखनास सुरवात केली, यालाच अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा म्हणून ओळखले जाते.

### ४.२.२.१ ब्राम्हणी आणि अब्राम्हणी इतिहासलेखन व त्यांची भूमिका

अब्राम्हणी इतिहासलेखन म्हणजे काय ? हे समजून घेण्याआधी ब्राम्हणी इतिहास लेखन म्हणजे काय ? हे समजून घेणे आवश्यक आहे. वर उल्लेख केल्या प्रमाणे भारतात पारंपारिकरित्या ज्ञानाची मक्तेदारी ब्राम्हण आणि तत्सम जातींकडे असल्यामुळे वासाहतिक सत्तेच्या आगमनानंतर आधुनिक शिक्षणात देखील तेच अग्रेसर राहिले. राष्ट्रवादाच्या वाढीसोबत राष्ट्रवादी इतिहासलेखन देखील सुरु झाले. यात उच्चजातीय इतिहासकारांचा भरणा अधिक होता. साम्राज्यवादी इतिहासलेखनाने भारताचा इतिहासाचे नकारात्मक प्रस्तुतीकरण करत असताना ब्रिटीशांना श्रेष्ठ आणि भारतीयांना कनिष्ठ दाखवण्याचा प्रयत्न केला. साम्राज्यवादी इतिहासलेखनाला प्रतिक्रिया म्हणून झालेल्या राष्ट्रवादी इतिहास लेखनात उच्च जातीय इतिहासकारांची संख्या अधिक होती. ब्राम्हणवादी विचारांनी प्रेरित इतिहासकारांनी खालील भूमिका घेऊन इतिहासाचे लेखन केले.

१. भारताच्या इतिहासाचे गौरवीकरण करण्यासाठी गौरवशाली घटनांचा आणि काळाचा शोध घेणे. मात्र, गौरवीकरणाआड येणाऱ्या घटनांकडेआणि काळाकडे दुर्लक्ष्य करणे अथवा औदासीन्य दाखवणे.

२. भारतीयइतिहासाच्या भौतिक आणि वैचारिक जडणघडणीस धार्मिक आणि वैचारिक अधिमान्यता प्राप्त करून देणे.

३. आर्य वंशाचे गौरविकरण करणे. आर्य विरुद्ध अनार्यअशा संघर्षाची मांडणी करून श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व आणि गुणकर्म यांच्या आधारे समाजरचना झाल्याचे मानणे.

४. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचे आडमार्गाने समर्थन करणे अथवा त्यांच्या विरोधात तीव्र भूमिका न घेणे.

५. पितृसत्ताक मुल्ये, पुरुषप्रधान संस्कृतीआणि वंशश्रेष्ठत्वाचे गौरवीकरण करणे.

६. वैदिक आणि ब्राम्हणी संस्कृतीचे गौरवीकरण करणे.

७. पुराणातील आणि इतिहासातील उच्चजातीय नायक-नायिकांचे गौरवीकरण करणे. त्यांच्या संबधी मिथके रचणे, अवताराच्या आणि युगाच्या संकल्पना मानने.

८. शुद्र, अस्पृश्यआणि स्त्रिया यांच्या बद्दल लिखाण न करणे अथवा अनुल्लेखाने मारणे.

९. मुसलमानांविषयी द्वेषपूर्ण लिखाण करणे.

१०. भारताच्या अवनीतीला मुसलमान आणि ब्रिटीश यांना जबाबदार धरणे.

अशा प्रकारची साधारण चौकाट घेऊन उच्चजातीय ब्राम्हणवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासलेखनाला पर्याय उभा केला. पण प्राचिन भारतातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रियांचा दुय्यमपणा अशा विषमताधिष्ठित समाजरचनेचा, आर्थिक विषमतेचा तपशील दडविण्याचा प्रयत्न ब्राम्हणवादी इतिहासकारांनी केला. ब्रिटीशविरोध आणि ब्राम्हणी धर्माचे पुनरुज्जीवन हे ब्राम्हणी राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे उद्दिष्ट होते. ब्राम्हणवादी इतिहास लेखकांचा प्रयत्न अस्मिता निर्मितीचा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर, वि. का. राजवाडेइत्यादी इतिहासकारांचे इतिहासलेखन हे ब्राम्हणी इतिहासलेखन मानले जाते.

मानवी समाजात जसा 'आहे रे' आणि 'नाही रे' अशा दोन वर्गात संघर्ष आहे, तसाच भारतात ब्राम्हणी आणि अब्राम्हणी असा संघर्ष आहे. भारतात जाती-वर्णव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या वर्चस्वामुळे उच्चजातीय पुरुषांना श्रेष्ठत्व प्राप्त होते आणि खालच्या जातीतील पुरुष आणि स्त्रिया यांना दुय्यम स्थान प्राप्त होते. म्हणजे जाती-वर्णव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्यामुळे श्रेष्ठत्व उपभोगणारा ब्राम्हणी गट आणि यामुळे ब्राम्हणी धारणांना विरोध करणारे शोषित-अंकित जनवादी अब्राम्हणी गटअसे दोन गट भारताच्या इतिहासात दिसून येतात. जातीवर्ग स्त्री दास्यांतांचा विचार विचार करणारा, त्यासाठी संघर्ष करणारा आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती करणारा अब्राम्हणी प्रवाह भारतीय इतिहासात विद्यमान राहिल्याचे शरद पाटील यांचे मत आहे.

'अब्राम्हणी स्त्रीवादाच्या दिशेने' या ग्रंथात विद्युत भागवत आणि प्रतिमा परदेशी यांनी अब्राम्हणी दृष्टीकोनातून स्त्रीवादी इतिहासाची मांडणीचे नवे अवकाश स्पष्ट केले.प्रतिमा परदेशी यांच्या मते, ब्राम्हणी म्हणजेवर्ण-वर्ग-जाती-स्त्रीदास्ययांचे समर्थन करणारी शक्ती होय. तर, अब्राम्हणी म्हणजे वर्ण-वर्ग-जाती-स्त्रीदास्य यांचा अंत करण्यास प्रयत्नशील असलेली शक्ती होय. एखादी व्यक्ती जन्मत:च ब्राम्हणी किंवा अब्राम्हणी ठरू शकत नाही. जन्माने, जातीने ब्राह्मणेतर असलेली व्यक्ती, वृत्तीने अब्राम्हणी असेलच असे नाही. ती ब्राम्हणी देखील असू शकते.सर्व ब्राम्हण प्रतिगामी किंवा विषमतावादी विचारांचे असतात असे नाही. त्यातील समताधिष्ठीत समाजाचे स्वप्न पाहणारे, त्यासाठी परिवर्तनाच्या लढ्यात सक्रीय सहभाग किंवा परिवर्तनासाठी वैचारिक योगदान देणारे लोक हे अब्राम्हणीच ठरतात अशी मांडणी प्रतिमा परदेशी यांनी केली.

### ४.२.२.२ अब्राम्हणी इतिहास लेखनाचे स्वरूप :

अब्राम्हणी इतिहास लेखनाची सुरवात **महात्मा जोतीबा फुले** यांच्या पासून झाली असे मानले जाते. महात्मा फुले यांनी सन १८७३ मध्ये लिहिलेल्या गुलामगिरी या ग्रंथात इतिहास विषयक मांडणी केली आहे. महात्मा फुले यांच्या मते, भारताचा इतिहास हा आर्य-अनार्य यांच्या संघर्षाचा आणि ब्राह्मण्य वर्चस्व प्राप्तीचा आहे. बाहेरून आलेल्या आर्यांनी इथल्या मुळच्या लोकांना पराभूत करून त्यांच्यावर असमानता असलेली जातीव्यवस्था थोपविली. आर्यांनी नंतरच्या काळात वर्णव्यवसस्था ईश्वर निर्मित असल्याची मांडणी करून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांच्या उत्पत्तीची कथा रचली. आर्यांकडून पराभूत झालेल्या इथल्या मुळच्या लोकांना शुद्र ठरवून त्यांच्यापिढ्यानपिढ्या होणाऱ्या शोषणाची व्यवस्थाकेली. महात्मा फुलेंनी बळीराजा, म्हसोबा, खंडोबा, बिरोबा, ज्योतिबा इत्यादी लोकदेवतांच्या मिथकांचा अर्थ लावला. भारतातआर्यांच्या आक्रमणापुर्वी शेतकऱ्यांचा राजा असलेल्या बळीचे राज्य होते आणि भारताला बळीस्थान म्हणून ओळखले जायचे अशी मांडणी महात्मा फुले यांनी केली. महात्मा फुले यांनी इतिहासाचा अशाप्रकारे लावलेला अन्वयार्थ हा अब्राम्हणी परंपरेचा भाग मानला जातो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी आपल्या विविध ग्रंथातून आणि लेखांतून इतिहासाविषयी भाष्य केले आहे. जातीवर्णव्यवस्थेच्या इतिहासावर भाष्य करणारा शुद्र कोण होते ? हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी १९४६ साली लिहिला.डॉ. आंबेडकरांनी वर्ण आणि जातीच्या उगमाचा शोध घेऊन त्याची रचना कशी आहे यावर भाष्य केले. जातीचे विध्वंसन कसे करावे याची देखील मांडणी आंबेडकर यांच्या लिखाणात दिसून येते. जाती अंतर्गतच होणारे विवाह आणि जातीबाह्य विवाहांवर बंदी हे जातीव्यवस्था टिकण्याचे मुख्य कारण आहे, अशीमांडणी डॉ. आंबेडकर यांनी केली. जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांचा एकत्रित विचार करून स्त्रियांवर घातलेल्या बंधनांचा उलघडा डॉ. आंबेडकर यांनी केला.

महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राम्हण-अब्राम्हण यांच्यात मोठ्याप्रमाणात राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वाद झाला. याच्या परिणामी मराठा इतिहासलेखनात देखील ब्राम्हण-अब्राम्हणवादाचे पडसाद उमटले.१९ व्याशतकाच्या उत्तरार्धानंतर मराठा इतिहासासंदर्भात मोठ्या प्रमाणात इतिहास लेखन झाले. सुरवातीला इतिहासलेखन करणाऱ्यांमध्ये ब्राम्हण जातीच्या इतिहासकारांचा भरणा होता. शिवाजी महाराजांच्या संदर्भात इतिहासलेखन करताना शिवाजी महाराजांना गोब्राम्हणप्रतिपालक ठरवून जुलमी मुसलमानाच्या विरोधात लढणारे हिंदूंचे संरक्षक ठरविले. शिवाजी महाराजांच्या यशाचे श्रेय त्यांचे गुरु-मार्गदर्शक-सल्लागार म्हणून रामदास आणि दादोजी कोंडदेव यांना देणारी मांडणी बहुतांश ब्राम्हण जातीच्या इतिहासकारांनी केली. अशाप्रकारची मांडणी सनातनी ब्राम्हण इतिहासकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकर, वि. का. राजवाडे, भास्कर वामन भट आणि शंकर श्रीकृष्ण देव यांनी केली.तसेच

उदारवादी ब्राम्हण इतिहासकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महादेव गोविंद रानडे आणि द. बा. पारसनीस यांनी देखील रामदास यांना शिवाजी महाराजांचे गुरु मानले.

शिवाजी महाराजांच्या संदर्भातील या ब्राम्हणी इतिहासलेखनापासून भिन्न असा अब्राम्हणी दृष्टीकोन असलेल्या महात्मा फुलेयांनी शिवाजी महाराजांना कुळवाडीभूषण म्हणजेच शेतकऱ्यांचा राजा असे संबोधले. **कृष्णराव अर्जुनराव केळुस्कर** यांनी सर्वप्रथमशिवाजी महाराजांचे चरित्र लिहून शिवाजी महाराजांचे गुरु रामदास व दादोजी कोंडदेव होतेहा दावा फेटाळून लावला. मराठ्यांच्याक्षत्रियत्वाला घेऊन झालेल्या वादामध्ये अब्राम्हणी दृष्टीकोन असलेल्या **राजारामशास्त्री भागवत, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** आणि **केशवराव सीताराम ठाकरे** यांनी वि. का. राजवाडे यांच्याशी वैचारिक वाद घातला.

**शरद पाटील** यांनी अब्राम्हणी दृष्टीकोनातून भारताच्या इतिहासाची मांडणीकरणारेअनेक ग्रंथ लिहिले. शरद पाटील यांचे दास - शुद्रांची गुलामगिरी, रामायण-महाभारतातील वर्ण संघर्ष, जातीव्यवस्थाक सामंती सेवकतत्त्व, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण? इत्यादी ग्रंथ महत्त्वाचे मानले जातात. प्राचिन भारताच्या इतिहास संशोधनातून टोळ्या, गण, वर्ण समूह यांचे आणि त्या सोबतच पितृसत्ताक जातिव्यवस्थेचे अस्तित्व सिद्ध झाले आहे. प्राचिन वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृति-श्रुती इत्यादी साहित्यात, भारतात येऊन गेलेल्या परकीयप्रवाशांच्या वृत्तांत आणि भारतीय-परदेशी इतिहासकारांच्या लिखाणात पितृसत्ताक जातीसंस्थेचा सारखा उल्लेख येतो. मात्र,  शरद पाटील यांनी भारतात पितृसत्ताक जातीसंस्था उदयास येण्यापूर्वी मातृसत्ताक-स्त्रीसत्ताकगण-टोळ्या होत्या अशी मांडणी केली.वेदांमध्ये उल्लेखित आणि वैदिक परंपरामध्ये अशुभ मानली जाणारी हरिती ही स्त्रीसत्ताक गणाची प्रमुख होती, असाशोध शरद पाटील यांनी लावला. मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक गणसमाजांना, टोळ्यांना पराभूत करून पुरुषप्रधानता असलेल्या पितृसत्ताकजाती समाजाची निर्मिती झाली. शरद पाटील यांच्या मते मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक ते पितृसत्ताकजाती व्यवस्था असे  स्थित्यंतर आर्यांच्या आक्रमणास सुरु होते आणि बुद्धकाळानंतर पूर्ण होते.प्राचिन काळाच्या अंतसमयी समंतीव्यवस्था उदयास आली आणि मध्ययुगातील मुस्लीम सत्ताधीशांच्या काळात देखील कायम राहिली. ब्रिटीशांची सत्ता आल्यानंतर बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे भारतात वर्ग बनण्याची प्रक्रिया सुरु झाली आणि भारतातपुरुषसत्ताक-जातिवर्ग तयार झाला. हा पुरुषसत्ताक-जातिवर्ग भारतातील कष्टकरी आणि कनिष्ठ जातीच्या पुरुषांवर आणि स्त्रियांवर वर्चस्व गाजवतो आणि त्यांचे शोषण करतो अशी मांडणी शरद पाटील यांनी केली.

१९८० नंतर **आ. ह. साळुंखे, उमा चक्रवर्ती, शर्मिला रेगे, विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, दिलीप चव्हाण, उमेश बगाडे, रणजित परदेशी, नारायण भोसले, देवेंद्र इंगळे,** इत्यादींनी ब्राम्हणी-अब्राम्हणी संकल्पनेच्या आधारे इतिहासलेखन आणि इतिहासमीमांसा केली आहे. ब्राम्हणी आणि अब्राम्हणी

या संकल्पना जातीवाचक नसून वृत्तीवाचक आणि सामाजशास्त्रीय आहेत. जातवर्गस्त्रीदास्यातांची भूमिका घेऊन अब्राम्हणी प्रवाहाने सर्व ज्ञानशाखांच्या, संज्ञा आणि संकल्पनाच्या कक्षा इतिहासक्रमास कशा लागू होतात याचा शोधघेतला.

### ४.२.२.३ अब्राम्हणी इतिहासलेखनाचीलक्षणे

अब्राम्हणीदृष्टीकोनातून इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारांच्या लिखाणात सर्वसाधारणपणेकाही समान लक्षणे आणि वैशिष्ट्ये आढळतात. ही लक्षणे आणि वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. जातीव्यवस्था ही शोषण करणारी व्यवस्था आहे याचे भान ठेवणे.

२. स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि शूद्रातिशूद्र यांचे दुय्यम स्थान यांना विलगपणे ना पाहता त्यांच्या परस्पर संबंधांचे भान ठेवणे आणि त्यामागील पितृसत्ताक जातीसंस्थेच्या भूमिकेची चिकित्सा करणे.

३. स्वातंत्र्य,समता आणि मानवता नाकारणाऱ्या अथवा स्वीकारणाऱ्या रूढी-परंपरा यांचा शोध घेणे.

४. स्त्रीशूद्रातिशूद्रांचा आणि ब्राम्हणांचा जातिव्यवस्थेशी असलेला संबंध स्पष्ट करणे.

५. इतिहासाची मांडणी करताना मिथकांचा आणि दंतकथांचा अब्राम्हणी दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावणे.

६. मिथकेआणि प्रतिकांचा नवाअन्वयार्थ लावून भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्ष विशद करणे.

### ४.२.२.४ अब्राम्हणी इतिहास परंपरेचे मूल्यमापन

मुख्यप्रवाही इतिहासलेखानामध्ये जातीव्यवस्थेचा अभ्यास हा एक व्यवस्था म्हणून होत असला तरी त्यामागील वैचारिक शक्तींचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नव्हते. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने जातिव्यवस्थेच्या शोषणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न केला. मार्क्सवादी इतिहासलेखनाने जातिव्यवस्थेच्या सखोल विश्लेषणाचा प्रयत्न केला नाही. मुख्यप्रवाही इतिहासलेखन परंपरेच्या या भूमिकांमुळे अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा उदयास आली.महाराष्ट्रातील ब्राम्हण-ब्राम्हणेतरवादाच्या पृष्ठभूमीवर मराठा इतिहासामध्ये अब्राम्हणी दृष्टीकोनातून लिखाण केले जाऊ लागले. जातिव्यवस्थेचा उगम, मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक ते पितृसत्ताक जातीसंस्थाअसे स्थित्यंतर, स्त्रिया, शुद्र, अतिशूद्र, अस्पृश्य यांच्या दयनीय स्थितीची आणि शोषणाची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरेने केला.

पितृसत्ताक जातिवर्ग समाजातील शोषक घटकांच्या ऐवजी दुय्यम स्थान दिलेल्या आणि शोषित घटकांच्या म्हणजे स्त्री शूद्रातिशूद्रांच्या दृष्टीकोनातून म्हणजेच तळाकडून इतिहास मांडण्याचा प्रयत्न अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरेने केला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शिवाजी महाराजांना कुळवाडीभूषण असे कोणी संबोधले? महात्माजोतीबा फुले

२. सर्वप्रथमशिवाजी महाराजांचे चरित्र लिहून शिवाजी महाराजांचे गुरु रामदास व दादोजी कोंडदेव होतेहा दावा कोणी फेटाळून लावला ?कृष्णराव अर्जुनराव केळुस्कर

३. जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांचा एकत्रित विचार करून स्त्रियांवर घातलेल्या बंधनांचा उलघडा कोणी केला?डॉ. बाबासाहेबआंबेडकर

४. दास - शुद्रांची गुलामगिरी हा ग्रंथ कोणी लिहिला?शरद पाटील

५. अब्राम्हणी स्त्रीवादाच्या दिशेने हाग्रंथ कोणी लिहिला ?विद्युत भागवत आणि प्रतिमा परदेशी

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. .................. यांनीसन १८७३ मध्येलिहिलेल्यागुलामगिरी या ग्रंथात इतिहासविषयक मांडणी केली आहे.महात्मा फुले

२. जातीवर्णव्यवस्थेच्या इतिहासावर भाष्य करणारा शुद्र कोण होते ? हाग्रंथ ............... यांनी लिहिला.डॉ. बाबासाहेबआंबेडकर

३. .................ही स्त्रीसत्ताक गणाची प्रमुख होती, असाशोध शरद पाटील यांनी लावला.हरिती

४. भारतातील ................ हा कष्टकरी आणि कनिष्ठ जातीच्या पुरुषांवर आणि स्त्रियांवर वर्चस्व गाजवतो आणि त्यांचे शोषण करतो अशी मांडणी शरद पाटील यांनी केली. पुरुषसत्ताक-जातिवर्ग

५. महाराष्ट्रातील ........................... वादाच्यापृष्ठभूमीवर मराठा इतिहासामध्ये अब्राम्हणीदृष्टीकोनातून लिखाण केले जाऊ लागले.ब्राम्हण-ब्राम्हणेतर.

### ४.२.३ सबालटर्न (Subaltern) इतिहासलेखन किंवा शोषित-अंकितांचा इतिहास

इ.स.१९८०च्या दशकात उदयालाआलेल्यासबालटर्न स्टडीज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील संशोधक-अभ्यासकांच्या समूहाने भारतीय इतिहासलेखनावर प्रचंड प्रभाव टाकला. त्यांनी वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी तत्कालीन इतिहासलेखनात प्रस्थापित परंपरांची चिकित्सा केली. या इतिहासलेखन परंपरांमधील अभिजन प्रवृत्ती आणि दृष्टीकोन प्रकाशात आणून सबालटर्न स्टडीज च्या इतिहासकारांनी त्यावर टीका केली. अभिजनकेंद्रित इतिहासलेखनाऐवजी समाजतळातून इतिहासलेखन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सबालटर्न स्टडीजच्या इतिहासकारांनी केले. त्यामुळे भारतीय इतिहासलेखन परंपरांचा आणि मुख्यत: तळाकडून इतिहासाचा आढावा घेत असताना सबालटर्न स्टडीजच्या इतिहासलेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

#### ४.२.३.१ सबालटर्न म्हणजे कोण ?

सबालटर्न स्टडीजचे प्रवर्तक म्हणून रणजीत गुहा यांना ओळखले जाते. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध सुसेक्स विद्यापीठात प्रपाठक असणार्या रणजीत गुहा यांनी याच विद्यापीठात सबालटर्न स्टडीज ग्रुपची स्थापना केली. रणजीत गुहा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या लेखनामुळे सबालटर्न स्टडीज चा प्रसार होऊन भारताच्या इतिहासलेखनातील महत्त्वाचा प्रवाह म्हणून प्रस्थापित झाला. सबालटर्न स्टडीज च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत रणजीत गुहा यांनी सबालटर्न स्टडीजची भूमिका मांडली. त्यात त्यांनी सबालटर्न म्हणजे कोण ?, सबालटर्न ही संकल्पना काय आहे ? याची चर्चा केली आहे. रणजीत गुहा आणि त्यांच्या सबालटर्न स्टडीजच्या सहकाऱ्यांनी सबालटर्न ही संकल्पना इटलीतील कृतीशील मार्क्सवादी विचारवंत अंतोनियो ग्रामची (१८९१-१९३१) यांच्या कडून घेतली. इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचा संस्थापक सदस्य आणि नेता असलेल्या अंतोनियो ग्रामचीला इटलीच्या हुकुमशाह बेनिटो मुसोलिनी याच्या फॅसिस्ट सरकारने २० वर्षांसाठी तुरुंगवासाची शिक्षा दिली. इ.स. १९२६ पासून जवळपास अकरा वर्षे तुरुंगवास भोगून ग्रामची १९३७ मध्ये तुरुंगातच मरण पावला. या अकरा वर्षाच्या कारावासाच्या काळात ग्रामचीने इतिहास आणि राजकीय सिद्धांकानांवर तीस वह्यांमध्ये जवळपास ३००० पानांमध्ये लेखन केले. ग्रामचीच्या मृत्युनंतर १९५०च्या आसपास ग्रामचीचे लेखन 'Prison Notebooks' म्हणून प्रकाशित झाले आणि १९७० नंतर त्याचे इंग्रजी भाषांतर झाले. अंतोनियोग्रामचीचे 'Prison Notebooks' (प्रिझन नोटबुक्स म्हणजे कारागृहातील वह्या) हे विसाव्या शतकातील मुलभूत लेखन मानले जाते. या लेखनातच ग्रामचीने सबालटर्न ही संकल्पना वापरली होती. सबालटर्नचा शब्दश: अर्थ लष्करी अधिकाऱ्यांतील तळाचा, दुय्यम अथवा निम्नस्तरीय अधिकारी असा आहे. मात्र, अंतोनियो ग्रामचीने आपल्या विश्लेषणात याचा वेगळ्या अर्थाने

उपयोग केला. ग्रामचीने सबालटर्न ही संकल्पना 'Non Hemogenic' गटांना किंवा वर्गांना लागू केली. 'Non Hemogenic' म्हणजे ज्यांना कोणत्याही पद्धतीचे नेतृत्व अथवा धुरीणत्व अथवा अधिकार नसलेले सत्ताविहीन गट किंवा वर्ग होय. त्याच प्रमाणे सबालटर्न ही संकल्पना ही 'Subordinated' गटांना किंवा वर्गांसाठी देखील ग्रामचीने वापरली. 'Subordinated' म्हणजे वर्गभान नसलेले शोषित तसेच अंकित समूह होय. वर्गभान नसलेल्या म्हणजे जे लोक शोषित आहेत, ज्यांना दुसऱ्यांच्या वर्चस्वात राहावे लागते आणि ह्या वर्चस्वात राहून देखील आपण अशा पद्धतीने शोषित आहोत / आपले शोषण होतंय / आपल्याला अंकित ठेवले गेले आहे / आपल्याला दुसऱ्याच्या वर्चस्वात राहावे लागते अशी जाणीव नसलेल्या लोकांना 'Subordinated' म्हणजे शोषित अंकित जन म्हटले जाते.अंतोनियो ग्रामचीने 'Non Hemogenic' म्हणजे धुरीणत्व नसलेल्या आणि 'Subordinated' म्हणजे शोषित अंकित जन यांचासबालटर्न याअर्थाने उल्लेख केला. अर्थात अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी सबालटर्न ही संकल्पना वापरली.

### ४.२.३.२ भारतात सबालटर्न कोणास म्हणावे ?

सबालटर्न ही संकल्पना भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी उपयोगी ठरेल या विचारातून रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीसबालटर्न स्टडीज या इतिहासप्रकल्पाच्या माध्यमातूनत्याचा स्वीकार केला आणि त्या अनुषंगाने भारतीय स्वरूपात त्याचा अवलंब केला. रणजीत गुहा यांनी सबालटर्न स्टडीज च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत भारताच्या संदर्भात सबालटर्न कोणास म्हणावे याचा उहापोह केला. भारताच्या संदर्भात सबालटर्न म्हणजे कोण ? हे ठरवत असताना, त्याची व्याख्या करत असताना अभिजन म्हणजे कोण ? हे देखील स्पष्ट करणे आवश्यक होते. म्हणजेच भारतातील धुरीणत्व असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटक कोणते ते स्पष्ट होणे गरजेचे होते. रणजीत गुहा यांनी भारतातील धुरीणत्व असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटकांमध्ये परदेशी आणि भारतीय वर्गसमूहांचा समावेश केला. परदेशी वर्चस्वी गटामध्ये त्यांनी परदेशी भांडवलदार, गुंतवणूकदार, चहा-कॉफी इत्यादींचे मळेवाले, जमीनदार, मिशनरी इत्यादींचा समावेश केला. रणजीत गुहा यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या वर्चस्वी गटामध्ये भारतातील शक्तिशाली सामंतवर्ग, औद्योगिक व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी प्रशासकीय रचनेच्या शिरोभागातील नोकरशाहांचा वर्ग इत्यादींचा समावेश केला. अखिल भारतीय वर्चस्वी गटाला प्रादेशिक व स्थानिक पातळीवरच्या अंकितांचे काही गट देखील सहाय्यभूत ठरत असत. त्यांचाही समावेश वर्चस्वी / अभिजन गटात करण्यात आला. मात्र, यातील प्रादेशिक अथवा स्थानिक पातळीवरील काही घटक अभिजन आणि अंकित अशा दोन्ही प्रकारचे वर्तन करताना दिसतात. या स्थानिक व प्रादेशिक पातळीवरील घटकांमध्ये गावातले वतनदार, दरिद्री जमीनदार, श्रीमंत व मध्यम शेतकरी यांचा समावेश होतो. भारताच्या

संदर्भात अभिजन अथवा वर्चस्वी वर्ग कोणते हे ठरवल्यानंतर भारतातील सबालटर्न म्हणजे धुरीणत्व नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट कोणते हे ठरवले गेले. भारतातील शेतकरी, आदिवासी, निम्नजाती, दलित, आणि स्त्रिया यांना सबालटर्न मानण्यात आले. भारतातील राजकीय व्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, पितृसत्ता, पुरुषप्रधान व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांच्यामुळे उल्लेखित समाजघटक हे अभिजनांचे शोषित-अंकित बनून राहतात.

### ४.२.३.२ सबालटर्न स्टडीजचे खंड आणि त्यांची भूमिका

भारतीय इतिहासलेखन परंपरांमध्ये वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांमध्ये अभिजन म्हणजे समाजातील उच्च स्तरातील प्रवृत्ती प्रबळ होत्या. या इतिहासलेखनांमध्ये अभिजनवादी दृष्टीकोन ठेऊन त्याच्याशी सोयीस्कर अशा तत्वांचा, संकल्पनांचा आणि संशोधन पद्धतींचा अवलंब केला जात असे. मात्र, इ.स. १९८० च्या दशकापासून सुरु झालेल्या सबालटर्न स्टडीज या इतिहासप्रकल्पाने अभिजनवादी दृष्टीकोन बाजूला नव्या तत्वांचा, संकल्पनांचा आणि पद्धतीशास्त्रांचा अवलंब करून समाजतळाकडून इतिहास लिहिण्यास आरंभ केला. सुरवातीला त्यांनी नव-मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करण्यास सुरवात केली आणि पुढील काळात ते उत्तर-आधुनिकतावादी चौकटीत स्थिरावले. इ.स. १९८२ ते २००५ पर्यंत सबालटर्न स्टडीज चे एकूण बारा खंड प्रकाशित झाले. यातील पहिले दहा खंड ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस या सुप्रतिष्ठित प्रकाशनाने प्रकाशित केले. अकरावा आणि बारावा खंड देखील अनुक्रमे कोलंबिया विद्यापीठ आणि पर्मनेंट ब्लॅक या तितक्याच प्रतिष्ठित प्रकाशनगृहांनी प्रकाशित केला.

'सबालटर्न स्टडीज'च्या खंडांमध्ये विभिन्न पद्धतींचे ज्यांचा एकमेकांशी थेट संबंध नसतो असे विविध लेख प्रकाशित झाले. मात्र, त्यांच्यातील एक समान धागा हा शोषित-अंकित समूहांच्या प्रतिकाराचा असतो. अंतोनियो ग्रामचीच्या सबालटर्न संकल्पनेच्या आधारे वर्ग, जात, वय, लिंग आणि अधिकार या आधारे दुय्यम मानलेल्यांचा यात समावेश होतो. सबालटर्न स्टडीजने अशारितीने इतिहास लेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या शोषित-अंकित जनांना प्रकाशात आणले. मुघल काळापासून १९७०च्या दशकापर्यंत तसेच जमातवादापासून औद्योगिक कामगारापर्यंतच्या विभिन्न काळातील आणि विभिन्न विषयांवरील संशोधकीय आणि अभ्यासपूर्ण लेख सबालटर्न स्टडीज प्रकाशित झाले. भारतातील शेतकरी, औद्योगिक कामगार आणि आदिवासी यांच्या मधील असंतोष आणि त्या असंतोषातून त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात केलेला विद्रोह हा सबालटर्न इतिहासलेखनाचा मुख्य विषय होता. सबालटर्न इतिहासकारांच्या मते, शेतकरी कामगार आणि आदिवासी यांचे विद्रोह हे स्वत:ची स्थिती सुधारण्यासोबतच वसाहतीक अभिजनांचे आपल्याकडे लक्ष ओढून घेण्याचे एक साधन होते. सबालटर्न इतिहासकारांच्या मते पारंपारिक राष्ट्रवादी

इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांच्या विद्रोहाला स्वातंत्र्यचळवळीचा भाग मानून त्याच्या नेतृत्वाचे श्रेय अभिजन वर्गास दिले. त्याचप्रमाणे पारंपारिक मार्क्सवादी इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांमधील आदिवासी आणि शेतकऱ्यांच्या उठावाकडे दुर्लक्ष केले. याउलट सबालटर्न इतिहासकारांनी शोषित-अंकितांच्या या लढ्यांना स्वायत्त राजकारणाचा दर्जा देऊन त्यामागे शोषित-अंकित जनसमूहांच्या जाणीवा होत्या अशी मांडणी केली. याचे उदाहरण म्हणून शेतकरी बंडाकडे पाहता येते. शेतकरी बंडामध्ये कर्जखते, करार पत्रके जाळणे, सावकारावर हल्ले करणे अशी कृत्ये केल्याचे दिसून येते. यातून त्यांच्या शेतकरी असण्याच्या जाणीवा प्रकट होतात.

### ४.२.३.३ सबालटर्न स्टडीजचे संशोधक आणि त्यांचे संशोधन

आजतागायत सबालटर्न स्टडीजचे एकूण बारा खंड प्रकाशित झाले आहेत. सबालटर्न स्टडीज ने भारताच्या इतिहासातील शोषित-अंकित जनांच्या इतिहासाची मांडणी केली. आधुनिक भारतीय इतिहास लेखनामध्ये सबालटर्न स्टडीजचे इतिहास लेखन अत्यंत मूलगामी आणि प्रभावकारी मानले जाते. त्यामुळे सबालटर्न स्टडीजच्या संशोधकांचा आणि त्यांच्या संशोधनाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

१) **डेव्हिड आर्नोल्ड :** पूर्वी लंडन विद्यापीठात आणि सध्या वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असणाऱ्या डेव्हिड आर्नोल्ड यांनी तत्कालीन मद्रास प्रेसिडेन्सी (सध्याच्या आंध्र प्रदेशातील) गुडेम आणि रामपा या डोंगराळ प्रदेशातील लोकांच्या १८३९ ते १९२४ इतक्या दीर्घकाळ आणि सतत्याने चाललेय संघर्षाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा लेख सबालटर्न स्टडीजच्या पहिल्या खंडात लिहिला. सबालटर्न स्टडीजच्या तिसऱ्या खंडातील लेखात डेव्हिड आर्नोल्ड यांनी मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये १८७६-७८ दरम्यान पडलेल्या दुष्काळाचा इतिहास लिहिला. भीषण दुष्काळात उदरनिर्वाहासाठी आणि स्वत:ला जागवण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेले प्रयत्न आणि शेतकऱ्यांत निर्माण झालेल्या जाणीवा यांचा अभ्यास या लेखात केला गेला. भारतातील दुष्काळावर झालेल्या प्रचंड लेखनात या अभूतपूर्व संकटांना आपत्तीच्या काळातील मानवी अनुभवांच्या दृष्टीकोनातून पाहीले गेले नाही. तसेच टंचाई आणि दुष्काळाच्या काळातील शेतकऱ्यांचे अनुभव हे राज्याची धोरणे आणि उपाययोजना यांचे लांबलचक विवरण देताना दुर्लक्षित राहिले. अशी मांडणी डेव्हिड आर्नोल्ड यांनी आपल्या लेखात केली आहे.

२) **ज्ञान पांडे :** एमोरे युनिव्हर्सिटी, अटलांटा-जॉर्जिया, अमेरिका येथे प्राध्यापक असलेल्या ज्ञान(ज्ञानेंद्र) पांडे यांनी १९१९-२२ या काळात तत्कालीन अवध (सध्याचा उत्तर प्रदेश) मध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या बंडांचा आणि त्याचा भारतीय राष्ट्रवादावर झालेल्या परिणामांचा अभ्यास सबालटर्न स्टडीजच्या पहिल्या खंडातील लेखात केला.

३) **स्टीफन हेनिंनगम :** ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न विद्यापीठातील इतिहास संशोधक स्टीफन हेनिंनगम यांनी बिहार आणि उत्तर प्रदेश येथील चले जाव आंदोलनाचा अभ्यास केला. सबालटर्न स्टडीजच्या दुसऱ्या खंडातील आपल्या लेखात त्यांनी या भागातील१९४२ चे चलेजाव आंदोलन हे दुहेरी आंदोलन असून त्यात उच्चवर्गीय लोकांचा राष्ट्रवादी उठाव आणि सबालटर्न लोकांचा विद्रोह हे एकत्रित दिसून येतात.

४) **अरविंद नारायण दास :** सुप्रसिद्ध अभ्यासक आणि बिबिल्यो या प्रसिद्ध समीक्षा नियतकालिकाचे संस्थापक संपादक यांनी १९४७-७८ याकाळात बिहार मधील शेती व्यवस्थेतील बदलांवरील लेख सबालटर्न स्टडीजच्या दुसऱ्या खंडात लिहिला. १९४७-७८ या काळात बिहारमध्ये झालेल्या शेतीव्यवस्थेतील बदलांचे कारण उच्चवर्गाद्वारे करण्यात आलेल्या जमीन सुधारणा होत्या असे मानने चूक ठरेल अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. जमीनदारी व्यवस्थेचे उच्चाटन आणि भूदान चळवळ यांच्या माध्यमातून उच्चवर्गाकडून म्हणजेच वरून जमीन सुधारणा राबवल्या गेल्या असे मानले जाते. मात्र अरविंद दास यांच्या मते, या सुधारणा स्वयंस्फूर्तीने राबवल्या गेल्या नसून बिहार मधल्या शेतकऱ्यांच्या असंतोषाला प्रतिक्रिया/प्रतिसाद म्हणून राबवल्या गेल्या. अरविंद दास यांनी अशी मांडणी केली की, स्वामी सहजानंद सरस्वती आणि शक्तिशाली किसान सभा यांनी अनेक वर्षे केलेल्या आंदोलनांमुळे बिहारमध्ये जमीनदारी उच्चाटनासाठी कायदा (१९५०) करण्यात आला. तसेच तेलंगणामध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सशस्त्र उठावानंतर (१९४६-५१) भूदान चळवळ बिहार मध्ये सुरु झाली. ह्या दोन्ही जमीन सुधारणा या शेतकर्यांच्या असंतोषामुळे बिहार मध्ये वर्गसंघर्ष पेटू नये यामुळेच केल्या गेल्या अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. उच्चवर्गाद्वारे केलेल्या सुधारणांमुळे शेतीव्यवस्थेत बदल झाले अशाप्रकारची कोणतीही कारणमीमांसा करणे हे वस्तूला न पकडता त्याच्या सावली मागे धावण्यासारखे आहे, असे अरविंद दास यांना वाटते.

५) **दिपेश चक्रवर्ती :** अमेरिकेतलीशिकागो विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या दिपेश चक्रवर्ती यांनी १८९०-१९४० या काळात कलकत्यातील (सध्याचे कोलकाता) ज्यूट (ताग) कारखान्यातील कामगारांच्या स्थितीविषयीचा शोधनिबंध सबालटर्न स्टडीजच्या दुसऱ्या खंडात लिहिला. अशाच प्रकारचा १९२०-५० याकाळातील ज्यूट कारखान्यातील कामगारांवरील लेख त्यांनी सबालटर्न स्टडीजच्या तिसऱ्या खंडात देखील लिहिला. आपल्या संशोधनातून दिपेश चक्रवर्ती असे दाखवून देतात की, तत्कालीन कलकत्यातील समाजवादी आणि कम्युनिस्ट नेतृत्वात अभिजनवादी प्रवृत्ती विद्यमान होत्या. समाजवादी आणि कम्युनिस्ट नेते आपल्या नेतृत्वाखालील कामगार संघटनांना स्वत:च्या जमीनदारी असल्याप्रमाणे प्रमाणे वागवत. तसेच कामगारांच्या सोबतचे त्यांचे संबंध हे बाबू-कुली (मालक-गडी) यांच्या संबंधा इतके उतरंडीचे झाले होते.

६) **शाहीद अमीन :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या शाहीद अमीन यांनी सबालटर्न स्टडीजच्या तिसऱ्या खंडात महात्मा गांधींवर लिहिलेल्या लेखात शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्ये महात्माचा करिष्मा कशाप्रकारे रुजला होता याचा शोध घेतला. शाहीद अमीन यांना असे आढळून आले की, महात्मा चा करिष्मा शेतकरी जाणिवांमध्येरुजण्याचे महत्त्वपूर्ण कारण हे शेतकऱ्यांमध्ये चमत्कारासंबंधी असलेला विश्वास हे होते.

७) **डेव्हिड हार्डीमन :** इंग्लंडमधील वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या डेव्हिड हार्डीमन यांनी सबालटर्न स्टडीजच्या तिसऱ्या खंडात दक्षिण गुजरात मधील आदिवासींमधील देवी सुधारणा चळवळीवर शोधनिबंध लिहिला. या संशोधनातून हार्डीमन यांनी तो पर्यंत दुर्लक्षित असलेल्या आदिवासींच्या जाणिवांवर प्रकाश टाकला आणि समाजशास्त्रज्ञांद्वारे अधिक संशोधनाची गरज व्यक्त केली.

८) **सुमित सरकार :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या सुमित सरकार यांनी सबालटर्न स्टडीजच्या तिसऱ्या खंडात १९०५ मधील बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन आणि १९२१-२२ मधील असहकार-खिलाफत आंदोलन यांच्या मधील जनसामान्यांच्या सहभागावर शोधनिबंध लिहिला. सुमित सरकार यांच्या मते बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलनापेक्षा असहकार-खिलाफत आंदोलनात जनसामान्यांचा उत्साह आणि सहभागतुलनेने जास्त होता. बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन हे बंगाल मधील भद्र लोक म्हणजेच हिंदू उच्चजातीय अभिजनांच्या पुरतेच सीमित होते. याउलट असहकार-खिलाफत आंदोलनातील जनसामान्यांचा उत्साह आणि पुढाकार इतका प्रचंड होता की त्यामुळे सावध झालेल्या आंदोलनाच्या नेत्यांनी आंदोलन थांबवण्याचे आवाहन केले, अशी मांडणी सुमित सरकार यांनी केली.

वरील संशोधकांबरोबरच **रणजीत गुहा, एरिक स्ट्रोक्स, पार्थ चटर्जी, रामचंद्र गुहा, गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक, कांचा इलैय्या, गौतम भद्रा, ज्ञान प्रकाश** इत्यादी संशोधकांनी आदिवासी, दलित, स्त्रिया आणि जनसामान्य इत्यादी शोषित-अंकित समूहांचा इतिहास सबालटर्न स्टडीजच्या माध्यमातून मांडला.

### ४.२.३.४ सबालटर्न इतिहासलेखनाचे मूल्यमापन

भारतातील पारंपारिक इतिहासलेखनप्रवाहांनी अभिजनवर्गाच्या दृष्टीकोनातून इतिहास लेखन केले. राष्ट्रवादी इतिहास लेखन आणि मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरेने देखील शोषित-अंकित जनसमुदायांच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले. अशा परिस्थितीत शोषित-अंकितांच्या दृष्टीकोनातून म्हणजेच तळाकडून इतिहास लेखनाच आरंभ भारतात सबालटर्न स्टडीजच्या म्हणजेच सबालटर्न इतिहास लेखन परंपरेच्या माध्यमातून

झाला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील जनसामन्य लोकांचा सहभाग, या सहभागामागील त्यांच्या जाणीवा-प्रेरणा, त्या मागील त्यांचे स्वत:चे राजकारण-हितसंबंध इत्यादींचा अभ्यास सबालटर्न इतिहासलेखनाने केला. अशाच पद्धतीने आदिवासींचे उठाव आणि शेतकऱ्यांच्या बंड यांचा देखील अभ्यास केला. आदिवासी-शेतकरी यांच्या जाणीवा, उठावामागील कारणे, प्रतिकाराच्या पद्धती इत्यादींचा देखील अभ्यास सबालटर्न इतिहासकारांनी केला. स्त्रियांच्या जाणीवा, पितृसत्ता, स्त्रियांचे शोषण इत्यादी संदर्भातील संशोधनाची देखील सुरवात काही काळानंतर गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक यांच्या लेखापासून झाली. त्याच प्रमाणे दलितांचे शोषण, त्यांच्या जाणीवा, त्यांचा सांस्कृतिक प्रतिरोध यांच्या बाबतच्या संशोधनाचा देखील आरंभ उशिरा का होईना कांचा इलैय्या यांच्या लेखा पासून झाला. अशारीतीनेसबालटर्न इतिहासलेखनाने पारंपारिक इतिहासलेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या जनसामान्य लोकांच्या, आदिवासींच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या परीपेक्षातून इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन विकसित केला.अभिजन केंद्रित इतिहासामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या समाज घटकांच्या इतिहासाची मांडणी केल्यामुळे भारताच्या इतिहासाचे एक वेगळे पदरसबालटर्न इतिहासकारांनी उघडून दाखवले. सबालटर्न स्टडीजच्या नंतरच्या काळातील लेखांमध्ये उत्तर-आधुनिकतावादी दृष्टीकोन प्रभावी ठरू लागला. यातून सामाजिक आर्थिक रचनेत शोषित-अंकित जनाच्याशोषणाच्या कारणांचा आणि त्यांच्या प्रतिकारांचा अर्थ लावण्याऐवजी वर्चस्वीआणि शोषित/अंकित यांच्या संबंधावर भर देण्यात आला.सबालटर्न इतिहास लेखनासाठी काही नव्या प्रकारच्या साधनांचा म्हणजेच मौखिक परंपरा इत्यादींचावापरसबालटर्न इतिहासकारांनी केला असला तरी मोठ्या प्रमाणत उपलब्ध असलेली आणि सबालटर्न इतिहासकारांनी वापरलेली पुराभिलेखीय साधने ही मूलतः वर्चस्वीवर्गाचीच आहेत. अशावर्चस्वी वर्गकेंद्रित साधनांच्या आधारे शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिताना मर्यादा येतात. असे असले तरी तळाकडून इतिहास आणिभाषाशास्त्रीय-मनोविश्लेषण इत्यादी नव्या दृष्टीकोन आणि पद्धतीशास्त्रांचा उपयोग करून सबालटर्न इतिहासलेखन परंपरेने भूतकालीन घटनांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. भारतातील अभिजन केंद्रित इतिहास लेखनाच्या प्रवृत्तीला नाकारून शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिणे आणि शोषित-अंकित जनांच्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन करण्याच्या सबालटर्न स्टडीजच्या इतिहासकारांची भूमिकेने भारतीय इतिहासलेखन परंपरेत मूलगामी बदल घडवून आणले. अभिजनकेंद्रित असण्याची जी उणीव भारतीय इतिहासलेखन परंपरेत होती ती भरून काढण्याच्या कामी सबालटर्न इतिहासलेखन परंपरेचे योगदान मोठे आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सबालटर्न स्टडीजचे प्रवर्तक म्हणून कोणास ओळखले जाते?

२. अंतोनियोग्रामचीचे कोणते लेखन हे विसाव्या शतकातील मुलभूत लेखन मानले जाते ?

३. भारतातील कोणत्या समाजगटांना सबालटर्न मानण्यात आले ?

४. शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्येरुजलेल्यामहात्माच्या करिष्माचा शोध कोणी घेतला?

५. सबालटर्न स्टडीजमध्ये स्त्रियांच्या जाणीवा, पितृसत्ता, स्त्रियांचे शोषण इत्यादी संदर्भातील संशोधनाची सुरवात कोणाच्या लेखापासून झाली?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. रणजीत गुहा आणि त्यांच्या सबालटर्न स्टडीजच्या सहकाऱ्यांनी सबालटर्न ही संकल्पना इटलीतील कृतीशील मार्क्सवादी विचारवंत .....................यांच्या कडून घेतली.

२. अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी .............ही संकल्पना वापरली.

३. ...........यांनी मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये १८७६-७८ दरम्यान पडलेल्या दुष्काळाचा इतिहास लिहिला.

४. भारतातील पारंपारिक इतिहासलेखनप्रवाहांनी...................च्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन केले.

५. सबालटर्न स्टडीजच्या नंतरच्या काळातील लेखांमध्ये ................ दृष्टीकोन प्रभावी ठरू लागला.

## ४.२.४ स्त्रीवादी (Feminist) इतिहासलेखन

जगाच्या कोणत्याही इतिहास काळात स्त्रिया या जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या होत्या. प्रागैतिहासिक काळापासून ते आजच्या काळापर्यंत मानवी समाजाच्या विकासात समाजाचा अर्धा भाग असणाऱ्या स्त्रियांचीभूमिका महत्त्वाची हे नाकारता येत नाही. मात्र, जेंव्हा आपण इतिहास ग्रंथांचा आढावा

घेतो तेंव्हा आपणास स्त्रियांचा उल्लेख अत्यंत त्रोटक स्वरूपात दिसतो. पारंपारिक आणि मुख्यप्रवाही इतिहासलेखनातून स्त्रियांना वगळण्यात आले. इतिहास ग्रंथातून स्त्रियांची त्रोटक माहिती आणि अपवादात्मक उल्लेख मिळतात. मात्र, ती सर्व माहिती आणि उल्लेख हे उच्चजातीय आणि उच्चवर्गीय स्त्रियांचे असल्याचे दिसून येते. इतिहासात स्त्रियांचा उल्लेख हा केवळ मोजक्या संख्येतील स्त्रियांच्या वैयक्तिक कर्तबगारीचा आढावा असतो. त्यामुळे स्त्रियांनी सामुहिकरित्या मानवी विकासात निभावलेल्या भूमिकांचा उल्लेख इतिहासात कोठेच होत नव्हता. भारतातील मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनात देखील स्त्रियांचे स्थान दुय्यम होते. स्त्रीवादी चळवळीमुळे इतिहासाकडे पाहण्याचा स्त्रीवादी दृष्टीकोन पुढे आला आणि त्यातूनच भारतात स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरा उदयास आली. समाजाचा अर्धा भाग असलेल्या पण दुय्यम मानलेल्या स्त्रियांचा इतिहास त्यांच्याच दृष्टीकोनातून मांडणारा स्त्रीवादी इतिहासलेखन प्रवाह हा भारतातील तळाकडून इतिहास परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे स्त्रीवादी इतिहास लेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

### ४.२.४.१ स्त्रीवाद म्हणजे काय ?

स्त्रीवादी इतिहासलेखनाचा आढावा घेण्याआधी स्त्रीवाद म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक आहे. स्त्रीवाद ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते. मानवी समाजात पुरुषांचे वर्चस्व आणि स्त्रियांचे दुय्यमत्व - दास्यत्व अस्तित्वात येण्याची कारणमीमांसा स्त्रीवाद करतो. तसेच हे दुय्यमत्व - दास्यत्व नष्ट करण्यासाठी विविध प्रकारच्या चळवळी स्त्रीवादींद्वारे केल्या जातात. फक्त स्त्री-पुरुष समानता इतकेच स्त्रीवादास अभिप्रेत नसून तृतीयपंथीय आणि समलिंगींच्या अधिकारांचा देखील पाठपुरावा स्त्रीवादी करतात. संपूर्ण शोषणमुक्त आणि समताधारित समाजाची निर्मिती करणे हे स्त्रीवादाचे ध्येय आहे. स्त्रीवादी चळवळी द्वारे उभारण्यात आलेले लढे हे मुलत: मानवमुक्तीच्या लढ्यांचे अविभाज्य भाग आहेत.

'स्त्रीवाद' हा ज्याप्रमाणे एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे त्याचप्रमाणे स्त्रीवाद हा समाज, इतिहास, राजकारण, संस्कृती, अर्थव्यवस्था, धर्म, जाती-वर्णव्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन देखील आहे. स्त्रीवाद हा एकसाची दृष्टीकोन नसून त्यामध्ये विभिन्न प्रवाह आहेत जे विविध काळात आणि विविध परिस्थितीत उदयास आले. या बहुप्रवाही स्त्रीवादाने जगातील विविध वर्गातील,वंशातील, प्रदेशातील स्त्रीप्रश्नांचे सिद्धांकन अतिशय समृद्ध केले. स्त्रीवादी सिद्धांकनाने पितृसत्ता, लिंगभाव, लैंगिकता इत्यादी संकल्पनांच्या आधारे राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, संस्कृती इत्यादींचे अत्यंत नव्या स्वरूपात विश्लेषण केले.

स्त्री स्वातंत्र्यासाठी आणि स्त्रियांच्या हक्कासाठी लढणाऱ्या विविध स्त्रीवादी चळवळी या काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आकारास आल्या. ज्याप्रमाणे समुद्राच्या लाटांमध्ये उसळणे-वाढणे-क्षीण होणे अशी सतत चालणारी प्रक्रिया होते, त्याचप्रमाणे काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर स्त्रीवादी चळवळींमध्ये देखील उदय, विकास आणि क्षीण होण्याची प्रक्रिया दिसून येते. त्यामुळे स्त्रीवादाचे इतिहासकार स्त्रीवादी चळवळींच्या टप्प्यांचे वर्णन स्त्रीवादाच्या लाटा असे करतात. स्त्रीवादाची पहिली लाट १९व्या आणि २०व्या शतकात विकसित झाली ज्यात स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार हा केंद्रस्थानी होता. १९६०च्या आणि १९७०च्या दशकात आलेल्या स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत स्त्रियांसाठी समान कायदेशीर आणि सामाजिक हक्कांचा मुद्दा महत्त्वाचा होता. स्त्रीवादाची तिसरी लाट १९९०च्या दशकात उदयास आली आणि आज देखील अस्तित्वात आहे. स्त्रीवादाची तिसरी लाट ही तिच्या दुसऱ्या लाटेशी सातत्य राखणारी असून तिच्या उणिवांच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात उदयास आली.

### ४.२.४.२ भारतातीलस्त्रीवादी इतिहासाच्या विकासाचे टप्पे

भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत१८व्या शतकातआरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखना पासून भारतासंबंधी आधुनिक इतिहासलेखनास सुरवात झाली. भारताच्या इतिहासासोबतच भारतीय समाजाच्या इतिहासाबद्दलची मांडणी विविध इतिहासलेखन परंपरांच्यामध्ये केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या संदर्भात देखील काही प्रमाणात ऐतिहासिक मांडणी केली गेली. मात्र, काळाच्या ओघात आणि वैचारिक बदलांच्या प्रभावाने स्त्रियांच्या इतिहासलेखनाचाटप्प्याटप्प्यानेविकासहोत गेला आणिस्त्रीवादी इतिहासलेखनाची परंपरा उदयास आली.

### १) पहिला टप्पा : वसाहतवादी आणि राष्ट्रवादी दृष्टीकोनातून स्त्रियांचाइतिहास

भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत१८व्या शतकातआरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाबद्दल लेखन केले.जेम्स मिल, विल्यम जोन्स इत्यादी इतिहासकारांनी भारतीय स्त्रियांच्या स्थिती विषयी लेखन केले. सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासीप्रथा इत्यादी चालीरीती आणि स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक यांची माहितीवासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील साम्राज्यवादी इतिहासलेखकांनी दिली. भारतीयस्त्रियांना मिळणारी अमानुषआणि हीन वागणूक अधोरेखीत करून मांडल्याने भारतीय लोक हे मागास प्रवृत्तीचेआहेत आणि त्यामुळे ते स्वत:वर राज्य करण्यास लायक नाहीत या साम्राज्यवादी मांडणीस बळ मिळत असे. अशा प्रकारची मांडणी ब्रिटीशांच्या भारतावरील सत्तेचे समर्थन करण्यासाठी वापरली जातअसे.

भारतासंबंधी आकर्षण आणि कुतूहल असलेल्या वासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील पौर्वात्यवादी इतिहासकारांनी प्राचिन भारतीय संस्कृतीचे उदात्तीकरण करताना भारतातील प्राचिन काळास सुवर्णयुग संबोधले.भारतीय इतिहासचा प्राचिनकाळ हा सुवर्णयुग मानल्यामुळेतो भारतीय स्त्रियांसाठी देखील सुवर्णयुग होता अशी मांडणी पौर्वात्यवादी इतिहासकारांनी केली. प्राचिन काळी भारतातस्त्रियांचे स्थान उत्तम होते आणि त्यांच्यावर कोणती ही जाचक परंपरा व बंधने लादलेली नव्हती, याचादाखला वैदिक काळातील स्त्रियांच्या स्थितीवरून देण्यात आला. वैदिककाळात सती प्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदापद्धत, देवदासीप्रथा इत्यादी चालीरीतींचे अस्तित्वनव्हते, असेसांगत पौर्वात्यवादी इतिहासकारांनी स्त्रियांसाठी देखील सुवर्णयुगच असल्याची मांडणी केली.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेल्या राष्ट्रवादी इतिहासलेखनाने पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची तळी उचलत प्राचिन भारतात स्त्रियांचीस्थिती किती चांगली होती हे आणखी अधोरेखित करून मांडण्याचा प्रयत्न केला. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी इतिहासकार अनंत सदाशिव अळतेकर यांनी The Position of Women in Hindu Civilization From Prehistoric Times to the Present Day या ग्रंथ १९३८ साली लिहिला. प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळापर्यंत हिंदू संस्कृतीतील स्त्रियांच्या स्थानाविषयी भाष्य या ग्रंथात करण्यात आले होते.पौर्वात्यवादी इतिहासकारांप्रमाणे अळतेकरांनी प्राचिनभारतात स्त्रियांचेजीवन आणि स्थान हे उच्च आणि उत्तम दर्जाचे होते, असे प्रतिपादन केले.रामकृष्ण गोपाळ भांडारकर, काशीप्रसाद जयस्वाल, रोमेशचंद्रदत्त, रोमेशचंद्र मुजुमदार या राष्ट्रवादी इतिहासकारांनी देखीलअळतेकर यांच्या सारखीच मांडणीकरत सुवर्णयुग सिद्धांताची पाठराखण केली.

सुप्रसिद्ध स्त्रीवादी इतिहासकारउमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांनी Economic and Political Weekly या नियतकालीकेत १९८८ मध्ये In Search of Our Past: A Review of the Limitations and Possibilities of the Historiography of Women in Early India हा महत्त्वपूर्ण लेख लिहिला. या लेखात त्यांनी प्राचिन भारतातील स्त्रियांच्या संदर्भातील इतिहासलेखनाची चिकित्सा करून आतापर्यंत झालेल्या संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करत नव्या संशोधनाच्या शक्यता देखील वर्तवल्या. उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांच्या मते:

१) राष्ट्रवादी चळवळीच्या पृष्ठभूमीवर भारतीयम्हणून हिंदू स्त्रीविषयी इतिहासलेखन केल्यामुळे ते राष्ट्रवादी विचारसरणीनेप्रेरित होते. स्त्रियांच्या उत्तम दर्जाचे उदात्तीकरण हे साम्राज्यवादी इतिहासकारांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याच्या हेतूने करण्यात आले.

२)	राष्ट्रवादी इतिहासकारांनी स्त्रियांचे स्थान ठरवत असताना जे मापदंड लावले त्या मापदंडातच समस्या होत्या. स्त्रियांना यज्ञ आणितत्सम कर्मकांडामध्ये स्थान होते कि नव्हते, अशाप्रकारचे क्षुल्लक मापदंड वापरून स्त्रियांचे स्थान उत्तम होते असे ठरविले गेले. याच काळात सामाजिक सुधारणांनासुरुवात झाली होती.सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासीप्रथा याचालीरीतींना समाज सुधारक विरोध करू लागले. राष्ट्रवादी इतिहासकारांनी या चालीरीती केंव्हापासून सुरुझाल्या याचा शोध घेतला. संशोधनानंतर त्यांना असे आढळून आले की, वैदिक काळात या चालीरीती आढळत नाहीत.वैदिक काळात या चालीरीती नव्हत्या म्हणून त्याकाळी स्त्रियांचा दर्जा उच्च होता असा निष्कर्ष या इतिहासकारांनी काढला. मात्र, त्याकाळी या प्रथा नव्हत्या म्हणून स्त्री आणि पुरुष हे दोघे समान दर्जाचे होते, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे त्याकाळी स्त्रियांचे शोषण होत नव्हते, असे देखील म्हणता येणार नाही.

(३)	स्त्रियांवर कडक निर्बंध लादणाऱ्या प्राचिन ग्रंथामधील कायदे व नियमांवर राष्ट्रवादी इतिहासकारांनी सोयीस्कर मौन बाळगले. भारतीय समाजातील उच्चवर्णीय स्त्रियांचा दाखला देत सर्वस्त्रियांच्यास्थितीचे वर्णन केले. उच्चवर्णीय स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन देखील पुरुषसत्ताक दृष्टीकोनातून माता, पत्नी, भगिनी, पुत्री अशा नात्यांच्या गौरविकरणाच्या स्वरुपात केले. भारतातील दासीप्रथा आणि कनिष्ठ वर्णीय स्त्रियांची स्थिती यांच्यावर मौन बाळगले. वैदिक काळात उच्च स्थान असलेल्या स्त्रियांची अवनिती ही मुस्लिमांच्या आक्रमणामुळे झाली अशी जमातवादी मांडणी करून मुसलमानांना दोष देण्याचे जमातवादी राजकारण इतिहासकारांनी केले. प्राचिन काळात उच्चवर्णीय पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांचा साधन म्हणून वापर करत असताना त्यातील वर्णनाचा खरे-खोटेपणा किंवा त्यातील विसंगती यांच्याकडे राष्ट्रवादी इतिहासकारांनी दुर्लक्ष केले.

ज्याप्रमाणे राष्ट्रवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासकारांना दिलेल्या प्रतिक्रियेपोटी केलेली प्राचिनकाळाचीसुवर्णयुग म्हणून केलेली चुकीची आणि वरवरची मांडणी कित्येक वर्ष जनमानसात रुजून आहे. त्याचप्रमाणे भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थानाचाचुकीचा आणि वरवरचा इतिहास देखील जनमानसात रुजला आहे.

**२) दुसरा टप्पा : राष्ट्रनिर्मितीसाठीची स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासिक स्त्री चरित्रे**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरनव्याने उदयास आलेल्या राष्ट्राच्या विकासासाठी आणि राष्ट्रवादी भावनेच्या प्रसारासाठी थोर ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे लिहिण्याचे प्रयत्न झाले. शासकीय आणि वैयक्तिकरित्यालिहिलेल्या या चरित्रांमध्ये अनेक ऐतिहासिक स्त्रियांची चरित्रे देखील लिहिली गेली.

राजघराण्यातीलकर्तुत्वान स्त्रिया, युद्धप्रसंगी शौर्यगाजवणाऱ्या स्त्रिया इत्यादींचीया चरित्रांमध्ये भरमार होती. यास्त्रियांनीपुरुषांचेगुणविशेष मानले गेलेलेराजकीय कर्तुत्व आणि युद्धातील शौर्य दाखवल्यामुळेच त्यांची चरित्रे लिहिली गेली. तसेच ज्या स्त्रियांची चरित्रे लिहिली गेली, त्या मुख्यत: उच्च वर्णाच्या, उच्च जातींच्या आणिउच्च वर्गाच्या होत्या आणिसामान्य स्त्रियांना यात कोणतेही स्थान नव्हते. पुरुषसत्ताक दृष्टीकोन असलेल्या इतिहासाच्या चौकटीतच या स्त्रियांचा इतिहास बसवण्याचा प्रयत्न केल्याचे या चरित्रांतून दिसून येते.

### ३) तिसरा टप्पा : स्त्रियांच्या योगदानाचा इतिहास

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात भाग घेतला होता.वसाहतकालीन आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय आणि सामाजिक चळवळीत देखील स्त्रियाचा सहभाग मोठा होता.भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील आणि विविध चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा आणि योगदानाचा इतिहास तिसऱ्या टप्प्यात लिहिण्यात आल्याचे दिसून येते.

### ४) चौथा टप्पा : स्त्रीवादी इतिहास

स्त्रीवादीचळवळीच्या दुसऱ्या लाटेपासून जहालस्त्रीवाद दिसून येऊ लागला. १९६०मध्येआलेल्या या लाटेमध्ये जे जे खाजगी, ते ते राजकीय अशी घोषणा केली गेली.स्त्रीवादी विचारप्रणालीमुळे सामाजिक शास्त्रांच्या आकलनाच्या मर्यादा रुंदावल्या आणि त्यांना नवे भान आले. आतापर्यंतझालेल्या ज्ञाननिर्मितीची स्त्रीवादी चिकित्सा करण्याचीबौद्धिक चळवळ उभी राहिली. सामाजिक शास्त्रांमधील संशोधन पद्धतीला आव्हान देऊन त्यांच्या उणीवा दाखवण्याचेकार्य या चळवळीने केले. त्याच बरोबर सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या नव्या पद्धती आणि साधने शोधण्याचा आणि विकसित करण्याचा प्रयत्न केला गेला.

मानवी इतिहासाचा अभ्यास करताना चिकित्सात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग स्त्रीवादी विचारवंतानी केला. ज्ञाननिर्मिती होत असताना समाजातील सत्ताविहीन घटक म्हणजेच स्त्रिया, शेतकरी, आदिवासी, कामगार दलित इत्यादींचे अनुभव आणि ज्ञान हे वगळले जातात. त्याचप्रमाणे इतिहास हा पुरुषकेंद्रित स्वरुपात लिहिलागेल्याने स्त्रिया यातून वगळल्या गेल्या. इतिहास पुरुषकेंद्रित असल्यामुळे आणि इतिहास संशोधनाचा दृष्टीकोन देखील पुरुषकेंद्रित असल्यामुळे मुख्यप्रवाही इतिहासातून पुरुषांचे अनुभव, विचार आणि कृती यांनाच स्थान मिळाले. स्त्रियांचे अनुभव, विचार आणि कृती यांना वेगळे काढून तपासण्याचा प्रयत्न मुख्यप्रवाही इतिहासाने केला नाही. त्यामुळे स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांची चरित्रे, स्त्रियांचे योगदान, स्त्रियांची स्थिती यांची मांडणी ही पुरुषकेंद्रित दृष्टीकोनाने आणि पितृसत्ताक व्यवस्थेस रुचेल अशीच केली गेली.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी केल्यास वेगळ्या पद्धतीचे आकलन होईल असे स्त्रीवादी इतिहासकारांना वाटते. ज्ञानहेवस्तुनिष्ठ नसून संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार त्याचे ज्ञानाविषयी आणि इतिहासाविषयी आकलन बदलते अशी मांडणी स्त्रीवादी विचारवंतानी केली.यालाचभूमिदृष्टी सिद्धांत (Standpoint Theory) म्हटले जाते. समग्र वास्तवाच्या आकलनासाठीविविध सामाजिक स्थानांवरून झालेले आकलन समजून घ्यायला हवे अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंतांनी घेतली. स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव हे केंद्रस्थानी असायला हवेत असा त्यांचाआग्रह आहे. स्त्रीवादी इतिहासाची ही भूमिका तळाकडून इतिहासच्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

स्त्रीवादी इतिहासकारांनी मुख्यप्रवाही इतिहासलेखनाविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. पारंपारिक किंवा मुख्य प्रवाही इतिहासातून स्त्रियांना का वगळले? स्त्रियांचा उल्लेख त्रोटक व वरवरचे का आले? स्त्रियांविषयीचे विचार विकृत आणि नकारात्मक का होते? लढाया, राजकारण, सार्वजनिक क्षेत्र यानाचा इतिहासात स्थान का देण्यात आले? पुरुष लढाया करत असताना स्त्रिया काय करायच्या? त्याची दाखल इतिहासाने का घेतली नाही? स्त्रिया मुलांना जन्म देतात, त्यांना घडवतात, संस्कृती जपतात, तिचे संवर्धन करतात, अन्ननिर्मितीकरतात, शेती-कारखान्यात उत्पादनकरतात इत्यादी विषयांना इतिहासात स्थान का मिळाले नाही? असे प्रश्न स्त्रीवादी इतिहासकारांनी उपस्थित केले.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करणारे संशोधन जगभरातील विविध देशांत सुरु झाले.स्त्रीवादी इतिहास लेखनात ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि भारताचा विशेष उल्लेख केला जातो. स्त्रीवादीइतिहासाने भारतीय इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आहे.

### ४.२.४.३ भारतातीलस्त्रीवादी इतिहास

भारतातील स्त्रीवादी इतिहासलेखनामध्येप्रागैतिहासिक काळापासून सद्यकाळापर्यंतच्या विषयांवर इतिहासलेखन केले जाते. प्रागैतिहासिक काळात मानव जेंव्हा शिकार आणि अन्नसंग्रहकरून जगत होते तेंव्हा देखील स्त्रियांचा शिकार आणि अन्नसंग्रहात मोठा वाटा होता. शेतीचा शोध, मातीची भांडी बनवणे, वस्त्रे बनवणे, अवजारे बनवणे, घरबांधणी, औषधोपचारया क्षेत्रात स्त्रियांनी मोठी कामगिरी केली होती हेस्त्रीवादी इतिहास्कारणी सिद्ध केले. इरावतीकर्वे, डी.डी. कोसंबी, शरद पाटील, एच. डी. सांकलिया यांनी त्यांच्या संशोधनात मातृसत्ताक अथवा मातृप्रधान समाजात स्त्रिया पुरुषांच्या वर्चस्वाखाली नव्हत्या तसेच त्या उत्पादन कार्यात महत्त्वाची भूमिका निभावत होत्या अशी मांडणी केली. या काळात स्त्रियाकाठीच्या आधारे शेतीकरत होत्या, भांडी बनवत, बुरुड काम इत्यादी उद्योग करत तसेच धार्मिक पौरोहित्य देखील करत असत. स्त्रियांच्या जननक्षमतेमुळे तत्कालीन मानवी समूहांत त्यांचा मोठा आदर केला जात असे. हे समाज मातृपुजक असत.रा. चिं. ढेरे यांनी लज्जागौरी या ग्रंथात भारतातील मातृदेवतांच्या उपासनेचा अभ्यास केला. त्यांच्या मते वेदपूर्व काळापासून मातृदेवतांची उपासना होत होती.

शेतीच्या शोधानंतर हळूहळू पितृसत्ताक कुटुंबपद्धती आकारास आली आणि मातृसत्ताक कुटुंबपद्धत क्षीण होत गेली त्या सोबतच स्त्रियांचे स्थान दुय्यम होत गेले  अशी मांडणी स्त्रीवादी इतिहासकारांनी केली. भारतातब्राम्हणी पितृसत्तानेस्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात मुख्य भूमिका बजावली असे उमा चक्रवर्ती यांचे मत आहे.  शेतीसाठी मजूर पुरवठा सतत उपलब्ध रहावा म्हणून वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था आकारास आली. त्यांच्या माध्यमातून बहुसंख्य पुरुषांना नियंत्रित करून शेतीच्या उत्पादनास जुंपता येत असे. स्त्रिया मुलांना जन्म देऊन सतत मजुरांचा पुरवठा करत राहतील म्हणून त्यांच्यावर देखील बंधने आली. त्याच प्रमाणे संपत्तीचा औरस वारस मिळविण्यासाठी आणि जाती-वर्णाचे शुद्धत्व टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि जननक्षमतेवरब्राम्हणी पितृसत्तेने नियंत्रण आणले. जातीव्यवस्था आणि ब्राम्हणी पितृसत्ता या दोन व्यवस्था परस्पर संबंधी होत्या. या दोन्ही व्यवस्थांचा वापर उच्चजाती व उच्चवर्णातील पुरुषांनी बहुसंख्य पुरुषांचे  आणि स्त्रियांचेशोषण करण्यासाठी वर्षानुवर्षे वापरली. जात, वर्ग आणि लिंगभा व हा परीपेक्ष्यवापरून उमा चक्रवर्ती यांनी केलेले संशोधन नवी दिशा देणारे ठरले.

कुमकुम रॉय आणि उपिंदरसिंग यांनी बौद्ध -जैनस्तूप, विहार, लेण्या इत्यादी ठिकाणी स्त्रियांनी कोरवून घेतलेल्या लेखांचा अभ्यास केला.तारा भवाळकर, विजया रामस्वामी, इंदुमती शेवडे यांनी जवळपास ७५ संत कवयत्रींचा आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून स्त्रियांना मोक्ष प्राप्तीसाठी पितृप्रधान समाजाशी कसा संघर्ष करावा लागला याची मांडणी केली.स्त्रियांच्या मौखिक साहित्याचा म्हणजेच जात्यावरील गाणी, वेगवेगळ्या सण-उत्सवात म्हटली जाणारी गाणी, म्हणी, वाक्यप्रचार, मिथककथा, दंत कथा, लोक कथा इत्यादींच्या मध्ये प्रस्तुत होणाऱ्या स्त्रियांच्या जाणिवांचा अभ्यास स्त्रीवादी इतिहासकारांनी केला. राष्ट्रवादाच्याउदया सोबतच राष्ट्रवादी चर्चाविश्वातूनस्त्रियांना नव्याने साचेबद्धकसे करण्यात आले याचा अभ्यास ‘Recasting Women : Essays in Colonial History  (१९८९) या कुमकुम संगारी आणि सुदेश वैदयांच्या द्वारे संपादित ग्रंथातकरण्यात आला.

आधुनिक काळात स्त्रियांनी केलेल्या लेखनातून त्यांनी पितृसत्तेशी कसा संघर्ष केला हे दिसून येते.तनिका सरकार,मीरा कोसंबी, विद्युत भागवत यांनी आधुनिक बंगाल आणि महाराष्ट्रात स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याच्या अभ्यासातून स्त्रियांचा पितृसत्तेशी संघर्षाच्याआणि स्त्रियांच्या जाणिवांच्या इतिहासाची मांडणी केली. सुसी थारू आणि के. ललिता यांनी ‘Women Writing in India : 600 BC to the Present या द्विखंडीय ग्रंथात प्राचिनकाळापासून आजच्या काळापर्यंत भारतातील स्त्रियांनी केलेल्या लिखाणाचा संग्रह १९९१ मध्येप्रकाशित केला. महाराष्ट्रात साहित्य प्रेमी भगिनी मंडळने स्त्री-साहित्याचा मागोवा (२००२) आणिभारतीय भाषांतील स्त्रीसाहित्याचा मागोवा (२००७) असेअनेकखंडीय स्त्रियांच्या लेखनाचा संग्रह असलेले  ग्रंथ प्रकाशित केले.सर्व स्त्रिया सारख्याच प्रमाणात शोषित असतात हा भ्रम

नाकारून स्त्री हा एकसाची कोटिक्रम नसून जात,वर्ग,प्रदेश, राष्ट्र अनुरूप स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व भिन्न प्रकारचे असते अशी नवी मांडणी स्त्रीवादी अभ्यासकांनीकेली. अमेरिकेत ज्या प्रमाणे काळ्या स्त्रियांच्यास्त्रीवादहा गोऱ्या स्त्रियांच्या स्त्रीवादापेक्षा भिन्न स्वरूपात उदयाला आला. तसेच भारतात मुख्यप्रवाही स्त्रीवादापेक्षा वेगळा दलित स्त्रीवाद उदयास आला. मुख्य प्रवाही स्त्रीवादी चळवळीने आणि दलितमुक्ति आंदोलनाने दलित स्त्रियांच्याप्रश्नांकडेदुर्लक्ष्य केले याजाणीवेतूनदलितस्त्रीवाद पुढे आला.उर्मिला पवार आणि मीनाक्षी मूनयांच्या १९८९ मध्ये प्रकाशित आम्हीही इतिहास घडवला या ग्रंथातूनबहुजन समाजातील स्त्रियांचाइतिहास मांडण्याचा प्रयत्न झाला.शर्मिला रेगे, नारायण भोसले,मीना आनंद यांनी दलित स्त्रीवादाबाबतमांडणी केली.

### ४.२.४.३ स्त्रीवादीइतिहासलेखन परंपरेचे मूल्यमापन

मानवी इतिहासाच्या सर्व ऐतिहासिक काळात समाजाचा निम्मा भागअसलेल्या स्त्रियांचा इतिहास हा मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनाने दुर्लक्षिलेला होता. हा इतिहास स्त्रीवादी इतिहासलेखनाने समोर आणला. स्त्रीवादी इतिहासाने अगदी प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळातील स्त्रियांच्या इतिहासाची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडणी केली. त्यांनी त्या साठी नव्या प्रकारच्या संशोधनपद्धती आणि साधने वापरली.स्त्रियांची मौखिक परंपरा, त्यांचीआत्मचरित्रे, त्यांचेआत्मकथने यांचा वापर स्त्रीवादी इतिहासाने केला. जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या परीपेक्ष्यातून इतिहासाचा अन्वयार्थ लावायला हवा अशी महत्त्वाची दिशादर्शक मांडणी स्त्रीवादी इतिहासातून समोर आली. जातीव्यवस्था आणि ब्राम्हणी पितृसत्ता यांच्या परस्पर संबंधाची आणिस्त्रियांच्या शोषणाचा संदर्भ लावण्याचा प्रयत्न स्त्रीवादी इतिहासाने केला. दुर्लक्षित असलेल्या स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न करणारे स्त्रीवादी इतिहासलेखन भारतातील तळाकडून इतिहास परंपरेतीलअत्यंत महत्त्वपूर्ण इतिहासलेखन प्रवाह आहे.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवादाचे इतिहासकार स्त्रीवादी चळवळींच्या टप्प्यांचे वर्णन कसे करतात ?

२. प्राचिन भारतातील स्त्रियांच्या संदर्भातील इतिहासलेखनाचीचिकित्सा करून आतापर्यंत झालेल्या संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करत नव्या संशोधनाच्या शक्यता वर्तवणारा लेख कोणी लिहिला ?

३. स्त्रियांचा इतिहास लिहिताना काय केंद्रस्थानी असायला हवेत असा स्त्रीवादी इतिहासकारांचा आग्रह आहे ?

४. उमा चक्रवर्ती यांचे मते भारतातस्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात कोणी मुख्य भूमिका बजावली ?

५. कोणता परीपेक्ष्यवापरून उमा चक्रवर्ती यांनी केलेले संशोधन नवी दिशा देणारे ठरले ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. ............. ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते.

२. स्त्रियांवर कडक निर्बंध लादणाऱ्याप्राचिन ग्रंथामधील कायदे व नियमांवर.......... इतिहासकारांनी सोयीस्कर मौन बाळगले.

३. रा. चिं. ढेरे यांनी लज्जागौरी या ग्रंथात भारतातील .................. च्या उपासनेचा अभ्यास केला.

४. संपत्तीचा औरस वारस मिळविण्यासाठी आणि जाती-वर्णाचे शुद्धत्व टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि जननक्षमतेवर............. नियंत्रण आणले.

५. उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांच्या १९८९ मध्ये प्रकाशित ......... या ग्रंथातूनबहुजन समाजातील स्त्रियांचाइतिहास मांडण्याचा प्रयत्न झाला.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

सबालटर्न : धुरीणत्व (वर्चस्व) नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट

सुवर्णयुग : सर्व क्षेत्रात भरभराट असलेला काळ

पितृसत्ता : कुटुंबामध्येकिंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्कर पुरुष हा कुटुंब किंवा सत्ता प्रमुख असतो.

मातृसत्ता : कुटुंबामध्ये किंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्करस्त्री हीकुटुंब किंवा सत्ता प्रमुख असते.

पुरुषसत्ताक : पुरुषांचे वर्चस्व असलेली व्यवस्था

स्त्रीसत्ताक : स्त्रियांचे वर्चस्व असलेली व्यवस्था

स्त्रीवाद : स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रहधरणारी सामाजिक-राजकीय विचारप्रणाली

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ल्युसिन फेबव्र

२) History from Below (हिस्ट्री फ्रॉम बीलोव)

३) हॉवर्ड झिन

४) मोजक्या संख्येने असलेल्या उच्च वर्गाच्या

५) अब्राम्हणी, सबालटर्न स्टडीज आणि स्त्रीवादी इतिहासलेखन

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) तळाकडून इतिहासलेखन परंपरा

२) ई. पी. थॉम्पसन

३) १९७०

४) भारतीय

५) तळाकडून

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महात्माजोतीबा फुले

२) कृष्णराव अर्जुनराव केळुस्कर

३) डॉ. बाबासाहेबआंबेडकर

४) शरद पाटील

५) विद्युत भागवत आणि प्रतिमा परदेशी

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) महात्मा फुले

२) डॉ. बाबासाहेबआंबेडकर

३) हरिती

४) पुरुषसत्ताक-जातिवर्ग

५) ब्राम्हण-ब्राम्हणेतर

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) रणजीत गुहा

२) 'Prison Notebooks' (प्रिझन नोटबुक्स म्हणजे कारागृहातील वह्या)

३) शेतकरी, आदिवासी, निम्नजाती, दलित, आणि स्त्रिया

४) शाहीद अमीन

५) गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) अंतोनियो ग्रामची

२) सबालटर्न

३) डेव्हिड आर्नोल्ड

४) अभिजनवर्ग

५) उत्तर-आधुनिकतावादी

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) स्त्रीवादाच्या लाटा म्हणून

२) उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय

३) स्त्रियांचे अनुभव

४) ब्राम्हणी पितृसत्ताने

५) जात, वर्ग आणि लिंगभाव

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) स्त्रीवाद

२) राष्ट्रवादी

३) मातृदेवता

४) ब्राम्हणी पितृसत्तेने

५) आम्हीही इतिहास घडवला

## ४.५ सारांश

मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनामध्ये अभिजन वर्गाच्याच इतिहासावर भर दिल्याचे दिसून येते. शोषितांच्या बाजूने उभ्या असलेल्या मार्क्सवादी इतिहासलेखनाने आर्थिक इतिहासावर भर देण्याच्या नादात सर्वसामान्य लोकांच्या इतिहासाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे जगभरातील कामगार, शेतकरी, आदिवासी,स्त्रिया इत्यादी समाज घटकांचा इतिहास दुर्लक्षितराहिला. २०व्या शतकात उदयाला आलेल्या तळाकडून इतिहासाच्या दृष्टीकोनामुळे या दुर्लक्षित समाज घटकांच्या अभ्यासास सुरुवात झाली. तळातून इतिहासामुळे समाजाच्या तळाशी असलेल्या समाज घटकांची मानवी उत्क्रांतीतील भूमिका तर समोर आलीच पण त्याच बरोबर त्यांच्या शोषणाची आणि त्या शोषणा विरुद्ध त्यांनी केलेल्या प्रतिकाराचा इतिहास देखील समोर आला.

भारतात तळाकडून इतिहासाचे अब्राम्हणी, सबालटर्न आणि स्त्रीवादी असे तीन मुख्य प्रवाह उदयास आले. अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा ही इतिहासात ब्राम्हणी आणि अब्राम्हणी अशा दोन विचारांचा सतत संघर्ष सुरु आहे असे मानते. शुद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या शोषणास आणि दुय्यमपणासजातीव्यवस्था आणि पितृसत्ता जबाबदार आहे असे अब्राम्हणी दृष्टीकोन मानतो. शिवाजी महाराजांच्या इतिहासाला घेऊन देखील ब्राम्हणी आणि अब्राम्हणीइतिहासलेखन परंपरांचा वाद झाल्याचे दिसून येते. अब्राम्हणी इतिहासलेखनाने प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावून पितृसत्ताकजाती संस्थाच्या उदयावर गंभीर भाष्य केले आहे.

वसाहतिक इतिहासलेखन आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनाने आधुनिक भारताचा आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लिहिताना शेतकऱ्यांचे उठाव आदिवासींचे बंड यांच्याकडे दुर्लक्ष्य केले होते. अंतोनियोग्रामची याच्या सबालटर्न संकल्पनेचा वापर करून भारतातील शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न सबालटर्न इतिहासलेखन परंपरेने केला. अभिजन वर्गाशिवाय इतर जे समाजघटक जे शोषित आणि अंकित होते त्यांची इतिहासातील भूमिका कशाप्रकारची होती याचे विश्लेषण सबालटर्न इतिहासलेखन परंपरेने केले.

समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रियांच्या इतिहासाकडे जवळपास सर्व इतिहास लेखनप्रवाहांनी दुर्लक्ष केले होते. स्त्रीवादाच्या उदयाबरोबर टप्प्या टप्प्यांनी भारतातील स्त्रीवादी इतिहासाचा विकास होत गेला. स्त्रीवादी इतिहासकारांनी प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावून स्त्रियांना दुय्यमत्व देणाऱ्या जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या घनिष्ट संबंधाची मांडणी केली. आधुनिक काळात राष्ट्रवादाच्या उदया बरोबर स्त्रियांना नव्याने साचेबद्ध करण्याची प्रक्रिया राबवली गेली याचा उलघडा स्त्रीवादी इतिहासकारांनी केला.

अब्राम्हणी, सबालटर्न आणि स्त्रीवादी या तीनही इतिहासलेखन परंपरामध्ये स्त्रिया, दलित, आदिवासी, कामगार, शेतकरी इत्यादी समाजाच्या तळातील शोषित घटकांचा इतिहास त्यांच्या दृष्टीकोनात मांडण्याचा प्रयत्न केला. या तीन इतिहासलेखन परंपरांच्या माध्यमातून भारतात तळाकडून इतिहासाची परंपरा अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

१) अब्राम्हणीइतिहासलेखन परंपरा स्पष्ट करून त्याचे मूल्यमापन करा.

२) ब्राम्हणी-अब्राम्हणी इतिहास लेखन आणि त्यांची भूमिका स्पष्ट करून अब्राम्हणी इतिहासलेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) सबालटर्न इतिहासलेखन परंपरेतील संशोधनाची माहिती देऊन चिकित्सा करा.

४) सबालटर्न स्टडीजच्या खंडांची आणि संशोधनाची विस्तृत चर्चा करा.

५) भारतातील स्त्रीवादी इतिहासाच्या विकासाचे टप्पे स्पष्ट करा.

**(ब) टिपा लिहा.(लघुत्तरी प्रश्न)**

१) तळाकडून इतिहासाची संकल्पना

२) शरद पाटील

३) सबालटर्न संकल्पना

४) स्त्रीवाद

५) वसाहतवादी आणि राष्ट्रवादी दृष्टीकोनातून स्त्रियांचा इतिहास

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. E. Sreedharan,A Textbook of Historiography, 500 B.C. to A.D. 2000, Orient Blackswan, 2004

२. जास्वंदी वांबूरकर, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१४

३. इतिहासलेखनमीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड-१, लोकवाङ्मयगृह, २०१०

४. विद्युत भागवत व प्रतिमा परदेशी (संपा.), अब्राम्हणीस्त्रीवादीइतिहासलेखनाच्या दिशेने, पुणे विद्यापीठ, पुणे १९९९


❋❋❋